बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२९३ ■ रविवार २६ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

Post Regd.No./DHL/53/24-26

भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

## विद्यार्थ्यांपुढे सरकार झुकले; शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा
## मागण्या मान्य झाल्याने कॉक्रोज जनता पार्टीतर्फे आंदोलनाची सांगता



**नवी दिल्ली, दि.२५- देशभरातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर गेल्या अनेक दिवसांपासून दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाची अखेर सांगता झाली आहे. केंद्र सरकारसोबत झालेल्या निर्णायक चर्चेनंतर आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या मान्य करण्यात आल्याचा दावा करत सीजेपीने आंदोलन अधिकृतपणे मागे घेण्याची घोषणा केली. यावेळी संघटनेच्या नेतृत्वाने आंदोलनात सहभागी झालेल्या हजारो विद्यार्थी, युवक आणि पालकांचे आभार मानत सर्वांनी शांततेने आंदोलनस्थळ रिकामे करून आपल्या घरी परतावे, असे भावनिक आवाहन केले. आज दुपारी दोन वाजता केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचे वृत्त येताच मोठ्या जल्लोषात आनंद आंदोलन कर्त्यांनी व्यक्त केला. कॉकरोज जनता पार्टीतर्फे अभिजीत दिपकेंच्या नेतृत्वाखाली जून महिन्यापासून आंदोलन सुरु होते. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी आपले आमरण उपोषण २४ जुलैस मागे घेतले होते.**

नीट परीक्षेतील घोटाळ्याची चौकशी करणे, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा आणि पेपरफुटीमुळे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना प्रत्येकी १ कोटी रुपयांची भरपाई मिळणे, या आंदोलकांच्या प्रमुख मागण्या होत्या. प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते व शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांनी देखील २८ जूनपासून विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ जंतर मंतर येथे आमरण उपोषण सुरू केले होते, जे त्यांनी सरकारसोबत झालेल्या दीर्घ चर्चे नंतर २४ जुलै रोजी केंद्रीय मंत्री जे.पी.नड्डा यांच्या उपस्थितीत मागे घेतले.

गेल्या काही दिवसांपासून जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळत होती. परीक्षा व्यवस्थेतील कथित अनियमितता, पेपरफुटीच्या घटना, दोषींवर कठोर कारवाई, विद्यार्थ्यांना न्याय, शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याच्या मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले होते. आंदोलनाला देशभरातील विविध विद्यार्थी संघटना, पालक, सामाजिक कार्यकर्ते आणि अनेक राजकीय पक्षांनीही पाठिंबा दिला होता. वेगवेगळ्या राज्यांमध्ये राजकीय पक्षांतर्फे तसेच विद्यार्थी संघटनांमर्फत आंदोलन अधिक तीव्र होत चालले असल्याने केंद्र सरकार दडपणाखाली आले होते.

आंदोलनाच्या काळात केंद्र सरकार आणि आंदोलनकर्त्यांच्या प्रतिनिधींमध्ये सलग तीन फेऱ्यांत चर्चा झाली. या बैठकीत विद्यार्थ्यांनी मांडलेल्या पाच प्रमुख मागण्यांवर सरकारने सकारात्मक भूमिका घेतल्याचा दावा सीजेपी ने केला. या मागण्यांमधील केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची घोषणा ए.एन.आय या वृत्त संस्थेकडून दुपारी २ वाजता झाली. यानंतर कॉक्रोज जनता पार्टी व विद्यार्थ्यांमधील चर्चेला वेग आला. सरकारकडून आवश्यक प्रशासकीय आणि धोरणात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्याचा निर्णय दिपके यांच्याकडून घोषित करण्यात आला.

आंदोलन मागे घेण्याची घोषणा करताना सीजेपीच्या प्रमुखांनी सांगितले की, हा संघर्ष कोणत्याहीसरकारविरोधात नव्हता, तर विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर होता. आमच्या प्रमुख मागण्यांबाबत सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे आम्ही लोकशाही प्रक्रियेवर विश्वास ठेवत आंदोलन सन्मानाने स्थगित करत आहोत. सर्व आंदोलनकर्त्यांनी शांततेने आणि शिस्तीने आपल्या घरी परतावे. असे आवाहन दिपके यांनी केले. आंदोलना दरम्यान संयम राखणाऱ्या विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे, स्वयंसेवकांचे आणि देशभरातून पाठिंबा देणाऱ्या नागरिकांचे विशेष आभार मानले. हा विजय एखाद्या संघटनेचा नसून देशातील प्रत्येक विद्यार्थ्याचा आहे, असेही त्यांनी नमूद केले. आंदोलक आणि पोलिसांमध्ये धक्काबुक्की झाल्याच्या घटना घडल्या, तर विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईमुळे देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारवर वाढलेला दबाव आणि त्यानंतर झालेल्या चर्चांनी आंदोलनाला निर्णायक वळण मिळाले.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा म्हणजे आपल्या संघर्षाचा नैतिक विजय असल्याचे दिपके यांनी सांगितले. नेतृत्वातील बदल पुरेसा नसून शिक्षण व्यवस्थेत व्यापक सुधारणा, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा आणि त्यांची भुमिका

वाढता राजकीय दबाव आणि संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांनी (पान ८ वर)

## जेन झीने सरकारचा झिंज्या उपटल्या
## मुंबईत मोर्चा निघणार- ठाकरे बंधू

**मुंबई, दि.२५- देशातील तरुण पिढीने अर्थात जेन झीने आपल्या सनदशीर आंदोलनाच्या जोरावर केंद्र सरकारचा मस्तवालपणा उतरवला आहे. जेन झी झीने सरकारची मस्ती जिरवली आहे आणि त्यांच्या झिंज्या उपटल्या आहेत. या विद्यार्थ्यांनी अख्ख्या देशाला भयाने पछाडलेल्या जाळ्यातून बाहेर काढले असून, देशात युवाशक्ती एकत्र आल्यास ती काय करू शकते, याची ही फक्त एक झलक आहे, अशा शब्दांत शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत जंतर मंतरवर सुरु असणाऱ्या विद्यार्थी आंदोलनांचे कौतूक केले. तसेच, उद्या शिवाजी पार्क ते सिद्धिविनायक मंदिर असा मोर्चा निघणारच, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.**

पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, भाजप सरकारने देशात असा भ्रम निर्माण केला होता की, देशात आता नागरिक उरलेलेच नाहीत, ती केवळ झुरळे आहेत. परंतु, या एका झुरळाने (सामान्य विद्यार्थ्याने) हुकूमशाही सरकारला झुकवून दाखवले आहे. हा विषय केवळ एका राजीनाम्यापुरता मर्यादित नव्हता. या ऐतिहासिक आंदोलनाचे नेतृत्व करणा-या अभिजित दिपके यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. आंदोलन मागे घेतलेले नाही!

अभिजित दिपके यांनी आंदोलन मागे घेतलेले नाही. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मुख्य मागणी मान्य झाली असली, तरी विद्यार्थ्यांच्या आणखी दोन महत्त्वाच्या मागण्या अद्याप बाकी आहेत. त्या मान्य होणे अत्यंत आवश्यक आहे, असे ठाकरे यांनी स्एेपष्ऐट केले.

### विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेणार का?

आंदोलनादरम्यान घडलेल्या प्रकारावर ताशेरे ओढताना उद्धव ठाकरे यांनी गृह मंत्रालयावर गंभीर आरोप केले. विद्यार्थ्यांच्या शांततापूर्ण आंदोलनात साध्या वेषातील गुंड (पान ८ वर)



## राहुल गांधींच्या वक्तव्याच्या निषेधार्थ
## भाजप यु.मो.तर्फे जोडे मारो आंदोलन

शिरपूर, दि.२४(प्रतिनिधी)- भारतीय जनता युवा मोर्चा धुळे जिल्हा ग्रामीण व भारतीय जनता युवा मोर्चा शिरपूर तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने आज सायंकाळी ५.०० वाजता शिरपूर येथील काँग्रेस भवनासमोर राहुल गांधी यांनी भारतीय सैन्य व देशाच्या अस्मितेबाबत केलेल्या वक्तव्यांच्या निषेधार्थ प्रतिकात्मक बॅनरला जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत राहुल गांधी यांच्या वक्तव्यांचा तीव्र निषेध व्यक्त केला. भारतीय सैन्याचा सन्मान, देशाची अस्मिता आणि राष्ट्रहित यांविषयी कोणतेही अवमानकारक वक्तव्य सहन केले जाणार नाही, अशी भूमिका भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने मांडण्यात आली.

या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा धुळे जिल्हा ग्रामीण सुरेंद्र राजपूत यांनी केले. यावेळी जिल्हा प्रभारी, भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेश परिशीत पवार , शिरपूर मंडळ अध्यक्ष भरत पाटील, थाळनेर मंडळ अध्यक्ष विरपाल राजपूत, जिल्हा उपाध्यक्ष राज सिसोदिया , जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत चौधरी , नगरसेवक आशिष पाटील , ओबीसी अध्यक्ष राजेंद्र चौधरी, शिरपूर युवा मोर्चा अध्यक्ष संदीप कुंवर , नगरसेवक राज भोई , नगरसेवक सचिन पवार , तसेच राहुल राजपूत, रोशन सोनवणे, संदीप माळी, राजवर्धन पवार, अजिंक्य शिरसाठ, दीपक पगारे, गजेंद्र राजपूत, (पान ८ वर)

## नाशिक, पालघरला भूकंपाचे धक्के
## सुरगाण्यात चार हादऱ्यांमुळे भिती

**मुंबई, दि. २५ : नाशिक आणि पालघर या जिल्ह्यांमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यात आज सकाळी एकापाठोपाठ चार धक्के बसले, तर पालघर जिल्ह्यातही भूकंपाचे सत्र कायम असल्याचे पाहायला मिळाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा वित्तहानी झालेली नाही, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.**

### सुरगाण्यात एकापाठोपाठ चार हादरे

नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील बोरगाव आणि आसपासच्या परिसरात आज सकाळी नऊ वाजून पंचावन्न मिनिट होत असताना भूकंपाचे चार सौम्य धक्के जाणवले. या धक्क्यांची तीव्रता रिश्टर स्केलवर तीन पूर्णांक सहा नोंदवली गेली आहे. एकापाठोपाठ एक अशा चार वेळा जमिनीला हादरे बसल्याफुळे बोरगाव परिसरातील ग्रामस्थ आणि नागरिक घराबाहेर पडले. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार या घटनेत कुठलेही नुकसान झालेले नाही. जिल्हा प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. (पान ८ वर)

## कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनामुळे
## एनटीएचे सत्तेचाळीस जण निलंबीत

**नवी दिल्ली, दि. २५ : नीट पेपर फुटी प्रकरणात केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरत असताना शिक्षण मंत्रालयाने एनटीए (नॅशनल टेस्टींग एजन्सी) मधील ४७ अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. केंद्राने शिक्षण सचिव बदलताना यंत्रणेतील ४७ जणाना निलंबीत केले असून त्यांच्यावर बडतर्फीची कारवाई होणार असल्याचे सांगण्यात आले. केंद्रीय शिक्षण मंत्री प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करीत कॉक्रोच जनता पार्टी महिन्याभरापासून आंदोलन करीत आहे. काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनीदेखील प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरलेली आहे.**

नीट पेपर फुटी प्रकरणी राजधानी दिल्लीत आंदोलन सुरू असून देशभर वातावरण तापले आहे. शिक्षण मंत्री प्रधान यांचा राजीनामा घ्यावा, अशी सर्व विरोधकांची मागणी आहे. पण, सरकारने अद्याप तरी प्रधान यांचा राजीनामा घेतलेला नाही. त्याऐवजी एनटीएच्या अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू केली आहे. शिक्षण सचिव बदलताना शिक्षण प्रक्रिया आणि परीक्षा यांच्यात मोठ्या सुधारणा घडवण्यासाठी सत्तेचाळीस अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. यासोबतच काही अधिकाऱ्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई देखील केली जाणार आहे.

### आंदोलक राजीनाम्यावर ठाम

सुत्रांच्या माहितीनुसार, ही कारवाई एनटीए मधील मोठ्या सुधारणा आणि उत्तरादायित्व निश्चित करण्यासाठीच्या एका मोठ्या अभियानाचा भाग आहे. येणाऱ्या कालावधीत यंत्रणेत आणखी महत्त्वाच्या सुधारणा करण्यात येतील, अशी माहिती शिक्षण (पान ८ वर)

## कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात जोरदार पाऊस

मुंबई, दि.२५- राज्यात पुढील दोन ते तीन दिवस पावसाचा जोर कायम राहणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. आगामी काळात राज्यात पावसाचा जोर कायम राहणार असून भारतीय हवामान विभागाने त्या संदर्भात मोठा इशारा दिला आहे. गुना, सिध आणि ईशान्य बंगालच्या उपसागरातपर्यंत मॉन्सून सक्रिय झाला असून गुजरातपासून कर्नाटकपर्यंत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. त्याचा परिणाम महाराष्ट्रातील बहुतांश ठिकाणी दिसत असल्याचे चित्र आहे. पुणे, सातारा जिल्ह्यातील घाटमाथ्यावर (पान ८ वर)



## नीटच्या नैराश्यातून आत्महत्या केलेल्या
## विद्यार्थ्यांच्या स्मरणार्थ काँ.गीचे कँडल मार्च

धुळे, दि.२५- दिल्लीतील जंतरमंतर येथे छत्तीस दिवसापासून विद्यार्थ्यांचे विविध मागण्यांसाठी आंदोलन सुरू होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. पेपर फुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा देणे भाग पडले. या आंदोलनात राहुल गांधींनीही सहभाग नोंदवला. नीट पेपर फुटल्याने निराषा पदरी पडलेल्या काही विद्यार्थ्यांनी आपले आयुष्य संवपले. त्यांच्यासाठी काँग्रेसच्यावतीने कॅण्डल मार्च काढण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या संघर्षाला अखेर यश आले तरी नीट पेपर फुटीमुळे काही विद्यार्थ्यांनी निराशेत आपले जीवन संपवले. त्यांच्या स्मरणार्थ काँग्रेसच्या वतीने काँग्रेस भवन पासून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्या पर्यंत कॅण्डल मार्च काढण्यात आला. कॅण्डल मार्च युवराज करनकाळ यांच्या नेतृत्वात काढण्यात आला. यावेळी साबीर मुहिबुल्लाह, भा.ई. नगराळे, मुजफ्फर हुसेन, अफसर पठाण, राजेंद्र खैरनार, दिपक पाटील, (पान ८ वर)

## पावसामुळे खान्देश एक्सप्रेस आज रद्द

नंदुरबार, दि.२५(प्रतिनिधी)- गुजरातमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला असून, नंदुरबारहून मुंबईकडे जाणारी खान्देश एक्सप्रेस आज रद्द करण्यात आली आहे, अशी माहिती रेल्वे सूत्रांनी दिली.

गुजरातमधील सततच्या पावसामुळे काही रेल्वे मार्गांवर वाहतुकीत अडथळे निर्माण झाले आहेत. त्याचा परिणाम म्हणून नंदुरबारहून रात्री ९.०० वाजता सुटणारी खान्देश एक्सप्रेस रद्द करण्यात आली आहे. दरम्यान, खान्देश एक्सप्रेस वगळता इतर रेल्वे सेवा (पान ८ वर)



## नंदुरबारला पाण्याच्या मोटारी चोरणारे
## सराईत जेरबंद; सात मोटारी हस्तगत

**नंदुरबार, दि.२५ (प्रतिनिधी)- नंदुरबार शहरात वारंवार होणाऱ्या पाण्याच्या मोटारी चोरीच्या घटनांना आळा घालत नंदुरबार शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने धडाकेबाज कारवाई करत एका सराईत चोरट्याला अटक केली आहे. आरोपीकडून विविध कंपनीच्या एकूण ७ चोरीच्या पाण्याच्या मोटारी हस्तगत करण्यात आल्या असून काही मोटारींचे मालक अद्याप समोर आलेले नाहीत.**

देसाईपुरा परिसरातील रहिवासी रविंद्र दंगल मराठे यांच्या घराच्या ओट्यावरून दि. १९ ते २० जुलै २०२६ दरम्यान सुमारे ६,००० किमतीची शगुना कंपनीची पाण्याची मोटार अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती. याप्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. शहरात अशा प्रकारच्या चोरीच्या तक्रारी वाढत असल्याने पोलिसांनी या गुन्ह्याचा तपास गांभीर्याने सुरू केला.

पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे चंद्रशेखर नथ्थु मेश्राम (रा. चिंचपाडा भीलाटी, नंदुरबार) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने नंदुरबार शहर परिसरातून एकूण ७ पाण्याच्या मोटारी चोरी केल्याची कबुली दिली.

पोलिसांनी आरोपीकडून चोरीस गेलेल्या विविध कंपनीच्या सात मोटारी जप्त केल्या आहेत. त्यापैकी काही मोटारींचे मालक अद्याप निष्पन्न झाले नसल्याने, अलीकडील काळात ज्यांच्या पाण्याच्या मोटारी चोरीस गेल्या आहेत त्यांनी मालकीचे कागदपत्र किंवा अन्य पुराव्यासह नंदुरबार शहर पोलीस (पान ८ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,31,450 रु.+3% GST
सोने- 24 K -1,43,500 रु.+3% GST
चांदी- 2,26,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## भाजप तर्फे महिलांना किचन गार्डन
## किट व सेंद्रिय शेतीबाबत मार्गदर्शन

**धुळे, दि.२५- महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिला शेतकऱ्यांना हक्क, सन्मान आणि आर्थिक बळकटी देण्यासाठी महिला-केंद्रित विविध धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. त्याच प्रेरणेतून आणि त्यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी महिला मोर्चातर्फे देवाभाऊ कृषी माऊली सोहळा या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा आ.चित्रा वाघ यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत धुळे शहरातील चार हजार महिलांना मोफत किचन गार्डन किट वितरित करण्यात येणार आहे. शहरी महिलांनी घरच्या घरी विषमुक्त, सेंद्रिय आणि पोषणयुक्त भाजीपाला पिकवावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

या सोहळ्यात महिलांना आधुनिक गृह-कृषीविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मर्यादित जागेत जसे की बाल्कनी, गच्ची किंवा अंगणात भाजीपाला कसा पिकवावा, याबाबत नामांकित नर्सरी तज्ज्ञ, हायड्रोपोनिक्स तज्ज्ञ आणि कृषी विभागातील अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.

यावेळी प्रत्येक महिलेला पर्यावरणपूरक कापडी पिशवीत उच्च दर्जाच्या पाच प्रकारच्या हायब्रीड भाजीपाल्याच्या बियाण्यांचे संच, सेंद्रिय खताची पिशवी आणि पाण्याचा स्प्रेअर देण्यात येणार आहे. या किटवर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस (देवाभाऊ) यांचे छायाचित्र तसेच भाजप महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश असा उल्लेख करण्यात आला आहे. महिलांच्या सक्षमीकरणाला, सेंद्रिय शेतीला आणि कुटुंबाच्या पोषण सुरक्षेला चालना देणारा हा उपक्रम धुळे शहरात (पान ८ वर)



## विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करणाऱ्यांवर
## कारवाई करा;आझाद स.पा.ची मागणी

**धुळे, दि.२५- नीट पेपर लिक प्रकरणी दिल्लीतील जंतर मंतर येथे कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन सुरू होते. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासह इतर मागण्या करण्यात आल्या. अनेक दिवसांपासून सुरू असलेले आंदोलनात सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांवर अमानुष लाठीचार्ज करण्यात आला. विद्यार्थ्यांना न्याय मिळण्यासाठी आझाद समाज पार्टीच्यावतीने आंदोलन करण्यात आले.**

दिल्लीतील जंतर मंतर येथील आंदोलनात सोनम वांगचूक यांचे उपोषण सुरू असतांना पोलीसांनी त्यांना उचलून नेले. परंतु विद्यार्थ्यांनी न्याय हक्कासाठी आंदोलन सुरूच ठेवले. दि.२० जुलै रोजी पोलीसांनी लाठीचार्ज करत अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडल्या. यावेळी अनेक तरूण तरूणी गंभीर जखमी झाले. जखमींना अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले. नीट पेपर फूटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा देण्याऐवजी विद्यार्थ्यांवर अमानुष हल्ला केला. या हल्ल्याची चौकशी करण्यात यावी व दोषींवर योग्य ती कारवाई (पान ८ वर)



धुळे, दि.२५- शहरातील मालेगाव रोडवरील श्री विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशी निमित्त दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली. मंदिरात दर्शन घेणे सुलभ व्हावे यासाठी महिला व पुरूषांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. श्री विठ्ठल चरणी लोटांगण घालण्यासाठी भक्त मोठ्या संख्येने एकत्र आल्याने परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले. यात्रेत करमणुकीचे खेळ, फराळाची दुकाने, थाटण्यात आली. अडथळा टाळण्यासाठी वाहतुकीचा मार्गही वळविण्यात आला.

## आर.पी.आय. आठवले गटाची आज बैठक

धुळे, दि.२५- दोंडाईचा येथील दादासाहेब रावल स्टेडियम येथे दि.२६ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता आर.पी.आय.आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर जाधव यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भुमीवर दि.३१ जुलै २०२६ रोजी भिमस्मृती यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेच्या संदर्भात घेण्यात येणाऱ्या बैठकीचे नियोजन आर.पी.आय.आठवले गटाचे उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष रामभाऊ माणिक यांनी केले आहे. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून वाल्मिक दामोदर, (पान ८ वर)



## आर.सी. पटेल कला व वाणिज्य कॉलेजच्या
## सहा विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

**शिरपूर, दि.२५- आर. सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहा विद्यार्थ्यांनी कुलगुरू समर कॅम्प मध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचा लौकिक उंचावला आहे.**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे दि.१० ते १६ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या (पान ८ वर)

# पशुपालकांना शासनाने चारा पुरवण्याची मागणी पालकमंत्र्यासह जिल्हाधिकारी यांना दिले निवेदन



**नंदुरबार, दि.२५ (प्रतिनिधी) - यंदा निसर्गाने नंदुरबारवर अवकृपा दाखवल्याने दीड महिन्या पासून पावसाने दडी मारल्यामुळे गुराढोरांना चारा उपलब्ध नाही. यामुळे दूध उत्पादक पशुपालक अडचणीत आले असल्याने शासनाने तातडीने चारा पुरवठा करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात दूध उत्पादकांनी निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, प्रांताधिकारी आणि पालकमंत्री हसन मुश्रीफ यांना निवेदन देण्यात आले आहे.**

या निवेदनात म्हटले आहे की, नंदुरबार जिल्ह्यात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असून जनावरांना चारा उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे. यंदा पावसाळा सुरू होऊन दोन महिन्याचा कालावधी लोटला तरी वरून राजा अपेक्षेप्रमाणे बरसला नाही. दुभती जनावरे आणि भाकड जनावरे यांच्या साठी असलेला चारा संपत आला. शेत जमिनीवर हिरवळ नसल्याने हिरवा चारा व कोरडा चारा देखील उपलब्ध नाही. यामुळे दुभती जनावरे दूध देत नाही. दुधाचे उत्पन्न कमी झाले असून दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. जनावरे सांभाळणे देखील मुश्किल झाले आहे. पशुपालक आणि गुरांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत असून दुग्ध व्यवसायावरच कुटुंबाचे उदरनिर्वाह आहे. चाऱ्या अभावी संकट निर्माण झाले असून दूध उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने तातडीने चारा छावणी उभारून मदत करावी. अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनावर जयसिंग भरवाड, लक्ष्मण गवळी, भूपेंद्र ठाकूर, चंद्रकांत गवळी, देवा भरवाड, रामसिंग पाटील, यासह असंख्य दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

## दगड मारून जखमी केले कारावास आणि दंडाची शिक्षा

धुळे दि. २५- शेताच्या बांधावरील लिंबाचे झाड छाटू नको असे समजावून सांगणाऱ्या शेजाऱ्यावर रागाच्या भरात शिवीगाळ करत दगडाने वार करून जखमी करणाऱ्या आरोपीस धुळे येथील प्रथम वर्ग न्यायमूर्ती मा. परवेश साहेब यांनी सहा महिने साध्या कारावासाची आणि दहा हजार रुपये दंडाची सक्त शिक्षा सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. २१ मे २०२४ रोजी बोरीस (ता. धुळे) येथील रहिवासी फिर्यादी महेश अशोक पाटील हे आरोपी नरेंद्र निंबा वाघ (रा. बोरीस) याला त्यांच्या शेताच्या बाजूला असलेले लिंबाचे झाड छाटू नकोस, असे शांतपणे समजावून सांगत होते. मात्र, या गोष्टीचा राग आल्याने आरोपी नरेंद्र वाघ याने महेश पाटील यांना अवाच्य भाषेत शिवीगाळ केली. एवढ्यावरच न थांबता त्याने फिर्यादीस हाताने व बुक्क्यांनी मारहाण करून थेट दगडाने डोक्यात मारून गंभीर दुखापत केली होती.याप्रकरणी सोनगीर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा रजि. नं. ११०/२०२४ भारतीय दंड संहिता () कलम ३२३, ३२४ आणि ५०४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा सखोल व तांत्रिक तपास सोनगीर पोलीस ठाण्याचे पो. हे. कॉ. नरेंद्रसिंग गिरासे व पो. कॉ. उन्मेष आळंदे यांनी केला. त्यांनी घटनेचे साक्षीदार, वैद्यकीय पुरावे व प्रत्यक्षदर्शींच्या साक्षी गोळा करून अवघ्या काही दिवसांत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.न्यायालयात सरकारी पक्षाच्या वतीने मांडण्यात आलेला युक्तिवाद, वैद्यकीय अहवाल आणि पोलिसांनी सादर केलेले पुरावे ग्राह्य धरून मा. न्यायाधीश परवेश साहेब यांनी आरोपी नरेंद्र निंबा वाघ याला दोषी ठरवले. न्यायालयाने दि. २२ जून २०२६ रोजी अंतिम निकाल देत आरोपीस सहा महिने साधा कारावास व दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. सोनगीर पोलिसांच्या तत्पर तपासामुळे आणि भक्कम पुराव्यांमुळे पीडिताला न्याय मिळाला असून पोलीस पथकाचे कौतुक केले जात आहे.

# क्रेडाई तर्फे मनपात फायर फायटींग ऑन लाईन अर्ज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक



**धुळे दि.२३ - क्रेडाई धुळेच्या पुढाकाराने धुळे महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली फायर फायटिंग ऑनलाईन अर्ज प्रक्रियेचे (ऑनलाईन ॲप्लीकेशन प्रोसेस) सविस्तर प्रात्यक्षिक महापालिकेच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात उत्साहात संपन्न झाले.**

या कार्यक्रमास क्रेडाई धुळेचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रात्यक्षिकामध्ये फायर फायटिंग ऑनलाईन अर्ज करण्याची संपूर्ण प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, अर्ज सादर करण्याची पद्धत तसेच अर्ज प्रक्रियेदरम्यान उद्भवणाऱ्या विविध तांत्रिक बाबींचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. धुळे महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस यांनी उपस्थित सभासदांच्या विविध शंकांचे समाधानकारक निरसन करत ऑनलाईन प्रणालीचा अधिक प्रभावी वापर करण्याचे आवाहन केले. यावेळी क्रेडाई धुळेच्या वतीने धुळे महानगरपालिका आयुक्त कापडणीस यांच्याकडे फायर फायटिंग अर्ज प्रक्रियेसोबतच झोन दाखले (झोन सर्टिफिकेट) मिळविण्याची प्रक्रिया देखील पूर्णपणे ऑनलाईन करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच बखळ प्लॉटसाठी आवश्यक असलेले (एन ओ सी) देखील ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली. या दोन्ही मागण्यांबाबत धुळे महानगरपालिका आयुक्त कापडणीस यांनी सकारात्मक व उत्स्फूर्त प्रतिसाद देत, संबंधित प्रक्रिया लवकरात लवकर ऑनलाईन करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. या बैठकी दरम्यान धुळे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या वाढीव क्षेत्रामध्ये बिनशेती(एन ए) करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या १५ % अतिरिक्त प्रीमियम बाबतही सविस्तर चर्चा झाली. यावर धुळे महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस यांनी लवकरात लवकर विकास आराखडा (डी.पी.प्लॅन) अंतिम करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील असून, त्यानंतर हा अतिरिक्त प्रीमियम कमी करण्याचा मार्ग मोकळा होईल, असे स्पष्ट केले.

यावेळी धुळे महानगरपालिका आयुक्त कापडणीस यांनी नागरिक व बांधकाम व्यावसायिकांना अधिकाधिक सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यासाठी धुळे महानगरपालिका सातत्याने कार्यरत असल्याचे सांगितले. डिजिटल सेवांमुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक, जलद व सुलभ होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास क्रेडाई धुळेचे अध्यक्ष सुमित बोरसे, सचिव क्षितिज महाजन, उपाध्यक्ष दिनेश बागुल, उपाध्यक्ष राजेश वाणी, खजिनदार चंदन पलानी, क्रेडाई महाराष्ट्राचे सहसचिव शांताराम पाटील, माजी अध्यक्ष योगीराज मराठे, अशोक अग्रवाल, अरुण केले तसेच क्रेडाई धुळेचे इतर पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नंदुरबारला महिलांची मशरूम शेतीत यशस्वी वाटचाल; रोजगारनिर्मिती सुरू




**शहादा, दि.२५ (प्रतिनिधी)- अक्कलकुवा तालुक्यातील देवमोगरा नगर पुनर्वसन येथे मशरूम शेती व्यवसायिक मार्गदर्शक राजेंद्र वसावे व लीलाताई वसावे यांच्या मार्गदर्शनाखाली नंदुरबार जिल्ह्यातील महिलांची मशरूम शेतीत यशस्वी वाटचाल सुरू झाली आहे.**

मशरूम शेतीचे मार्गदर्शक राजेंद्र वसावे व लीलाताई वसावे यांच्या मार्गदर्शनाखाली किरताबाई चंदा वसावे, इंदिराबाई बावा वसावे, मीनाताई जमश्या तडवी, उषा वसावे तसेच अनेक महिलांनी यशस्वीपणे मशरूम लागवड सुरू केली आहे. किरताबाई चंदा वसावे यांच्या मशरूमचे उत्पादन विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. मशरूम लागवडीपासून उत्पादन, तोडणी, पॅकेजिंग, विक्री, पार्सल तसेच कॅनोपी स्टॉलद्वारे थेट विक्री करण्याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन दिले जात आहे. यासोबतच कृषी विभाग (आत्मा) व कृषी विज्ञान केंद्र यांचेही वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन लाभत आहे. मशरूम उत्पादकांनी सांगितले की, राजेंद्र वसावे हे आमच्या घरी येऊन लागवडीपासून विक्रीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर प्रत्यक्ष मार्गदर्शन करतात. त्यामुळे मशरूम शेती व्यवसाय यशस्वीपणे करता येत असून उत्पन्नात वाढ झाली आहे. कालो कुणबी सेवाभावी संस्थाच्या माध्यमातून राजेंद्र वसावे, लीलाताई वसावे व संपूर्ण टीम प्रत्यक्ष ग्राउंड लेव्हलवर कार्यरत असून महिला, पुरुष, युवक व युवतींना मशरूम शेतीद्वारे रोजगार उपलब्ध करून देत आहे. मशरूम शेतीचा हा उपक्रम नंदुरबारसह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये आणि राज्याबाहेरही विस्तारत असून अनेक कुटुंबे स्वावलंबी होत आहेत.

## तेली समाज महिला मंडळतर्फे वृक्षारोपण

धुळे, दि.२५- महानगर तेली समाज महिला मंडळ व महाराणा प्रताप माध्यमिक विद्यालय देवपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले.

वृक्षारोपण प्रसंगी महिला मंडळ अध्यक्षा सुमन महाले, महापौर मायादेवी परदेशी, शहराध्यक्षा गिता चौधरी, सचिव जयश्री बाविस्कर, अल्पा अग्रवाल, माजी महापौर प्रतिभा चौधरी, नगरसेविका कल्पना महाले, माजी अध्यक्ष कविता अहिरराव, दिपीका चौधरी, विजया चौधरी, रेखा थोरात, स्मिता पाटील, रूपाली महाले, सिमा करनकाळ, प्रियंका चौधरी, तेजल जाधव, सुवर्णा चौधरी, दिपीका जाधव, कुसूम जाधव, सरला वर्शिकर, शोभा चौधरी, उज्वला बोरसे, शिवाजी चौधरी, महादेव परदेशी, युवराज चौधरी, रामेश्वर चौधरी, महेश बाविस्कर, प्राचार्य अरगड, मुख्याध्यापक चंद्रकांत सोनवणे, शिक्षक नरेंद्रसिंह सिसोदिया, प्रकाश जाधव, सोनाली सिसोदे, संगिता कुवर, मिनाली राठोड, रविंद्र राजपूत, अनिता राजपूत, योगेश शिंदे, निलेश राजपूत, हितेंद्र पवार, ज्योती वसईकर, गोविंद राजपूत, देवराम सोमवंशी उपस्थित होते.

## जन शिक्षण संस्थानच्या सदस्यांकडून वृक्षारोपण

धुळे, दि.२४ - कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार पुरस्कृत जन शिक्षण संस्थान, धुळे येथे संचालक मंडळ सदस्यांच्या उपस्थितीत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाले.

या उपक्रमामध्ये संचालक मंडळातील सर्व मान्यवर सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत प्रत्येक सदस्यास एक-एक रोप भेट देण्यात आले. तसेच वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षण, संवर्धन व हरित भविष्यासाठी जागरूकता निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. तसेच अध्यक्ष श्री समीर मन्सूरी सर व सर्व सदस्यांनी अशिस्टन्ट ड्रेस मेकर मॉडल लॅब ला भेट दिली. या कार्यक्रमाला संस्थेच्या संचालिका तय्यबा शेख, अध्यक्ष समीर मन्सुरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

# आरोग्य सेविका हिरणवाळे व टीमचा आ. दिलीप बोरसे यांच्या हस्ते सन्मान

नंदुरबार, दि.२४ (प्रतिनिधी) - वर्षभरात २०७ मातांची यशस्वी प्रसुती केल्याबद्दल अलियाबाद प्राथमिक आरोग्य केंद्राचा बागलाणचे आ.दिलीप बोरसे यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत सटाणा तालुक्यातील अलियाबाद प्राथमिक आरोग्य केंद्राला विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले.

सन २०२५-२६ या कालावधीत अलियाबाद प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत यशस्वी प्रसूती करण्यात आल्याबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी अलियाबाद प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या, कर्तव्यदक्ष आरोग्य सेविका लीना हिरणवाळे व त्यांच्या संपूर्ण टीमचा बागलाणचे आमदार दिलीप बोरसे यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. अलियाबाद प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मनिषा मोहिते, यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल देशमुख, संगीता बागुल, संगीता मोरे, वाहन चालक पंडित चौरे तसेच अलियाबाद व वाघम्बा येथील आशा सेविका उपस्थित होत्या. आरोग्य सेविका लीना हिरणवाळे यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## प्रा.डॉ.अमोल किनगे यांचे व्याख्यान संपन्न

धुळे, दि.२५- साने गुरुजी जेष्ठ नागरिक संघ व कुलस्वामिनी महिला जेष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने श्री भाऊसाहेब हिरे शासकीय महाविद्यालय यांच्या सहकार्याने अवयव दान श्रेष्ठ दान या विषयावर याच कॉलेजचे जन औषध वैद्यकशास्त्र विभागाचे सहाय्यक प्रा. डॉ. अमोल किनगे यांचे व्याख्यान संपन्न झाले.

यात डॉ. किंनगे यांनी अवयदान करणे ही काळाची गरज आहे ज्ञानाचा अभाव संवादाचा अभाव अंधश्रद्धा यामुळे समाजात अनेक गैरसमज आहेत ते दूर नक्कीच झाले पाहिजेत समाजात जनजागृती होणे हे अत्यंत गरजेचे आहे असे ते म्हणाले. यात आपण काय काय दान करू शकतो समाजाकडून काय काय अपेक्षा आहे हे आपल्या व्याख्यानात त्यांनी सांगितले. श्रोत्यांच्या प्रश्नांचे योग्य प्रकारे त्यांनी समर्थन केले.

# आर.सी. पटेल महाविद्यालय शिरपूर बुद्धिबळ स्पर्धांचे यशस्वी आयोजन



**शिरपूर, दि.२५- आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर येथील शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागातर्फे आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिनानिमित्त महाविद्यालयस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.**

या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवत उत्कृष्ट बुद्धिकौशल्य, एकाग्रता, संयम व रणनीतीचे प्रदर्शन केले. २० जुलै हा दिवस जगभर आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिन म्हणून साजरा केला जातो. सन १९२४ मध्ये आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाची स्थापना याच दिवशी झाल्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. बुद्धिबळ खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये तर्कशक्ती, निर्णयक्षमता, स्मरणशक्ती, एकाग्रता आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित होते. विद्यार्थ्यांनी बौद्धिक खेळांकडे वळावे आणि मानसिक विकासाला चालना मिळावी हा या दिवसामागील प्रमुख उद्देश आहे.

या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. सुवर्णा माळी हिने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बुद्धिबळ स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करून नेतृत्व केल्याबद्दल तिचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हितेंद्र महाजन यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. हितेंद्र महाजन म्हणाले की, बुद्धिबळ हा केवळ खेळ नसून विचारशक्ती, निर्णयक्षमता, संयम आणि नियोजन विकसित करणारा जीवनोपयोगी खेळ आहे. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित होतात. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीबरोबरच क्रीडा व बौद्धिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घेऊन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर महाविद्यालय आणि विद्यापीठाचे नाव उज्ज्वल करावे, असे विचार व्यक्त केले.


स्पर्धेचे नियोजन शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालिका डॉ. हर्षदा पाटील यांनी केले. स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील क्रीडा विभागाचे खेळाडू जयेश मराठे, गौरव पाटील, कुणाल पाटील व सुवर्णा माळी यांनी प्रयत्न केले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. ए. एम. पाटील, उपप्राचार्य डॉ. आर. जी. जाधव, डॉ. हर्षदा पाटील, डॉ. रामाकांत चौधरी, प्रा. गणेश चौधरी उपस्थित होते. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आयेशा कॉ. वृक्षारोपण मिर्झा बेग यांचा उपक्रम

धुळे, दि.२५- शहरातील प्रभाग क्र.१४ मधील आयेशा कॉलनीत नगरसेवक मिर्झा शोएब नवाब बेग यांच्या पुढाकाराने पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण करण्यात आले.

वाढते प्रदुषण, बदलते हवामान लक्षात घेता नागरिकांनी किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संवर्धन करणे काळाची गरज आहे. असे मत नगरसेवक शोएब मिर्झा यांनी वृक्षारोपण करतांना व्यक्त केले. या उपक्रमामुळे आयशा कॉलनी परिसरात हरीत क्षेत्र वाढण्यास मदत होणार आहे. भविष्यातही स्वच्छता, पर्यावरण जनजागृतीचे विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील असे आश्वासनही नगरसेवक मिर्झा यांनी दिले.

प्रकाश में आज इन्कलाब




धर्मेन्द्र, हेमा मालिनी, जितेंद्र, नितुसिंग, डेनी, विनोद खन्ना, परवीन बॉबी

**जाहीर नोटीस**

अॅड.राजेश आर.पाटील, धुळे
मो.नं.९४२२७९८२६२

### शिरपूर येथील म.सिव्हील जज्ज ज्यु.डी. सो., यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज नं.६१६/२०२६

१. श्री.झिंगु धुडकु पाटील, २. श्री.नानाभाउ धुडकु पाटील
३. श्री.दादाभाई धुडकु पाटील, ४. श्रीमती.निंबाबाई पुंडलिक पाटील,
५. श्री.मनोहर पुंडलिक पाटील, ६. सौ.भारती राजेंद्र पाटील,
७. सौ.मनिषा भरत पाटील, ८. सौ.वंदनाबाई विलास पाटील,
९. सौ.दिपाली पुंडलिक पाटील (लग्ना अगोदरचे नांव)
सौ. दिपाली प्रशांत पाटील (लग्ना नंतरचे नाव)
१०. वैशाली पुंडलिक पाटील (लग्ना अगोदरचे नांव)
सौ.वैशाली जितेंद्रभाई पाटील (लग्ना नंतरचे नाव)
११.सौ.रत्नाबाई उर्फे भिकुबाई अर्जुन पाटील,
सर्व रा.अजंदे बुा. होळनांथे शिरपूर ....अर्जदार

विरूध्द

कोणी नाही. ....सामनेवाला

कै.देवकाबाई धुडकू पाटील (मयत)
(कै.देवकाबाई धुडकू पाटील (मयत) मृत्यू दि.०९/०५/२०११)

ज्याअर्थी अर्जदार यांनी शिरपुर येथील मे.सिव्हील जज्ञ. ज्यु.डी. सो. यांचे कोर्ट नं.२ यांचे न्यायालयात दि.०१/०८/२०२६ रोजी कि. अर्ज. नं.६१६/२०२६ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे ८ प्रमाणे कायदेशिर वारस ठरवून मिळणेसाठी शिरपुर येथील मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करता पुढील चौ. दि.०१/०८/२०२६ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वैगरे संबधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे.सिव्हील जज्ञ. ज्यु.डी. सो. कोर्ट नं.२ यांचे न्यायालयात उक्त निश्चीत तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे.कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. ठिकाण- शिरपूर, दिनांक- १५/०७/२०२६

आदेशावरून

सही/- कनिष्ठ लिपीक (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक

**जाहीर नोटीस**

### शिरपूर येथील मे.सिव्हीज जज्ज् सो. ज्युनी.डिव्ही.यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं.५४७/२०२६, नि.क्र.६

१) शेख ईकबाल शेख अबु रहेमान, २) युसुफ शेख अबु,
३) शेख युनुस शेख अबु, ४) फरीदाबी शेख सलीम जमादार,
५) रुखसाना समीर शेख, ६) हमीदा शेख रफीक,
७) रेहानाबी शेख सबिरोद्दीन, ८) शाकिलाबी फारुक खान पठाण,
रा.ईदगाह नगर, शिरपूर, जि.धुळे ....अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ....जाबदेणार

अब्दुल रहेमान शेख अकबर उर्फे,
शेख अबु रहेमान अकबर, मृत्यू दि.१७/०४/२०२३,
रा.ईदगाह नगर, शिरपूर, जि.धुळे. ....मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे.शिरपूर न्यायालयात मयत अब्दुल रहेमान शेख अकबर उर्फ शेख अबु रहेमान अकबर हे दि.१७/०४/२०२३ रोजी मौजे इदगाह नगर, शिरपुर ता.शिरपुर जि.धुळे येथे मयत झाल्यामुळे अर्जदार यांना औपचारिक कारणासाठी वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.


त्याअर्थी सदर अर्जास कोणाचीही काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास यांनी दि.०१/०८/२०२६ रोजी ठिक सकाळी १०.३० वा. स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जा बाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

दि. १५/७/२०२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरून

सही/- कनिष्ठ लिपीक दिवाणी न्यायालय, शिरपूर (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय, शिरपूर

### शब्दकोडे क्रमांक : २४२०




**आडवे शब्द :** १.थोर समाजसेवक बाबा आमटे यांचे समाजसेवक पुत्र ४.एक दिवंगत भाजपा नेते '*** महाजन'८.किंमत ९.स्वर १०.एक पंजाबी महिला पोशाख १४.एक पिठाचा प्रकार १५.सुका मेव्यातील एक जिन्नस १७.हिंदीत-जिवंत १९.कारणीभूत २१.दंगलीत होणारी निष्पाप जनतेचे हत्यासत्र ण ३.बदक-इंग्रजीत २५.निगा २६.एक टिकाऊ लाकूड २७.विनाकारण २७.'समाजवादी पार्टी' या शब्दाचे संक्षिप्त रूप २८.समन्वय ३०.आईचा भाऊ ३१.नावापुरता ३२.नाही-ग्रामीण बोलीत ३३.धीम्या गतीचा ३४.अभिनेते महेश कोठारे यांचा पुत्र फक्त नाव ३६.भाजी ३७.एक आखाती देश ३९.परमेश्वर ४०.जकात ४१.पाणी ४२.वृत्तांकन प्रकाशित करणारे एक हिंदी वृत्त वाहिनी ४३.एकूण,इंग्रजीतील-'एव्हरेज' मराठीत **उभे शब्द :** १.धडा २.शंभर ३.राजवाडा ५.विविध ऋतूत येणारे ६.भगवान श्रीकृष्णाचा मोठा भाऊ ७.चोरी करणारा १०.नेहमी ११.मार्ग १२.अतिरेक १२.हिंदीत-जेव्हा १४.पटांगण १६.सेवक १८.घटना १९.पराक्रम २०.काळ्या रंगांच्या कोंबड्यांची एक जात २१.भगवंताने घेतलेले रूप २२.रसरशीत २४.पात्र नसलेला २५.नीर २७.समाजातील विषमता विरुद्ध २९.हातावर मंगल प्रसंगी काढतात ३०.माता ३२.परमेश्वर ३३.साथ ३४.बनाव ३५.उदास ३६.झाडाचे वल्कल ३७.मंदिराचा माथा ३८.रईत ३९.विदेशी-विरुद्ध ४०.डोंगराचे शिखर ४१.व्याधी

**शब्दकोडे क्रमांक : २४१९ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नि | वे | द | न | | खा | ण | | बे | वा | र | स |
| रो | ष | | र | हा | ट | | ते | ल | | डा | वा |
| प | | क | मा | ल | | ब | | न | ग | र | |
| | स | म | ई | | ख | डा | वा | | ट | | क्यू |
| प | र | त | | जं | ग | | ढ | ग | | हो | |
| ण | | र | ज | त | | क | व | ड | सा | | ठा |
| | दा | ता | | र | सा | | ण | | थ | रा | र |
| शी | र | | स | मं | द | र | | स | | डा | |
| त | | बे | | त | | त | ड | फ | ड | | पा |
| | प | | वा | र | सा | | बा | र | | मा | या |
| प | र | वा | ह | | त | मा | | चं | द | न | |
| ट | का | | क | ल | | स | न | द | | स | दी |








प्रा.डॉ.मधुकर जाधव
मो.९९७५५४६०२०

विश्वातील महान राजे

छत्रपती शिवाजी महाराजांचे बचतीचे व्यवस्थापन श्रेष्ठ असे आहे. त्यांनी स्वराज्य वाढवत असताना पैसा व्यवस्थापनाला महत्वपूर्ण स्थान दिले. पैशाच्या संदर्भात छत्रपती योग्य त्या ठिकाणी बचतीचे धोरण काटेकोरपणे राबवित असत. स्वराज्यामध्ये कधीही पैशाची कमतरता भासली नाही. त्यांनी पैसा व्यवस्थापनाचे योग्य ते नियोजन केले होते. स्वराज्यातून जाणाऱ्या पैशापेक्षा येणारा पैसा निश्चितच जास्त होता.महाराजांचे बचतीचे धोरण आश्चर्यकारक व एकमाव्दितीय असे आहे. छत्रपतींच्या स्वराज्याचे अंदाजपत्रक होते. स्वराज्याच्या शासनव्यवस्थेत विविध खाती व उपखाती होती. स्वराज्यातील प्रत्येक खात्यावर किती रक्कम खर्च करावयाची याचे अंदाजपत्रक तयार केले जात असे. त्यातील काही रक्कम ही दरवर्षी संभाव्य अडचणी सोडविण्यासाठी शिलकीत ठेवली जात असे.

# आदर्श बचत धोरण




**रयतेचे हित व कल्याण-** महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याला राष्ट्रीय ध्येय होते. रामचंद्रपंत आमात्य यांनी आपल्या आज्ञापत्रात जाहिर केले आहे ते असे की,'लोकांचे रक्षण करणे, सार्वजनिक हिताची कामे करणे, कायद्याप्रमाणे न्यायनिवाडा करणे, देशाच्या रक्षणाकरीता लष्करी व मुलकी सेवा संघटित करणे व सामान्यपणे जनतेच्या कल्याणाचे संवर्धन करणे ही स्वराज्याची कर्तव्ये होती. हे ध्येय समोर ठेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व सामान्य जनतेचे स्वराज्य उभे केले.

**बचत धोरणाला महत्व-**छत्रपतींनीसर्व सामान्य रयतेचे विशाल स्वराज्य स्थापन करीत असताना बचत धोरणाला महत्व दिले. प्रत्येक युध्दामध्ये वेळो-वेळी केलेले बदल विजयश्री खेचून आणण्यास उपयुक्त ठरत असत. त्यांनी शत्रू सैन्यावर वचक ठेवणारे युध्दतंत्र नेहमी वापरले. अनेकविध युध्द्तंत्राचा वापर करणारे सूत्र त्यांनी जगाला दिले.'प्रजेचे सुख तेच राजाचे सुख, प्रजेचे हित तेच राजाचे हित' या विचारसरणीनुसार छत्रपती वागत असत.

**पैसा वाढविणे म्हणजे पैसा कमविणे-** छत्रपतींनी पैसा वाढविणे म्हणजे पैसा कमविणे या तत्वाचा नेहमी पाठपुरावा केला. त्यासाठी आर्थिक व्यवहारामध्ये ठेवी स्वीकारणे, चलनाचा विनिमय, नाण्यांचे मूल्यमापन, कर्जे देणे, सोन्या-चांदीचा व्यवहार करणे, हुंड्या देणे व घेणे आदि. वाणिज्यविषयक बाबींचा समावेश केला.

**काटकसरीचे धोरण-** छत्रपतींनी काटेकार नियोजन करून अर्थव्यवस्था मजबूत केलेली होती.काटकसर हे महाराजांच्या अर्थ व्यवस्थेचे वैशिष्ट्य होते. अनेक राजे, महाराजे पैशाची अनावश्यक उधळपट्टी करीत असत. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाल्याची अनेक उदाहरणे दिसतात परंतु छत्रपती बचत करण्यासाठी आणि काटकसरीने व्यवहार करण्यासाठी नेहमी प्रयतक्शील असत. त्यामुळे स्वराज्य आर्थिक दृष्ट्या नेहमी समृध्द राहिले. आर्थिक धोरण आणि काटकसीरीचे नियोजन यामुळे अर्थव्यवस्था नेहमीच शिल्लकीत राहिली. छत्रपतींनी नेहमीच उधळपट्टी टाळून बचतीच्या धोरणाचा पुरस्कार केला. ही काटकसरीने उभा केलेली दौलत रयतेच्या कल्याणासाठी वापरली. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत ही स्वराज्याला पैशाची कमतरता कधी भासली नाही. स्वराज्याचा खजिना कायम तुडूंब भरलेला असे.

**पैशाची योग्य साठवण-** स्वराज्यामध्ये विनाकारण खर्च केला जात नसे. स्वराज्याचे उत्पन्न दिवसेन-दिवस कसे वाढेल याचा विचार केला जात असे. हे त्यांच्या बचत विषयक धोरणावरून स्पष्ट होते. स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडवरती बारा महाल सज्ज होते. स्वराज्यातील वाणिज्य व्यवस्थापन सुरक्षित ठेवण्यासाठी त्यातील खजिना महाल महत्वाचा मानला जात असे. कारण या महालामध्ये पैशाची साठवण केली जात असे. खजिना महालात पैशाच्या रूपाने येणारी रक्कम त्या काळी धातूच्या नाण्यांच्या स्वरूपात येत असे. त्यामुळे पैशाची साठवण करण्यासाठी जागा व इमारतसुरक्षित अशीच लागे. या खजिना ठेवण्याच्या व्यवस्थेला किंवा खात्याला खजिना महाल म्हणत. स्वराज्यामध्ये या महालाला महत्वाचे स्थान होते.

**रोख पगार-**छत्रपतींनी स्वराज्यातील अधिकारी वार्गाला रोख पगार दिले. मोकासे कोणास दिले नाहीत. या संदर्भात सभासद बखरीमध्ये याचे वर्णन आले आहे. छत्रपतींनी सर्वांना रोख पगार व बक्षीसे दिली. छत्रपतींनी सागरी किणारपट्टीवर नव्याने किल्ले पद्मदुर्गाची उभारणी केली. तेथे प्रभावळीच्या सुभेदाराला देखरेखी खाली ठेविले होते. आरमारातील अधिका-यांना देण्यासाठी सरकारातून हुंडी पाठवली होती. म्हणजेच खर्चासाठी स्वराज्यामध्ये सर्रास हुंडीचा वापर केला जात असे.

**अर्थव्यवस्थेचे मुख्य वैशिष्ट्य-**बचतीचे धोरण हे छत्रपतींच्या अर्थव्यवस्थेचे मुख्य वैशिष्ट्य होते. छत्रपतींनी ठरवुन दिलेल्या बाजारभावानेच वस्तूंची खरेदी-विक्री होत असे. यासाठी स्वराज्याचे कडक नियम होते. हा नियम मोडणारावर कठोर कारवाई होत असे. जर शेतकऱ्यांकडे अगाऊ माल शिल्लक राहिला तर तो माल शासन खरेदी करीत असे व शेतकऱ्यांना बाजारभावाप्रमाणे पैसे दिले जात असत. शेतकऱ्यांना कोणतीही झळ पोहचु नये याची काळजी घेतली जात असे. स्वराज्यातील रयतेला त्यांनी ऐन जिनसी मदत केली. स्वराज्याची अर्थव्यवस्था नेहमी शिलकी होती. माता जिजाऊंच्या मृत्युनंतर आऊसाहेबांच्या शिलकीत एक कोटी रूपयाची दौलत शिलकीत होती. ही शिलकीतील रक्कम होती स्वराज्यातील सर्व रयतेसाठी.माता जिजाऊंनी हा केवढा मोठा बचतीचा आदर्श आपणास घालून दिला आहे.

**स्वराज्यातील महाल-** स्वराज्यात विविध खात्यावर पैसा खर्च केला जात असे. या खात्यांना कारखाने व महाल असे म्हटले जाई. १८ कारखाने व १२ महाल स्वराज्याच्या राज्यकारभारात होते. या प्रत्येक खात्यावर स्वतंत्र अधिकारी नेमला जात असे. त्याच बरोबर ही खाती कोणत्या ना कोणत्या प्रधानाच्या अधिकाराखाली दिलेली असत.सर्व साधारणपणे देखरेख करण्याचे काम पंतप्रधानाकडे असे. स्वराज्याच्या अंदाजपत्रकात प्रत्येक खात्यावर ठरावीक रक्कम दिली जाई. **(पान ४ वर)**

# सत्तरीनंतरही आयुष्य सुंदर असू शकतं



जेव्हा मी सत्तरीत पाऊल ठेवलं, तेव्हा मी माझ्या जुन्या आरामाखुर्चीवर शांतपणे बसले होते. पार केलेल्या प्रवासाकडे मागे वळून पाहताना मी स्वतःशीच पुटपुटले, बरं... तर हे कदाचित आयुष्याचं शेवटचं प्रकरण असावं. पण मी जितका विचार केला, तितकी मला एक आश्चर्यकारक गोष्ट जाणवली: आयुष्य संपत नव्हतं, तर ते फक्त सत्याचा उलगडा करत होतं. ज्या गोष्टींवर मी कधीकाळी मनापासून विश्वास ठेवला होता, त्यातील अनेक गोष्टी केवळ आभास निघाल्या. मुले? ती मोठी होतात आणि स्वतःचं वेगळं जग निर्माण करतात. आरोग्य? ते तुमच्या कल्पनेपेक्षाही वेगाने अदृश्य होऊ शकतं. सरकार? ते बहुधा फक्त हेडलाईन्स, आश्वासने आणि कागदावरचे आकडे असतात. आणि वृद्धत्व... वृद्धत्व क्रूर असू शकतं. ते आधी तुमच्या शरीरावर नाही, तर तुमच्या आशेवर हल्ला करतं.

म्हणून मी काही कडू सत्यांशी, प्रामाणिक सत्यांशी तडजोड केली. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, याच सत्यांनी मला वाचवलं. मुलं तुम्हाला एकटेपणापासून वाचवू शकत नाहीत वर्षानुवर्षे आपण स्वतःला सांगतो, जेव्हा माझी मुलं मोठी होतील, तेव्हा मी कधीच एकटी नसेन. ती मला भेटायला येतील, माझी काळजी घेतील, माझ्या जवळ राहतील. हे एक सुंदर स्वप्न आहे.

पण वास्तवाचे बेत वेगळे असतात. मुलांकडे नोकऱ्या, बिलं, जोडीदार, जबाबदाऱ्या आणि त्यांची स्वतःची मुलं असतात. त्यांचे दिवस कामांनी भरलेले असतात आणि तुम्ही फक्त त्यांच्या जबाबदाऱ्यांच्या मधली एक छोटी आठवण बनून राहता. कधीकधी तुम्ही एखाद्या सणासारखी त्यांच्या फोनची वाट पाहता. दिवस जातात.

आठवडे उलटतात. आणि शेवटी एक मेसेज येतो: हाय मॉम, आशा आहे की तु ठीक असशील. त्यांना आपली आठवण राहिली या विचाराने तुम्ही हसता. पण खोलीतला तो शांत एकटेपणा तसाच राहतो. तेव्हा मला समजलं: मुलं हे एक वरदान आहेत, पण ती एकटेपणाविरुद्धचं संरक्षण कवच नाहीत. . आरोग्य हीच तुमची सर्वात मोठी संपत्ती आहे. एक दिवस असा येतो जेव्हा पायऱ्या चढणं म्हणजे एखादा डोंगर चढल्यासारखं वाटतं. जेव्हा तुमचे गुडघे तुमच्या विचारांपेक्षा जास्त जोरात 'बोलू' लागतात. ज्या ठिकाणी तुम्ही एकेकाळी धावत जायचात, तिथे जाणं तुम्ही टाळता. तेव्हा तुम्हाला समजतं: आरोग्य हे अनंत काळ टिकणारं नाहीये. तीच तुमची खरी संपत्ती आहे. आरोग्याशिवाय पैशाला काही अर्थ उरत नाही. ताकदीशिवाय स्वातंत्र्याची चमक कमी होते. जोपर्यंत तुमचं शरीर तुमचं ऐकतंय, तोपर्यंत त्याची काळजी घ्या. .

पेन्शन आणि पैसा या दोन वेगळ्या गोष्टी आहेत पेन्शन तुम्हाला जिवंत ठेवू शकतं, पण ते तुम्हाला 'जगू' देईलच असं नाही. वर्षानुवर्षे माझा असा विश्वास होता की ही व्यवस्था आपली काळजी घेईल. दशकांच्या कामानंतर कोणीतरी म्हणेल, आता विश्रांती घे. आम्ही आहोत ना. पण आयुष्य असं चालत नाही. बिलं येतातच. औषधांचा खर्च वाढतो. महागाई वाढते. आणि अचानक तुम्हाला जाणवतं की जगणं महाग झालं आहे. म्हणून मी एक निर्णय घेतला: आश्वासनांवर पूर्णपणे अवलंबून राहू नका. जेवढं शक्य आहे तेवढी बचत करा. जोपर्यंत शक्य आहे तोपर्यंत कमवा. आपली प्रतिष्ठा जपण्यासाठी छोटीशी बचतही मोलाची ठरते.

**मी पाळत असलेले नियम:**

**नियम : पैसा हा अनेकदा मुलांपेक्षा जास्त भरवशाचा असतो.**

हे ऐकायला कदाचित कठोर वाटेल, पण सत्य असंच असतं. मुलं म्हणजे प्रेम आहेत, आनंद आहेत, पण ती तुमचा 'रिटायरमेंट प्लॅन' नाहीत. स्वतःसाठी बचत करा. ती बचत तुम्हाला स्वातंत्र्य देते आणि स्वातंत्र्य तुम्हाला शांतता देतं.

श्रीमती उषा सोमन

**नियम : तुमचं आरोग्य हेच आता तुमचं 'फुल-टाईम' काम आहे.**

तुमचा रोजचा पहिला विजय म्हणजे अंथरुणातून कोणत्याही वेदनेशिवाय उठणे. चाला, व्यायाम करा,



साखर-मीठ कमी खा. आजार तुम्ही कोण आहात हे पाहत नाही, पण खबरदारी सर्व काही बदलू शकते.

**नियम : स्वतःच्या सहवासाचा आनंद घ्यायला शिका.**

कुणाची तरी वाट पाहणं दुःख निर्माण करतं. फोनची, भेटीची किंवा कोणीतरी आपल्याला आनंद देईल याची वाट पाहू नका. स्वतःचा आनंद स्वतः निर्माण करा. आवडता पदार्थ बनवा, एखादं चांगलं पुस्तक वाचा, जुनी गाणी ऐका. जिथे अपेक्षा संपतात, तिथे शांतता सुरू होते.

**नियम : वृद्धत्व म्हणजे 'कमकुवत' होण्याचा परवाना नाही.**

मी माझ्या वयाची अशी अनेक लोकं पाहते जी दिवसभर तक्रार करतात सगळं दुखतंय, कोणालाच काळजी नाही, जग खूप वाईट आहे. मग हळूहळू लोक त्यांना भेटायला येणं बंद करतात. प्रेमाचा अभाव नसतो, पण सततची नकारात्मकता थकवणारी असते. तुमची जिद्दच आदर मिळवून देते. आयुष्य कितीही दुखत असलं, तरी ताठ मानेने जगा.

**नियम : भूतकाळ सोडून द्या.**

वृद्धत्वातील सर्वात धोकादायक शब्द म्हणजे पूर्वी. पूर्वी आयुष्य सोपं होतं, पूर्वी मुलं ऐकायची, पूर्वी जग चांगलं होतं. पण तो पूर्वी आता निघून गेला आहे. फक्त आज अस्तित्वात आहे. जर तुम्ही कालच्या आठवणीत जगलात, तर आज जे काही शिल्लक आहे तेही तुम्ही गमावून बसाल.

मी आता जगायला शिकतेय. आठवणीत नाही, पश्चात्तापात नाही, तर या क्षणात.

वृद्धत्व ही एक परीक्षा आहे. ती तुमच्यासाठी दुसरं कोणीही देऊ शकत नाही. तुम्ही खुर्चीत बसून मदतीची वाट पाहत तक्रार करू शकता... किंवा दीर्घ श्वास घेऊन जे काही उरलं आहे, त्यातून पुन्हा आपलं आयुष्य उभारू शकता. आणि जर तुम्ही तसं केलंत, तर तुम्हाला एक सुंदर गोष्ट सापडेल: सत्तरीनंतरचं आयुष्य संपलेलं नसतं. त्यात अजूनही हास्य असू शकतं, शांतता असू शकते आणि एक अर्थ असू शकतो. आणि हो...

ते अजूनही एक अतिशय सुंदर आयुष्य असू शकतं.

# सामाजिक नीतिमत्ता आणि आपण

*राष्ट्रांचा अदृश्य कणा*

राष्ट्रे नकाशांवर जन्माला येत नाहीत; ती नागरिकांच्या अंतःकरणात जन्माला येतात.

पर्वत, नद्या, समुद्र, अरण्ये, वाळवंटे, सीमा, संसद, न्यायालये, राज्यघटना या राष्ट्राच्या देहाच्या गोष्टी आहेत; पण त्याचा आत्मा कुठे असतो? तो असतो समाजाच्या सामूहिक विवेकात, सार्वजनिक प्रामाणिकपणात आणि एकमेकांशी असलेल्या अदृश्य नैतिक संबंधात, ऋणानुबंधात !

एखाद्या समाजाचा ऱ्हास सुरू होतो तो अर्थव्यवस्था कोसळल्याने नव्हे, तर मूल्यांची झीज सुरू झाल्याने. समाजांचे मृत्यू रणांगणावर होत नाहीत; ते मनांत होतात. म्हणूनच प्रत्येक संस्कृतीसमोर अखेरीस एकच प्रश्न उभा राहतो आपण चांगली माणसे आहोत; पण आपण चांगला समाज आहोत का?

नीतीचे दोन आरसे

नीती माणसाला आरसा दाखवते आणि विचारते सांग, तू कसा आहेस?

सामाजिक नीतिमत्ता समाजाला आरसा दाखवते आणि विचारते तुझ्यामुळे जग कसे आहे?

या दोन प्रश्नांमधील अंतर म्हणजेच व्यक्तिगत नीतिमत्ता आणि सामाजिक नीतिमत्ता. पहिली व्यक्तीचे चारित्र्य घडवते; दुसरी समाजाचे. पहिली सत्य, दया, त्याग, करुणा आणि संयम शिकवते; दुसरी नियमांचा आदर, सार्वजनिक हिताची जाणीव, संस्थांप्रती निष्ठा आणि न्यायापुढील समानता शिकवते. पहिली मनुष्याला सज्जन बनवते; दुसरी त्याला सुसंकृत नागरिक बनवते. इतिहासाने अनेकदा दाखवून दिले आहे की सज्जन माणसांनी भरलेला समाजही, जर तो चांगल्या, सुसंस्कृत नागरिकांविना असेल, तर तो टिकत नाही.

व्यष्टी आणि समष्टी

भारतीय जीवनदृष्टीने व्यष्टी आणि समष्टी यांना कधीही परस्परविरोधी मानले नाही. व्यष्टीचा उत्कर्ष समष्टीच्या कल्याणात आणि समष्टीचे सामर्थ्य व्यष्टीच्या चारित्र्यात प्रतिबिंबित होते, अशी त्यामागची भूमिका आहे.

आत्मनो मोक्षार्थं जगद्धितायच ही संकल्पना व्यक्तीचा उद्धार आणि समाजाचे कल्याण यांना एका सूत्रात बांधते. लोकसंग्रह हा कर्मयोगाचा हेतू मानला जातो आणि 'वसुधैव कुटुंबकम्' ही कल्पना व्यक्तीच्या कर्तव्याचा परीघ संपूर्ण मानवजातीपर्यंत विस्तारते.

आपल्या संस्कृतीने आपल्याला स्वतः ला घडवायला शिकवले; आता त्या घडलेल्या व्यक्तिमत्त्वांचे समाजाशी असलेले नाते अधिक जागरूकपणे जगण्याची आवश्यकता आहे. कारण व्यक्तीचा सदाचार आणि समाजाचे स्वास्थ्य हे शेवटी एका धाग्यानेच जोडलेले असते.

सार्वजनिक म्हणजे कोणाचे?

आपल्या सार्वजनिक जीवनातील सर्वांत मोठी शोकांतिका कोणती असेल, तर ती ही आपण अजूनही




सार्वजनिक गोष्ट पूर्णपणे आपली मानायला शिकलो नाही. आपल्या घराच्या अंगणात जराही केर पडलेला आपल्याला चालत नाही; पण शहराच्या रस्त्यावरचा कचरा आपल्याला तितकासा अस्वस्थ करत नाही. आपण शेजाऱ्याची वस्तू चोरत नाही; पण सार्वजनिक मालमत्तेची नासधूस होताना मनात अपराधाची तीच तीव्र भावना निर्माण होत नाही. आपण मित्राला दिलेले वचन पाळतो; पण संविधाला दिलेले मौनवचन मोडण्यात आपण स्वतःलाच अनेकदा सूट देतो. हा दोष कुणा एका वर्गाचा, पिढीचा किंवा व्यवस्थेचा नाही, तो आपल्या सामूहिक संस्कारातील एक अपूर्ण भाग आहे आणि म्हणूनच त्याचे उत्तरही सामूहिक प्रयतकांतच शोधावे लागेल. ज्या दिवशी समाज सार्वजनिक गोष्टीला परकी मानू लागतो, त्या दिवशी त्याच्या ऱ्हासाची पहिली घंटा वाजते.

समाजाला पोखरणारा अदृश्य क्षय

राष्ट्रे एका दिवसात कोसळत नाहीत. त्यांचा क्षय हळूहळू सुरू होतो. त्याचा आरंभ होतो त्या दिवशी, ज्या दिवशी नियम पाळणारा माणूस भोळा आणि नियम मोडणारा ' स्मार्ट ' समजला जातो. तो वाढतो त्या दिवशी, ज्या दिवशी भ्रष्टाचार हा अपराध न राहता व्यवहार, शिष्टाचार होतो. तो गडद होतो त्या दिवशी, ज्या दिवशी पदाचा दुरुपयोग हा अपराध न राहता कर्तव्य, अधिकार वाटू लागतो. तो पूर्ण होतो त्या दिवशी, ज्या दिवशी समाज दुष्कृत्याचे समर्थन करू लागतो. सभ्यतेची खरी परीक्षा मंदिरे किती आहेत यावर होत नाही, ती होते निर्मनुष्य पथावर उभ्या असलेल्या माणसाने लाल सिग्नलपाशी थांबण्याच्या निर्णयावर. ती होते कुणी पाहत नसताना केलेल्या कृतीवर, कारण विधिनियम हे बाह्य नियंत्रण असते ; नीतिमत्ता हा अंतःकरणातील प्रहरी असतो.

दिवाकर बुरसे
पुणे, मो.९५५२६२९२४५

संस्कृती व्यक्तींची की तत्त्वांची?

इतिहासातील एक कठोर पण अटळ सत्य असे आहे व्यक्ती प्रेरणा देतात; संस्था संस्कृती टिकवतात. व्यक्ती दीपस्तंभ असतात; पण नौकेला किनाऱ्यापर्यंत पोहोचवते ती व्यवस्था असते. व्यक्ती मर्त्य असतात; तत्त्वे अमर असतात. आपल्याकडे निष्ठा व्यक्तींवरही असते आणि तत्त्वांवरही; परंतु आधुनिक लोकशाहीचे यश हे तत्त्वे आणि संस्था व्यक्तींपेक्षा मोठ्या मानण्यात असते. लोकशाही निवडणुकांनी जिवंत राहत नाही, ती नियमांवरील श्रद्धेने जिवंत राहते. न्यायालये इमारतींमुळे महान होत नाहीत, ती न्यायावर असलेल्या समाजाच्या विश्वासामुळे महान होतात. राष्ट्र महान नेत्यांमुळे महान होत नाही, राष्ट्र महान होते, जेव्हा सामान्य नागरिक स्वतःच्या स्वार्थापेक्षा सार्वजनिक हिताला मोठे मानू लागतात.

अवतारांची प्रतीक्षा

या भूमीची एक विलक्षण परंपरा आहे. अधर्म वाढला की आपण अवताराची कल्पना करतो. ही कल्पना निराशेची नाही; ती धर्मावर आणि नैतिक व्यवस्थेवर असलेल्या विश्वासाची अभिव्यक्ती आहे. परंतु त्याचबरोबर ती आपल्याला एक प्रश्नही विचारते समाजाच्या प्रत्येक वळणावर एखाद्या महामानवाची प्रतीक्षा करण्याऐवजी आपण स्वतः आपल्या जबाबदार नागरिक होऊ शकतो का?सुदृढ समाजांना महामानवांची गरज असते प्रेरणेसाठी; अस्तित्वासाठी नव्हे. ज्या समाजाचा नागरिक जागा आहे, ज्याच्या संस्था जाग्या आहेत आणि ज्याची सामाजिक नीतिमत्ता जागी आहे, त्या समाजाला उद्धारकर्त्यांची प्रतीक्षा करावी लागत नाही.

नव्या प्रबोधनाची हाक

आज भारतासमोरील सर्वांत मोठी समस्या केवळ कौशल्याची नाही; ती सार्वजनिक चारित्र्याची आहे. आपल्याला कार्यक्षम हातांची आवश्यकता आहेच; पण त्याहून अधिक आवश्यकता आहे उत्तरदायी मनांची. शाळा, महाविद्यालये अभियंते घडवू शकतात, विद्यापीठे तज्ज्ञ घडवू शकतात, पण समाजाला नागरिक घडवावे लागतात.

सामाजिक नीतिमत्ता हा क्रमिक अभ्यासक्रमाचा विषय नाही; तो संस्कारांचा विषय आहे. ती पाठ्यपुस्तकांतून शिकत नाही, ती घरात दिसली पाहिजे, शाळेत अनुभवली पाहिजे आणि सार्वजनिक जीवनात जगली पाहिजे. या प्रवासाचा श्रीगणेशा नेहमी इतरांकडून नव्हे, तर स्वतःपासूनच करावा लागतो.

अंतिम प्रश्न

आपल्या संस्कृतीने आपल्याला एक प्रश्न विचारायला शिकवले मी चांगला माणूस कसा होऊ? आजचा वर्तमान दुसरा प्रश्न विचारत आहे मी चांगला नागरिक कसा होऊ? कदाचित भारताच्या पुढील शतकाचे भविष्य या दोन प्रश्नांमधील अंतर घटविण्यात दडलेले आहे, कारण कोणत्याही राष्ट्राचा पुनर्जन्म क्रांतीने होत नाही, तो घडतो एका शांत क्षणी जेव्हा एखादा नागरिक प्रथमच सार्वजनिक गोष्टीला स्वतःची गोष्ट मानतो. जेव्हा अधिकारांइतकीच कर्तव्यांचीही जाणीव त्याला होते.जेव्हा मी प्रथमच आपण बनतो.आणि तेव्हाच समाज खऱ्या अर्थाने एकराष्ट्र होतो !



डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

आनंदी वाटचाल

# ज्ञान

ज्ञानातील सर्वोच्च ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान .हे प्राप्त करून आत्मानंदात लीन होणे हे सर्वोच्च ज्ञान होय. पण आधी भौतिक ज्ञान अध्यात्मज्ञान आणि तत्व ज्ञान हे असे ज्ञानाचे मुख्य तीन विभाग असून तीनही विभागातील ज्ञान यथा शक्ती संपादन करून सर्वज्ञानाच्या सहाय्याने भावना शुद्ध करणे असा ज्ञानाचा खरा आणि व्यापक अर्थ आहे .या शरीराला क्षेत्र असे म्हणतात .या शरीराला जो जाणतो त्याला क्षेत्रज्ञ असे म्हणतात ,आणि सर्व क्षेत्रात असणारा क्षेत्रज्ञ म्हणजे परमेश्वर .क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचे जे यथार्थ ज्ञान ते परमेश्वराचे ज्ञान होय.




आधी भौतिक ज्ञान हा सर्वज्ञानाचा पाया आहे. त्याचे विषय असंख्य आहे. विश्वातील चराचर गोष्टींचे जे यथार्थ ज्ञान हे आधी भौतिक ज्ञान होय.

विश्वाचा विस्तार म्हणजे आधी भौतिक ज्ञानाचे क्षेत्र फार मोठे होय

आधी भौतिक ज्ञान जितके जास्त असेल तितके चांगले असते. अध्यात्मज्ञान म्हणजे मनुष्य त्याचा आत्मा जन्मपूर्वी कोठे असतो? मरणा नंतर आत्म्याचे काय होते ?हे विश्व कोणी निर्माण केले ?कसे केले? ते कोण चालवतीतो ?या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधणे हे अध्यात्म . अध्यात्म ज्ञानापासून लाभणाऱ्या उच्च स्थानाला ब्रह्मानंद असे म्हणतात .नुसत्या शाब्दिक ज्ञानाने तो मिळू शकत नाही .स्वतः विचार करता करता जेव्हा एखाद्या विशिष्ट विश्वाचे गूढ उकलले असे वाटून स्वतःच्या बुद्धीचे पूर्ण समाधान होते व बुद्धी प्रसन्न होते तेव्हाच खरा ब्रह्मानंदाचा लाभ होऊ शकतो.

मनुष्याच्या व्यक्तीगत आणि सामाजिक जीवनावर त्याच्या अध्यात्म विचारांचा किंवा मतांचा सर्वात जास्त परिणाम होतो .अध्यात्म विचारानुसार व्यक्ती आणि समाज यांचे गुणाव गुण बदलतात.

धर्मप्रेम, देश प्रेम, गुरुभक्ती, स्वामीभक्ती, पतिनिष्ठा, शिलनिष्ठा, कर्तव्यनिष्ठा धर्मद्रोह, देशद्रोह, गुरुद्रोह कर्तव्य भ्रष्टता इत्यादी गुणावगुणाच्या मुळाशी निरनिराळ्या व्यक्ती आणि समाज यांचे भिन्न भिन्न अध्यात्म विचार असतात. अध्यात्म विचारानुसार होणारा फरक धर्मांतरीत व्यक्ती आणि समाज यांच्या जीवनात स्पष्टपणे दिसून येतो .स्वतःचा प्राण सुख संपत्ती संस्कृती समाज स्वातंत्र्य इत्यादी गोष्टी मनुष्याला प्रिय असतात पण त्यापैकी कोणत्याही गोष्टीला कोणत्या वेळी किती किंमत द्यावयाची ही प्रत्येक मनुष्य स्वतःच्या अध्यात्म विचारानुसार ठरवितो ,आणि त्याच्या दृष्टीने जी गोष्ट जास्त मोलाची असते तिच्या करता तो इतर गोष्टींचा स्वैच्छेने त्याग करतो. व्यक्तींच्या मनातील भावना शुद्ध होण्याकरिता, बुद्धीला स्थिरता येण्याकरीता, आत्म्याला शांती लाभण्याकरिता, व्यक्तीचे जीवन सुखी आणि यशस्वी होण्याकरता व त्याचबरोबर अखिल माणूस समाजात शांती आणि सौख्य नांदण्याकरिता अध्यात्म विचारा इतके तर्कशुद्ध आणि श्रेष्ठ दुसरे कोणतेही नाही.

ऐहिक व्यवहारात मनुष्याने कोणत्या तत्त्वानुसार वागले पाहिजे यासंबंधीचे जे ज्ञान असते त्याला त्या ज्ञानाला तत्वज्ञान असे म्हटले जाते. मनुष्याने कोणती कर्मे करावी व कोणती कर्मे करू नयेत. जी कर्मे करावयाची ती का आणि कोणत्या उद्देशाने करावयाची इत्यादी प्रश्नांचा निर्णय करण्याकरिता निश्चित तत्वाचे ज्ञान मनुष्याला नसले तर त्याला आपल्या कर्तव्याचा निर्णय करता येत नाही व त्याच्या हातून विपरीत कर्मे घडून त्याचे जीवन दुःख मय ,संकटमय आणि असमाधानी होण्याची भीती असते. तत्वाचे बंधन कर्माला नसले म्हणजे मनुष्याच्या हातून विपरीत कर्मे होत जाऊन अनिष्ट रूढी अस्तित्वात येतात .

धर्म रूढी निती इ.चे मूळ काय ती साध्ये आहेत की साधने आहेत. मनुष्याचे अंतिम साध्य काय. पारलौकिक कल्याण श्रेष्ठ की आहे कर्तव्य श्रेष्ठ. पारलौकिक कल्याण आणि ऐहिक कर्तव्य यांच्यामध्ये विरोध असू शकतो काय? ऐहिक कर्तव्य ठरवण्याची कसोटी कोणती इत्यादी प्रश्नांचा निर्णय तत्त्वज्ञानाशिवाय करता येत नाही . तत्वज्ञान म्हणजे ज्या ज्ञानाच्या आधारे समाज पुढे जातो ते ज्ञान होय.जहाजाला जसे समुद्रात होकायंत्र दिशा दाखवते त्याप्रमाणे तत्वज्ञान समाजाला दिशादर्शक असते असे म्हटले तरी चालेल .

बुद्धी आणि ज्ञान या दोन अंगानी मनुष्य जीवन परिपूर्ण होत असते. या दोन अंगाची योग्य आणि परिपूर्ण वाढ होण्यासाठी काही इतर अंगाची व व्यापारांची आवश्यकता असते .त्या अंगाचा आणि व्यापाराचा चांगला योग्य विकास झाला की ज्ञान आणि बुद्धी यांचा विकास होतो. व या दोन अंगाचा विकास झाला की मानवी जीवन परिपूर्ण होते .ती अंगे आणि व्यापार कोणते याचा विचार पुढे करणे अत्यंत गरजेचे आहे .तर मानवी जीवनाची आनंदाकडे वाटचाल योग्य रीतीने होऊ शकेल.



डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

उमलत्या कळ्या

# मदत

ओवी यंदा पहिल्यांदाच आपल्या आई-वडिलांसोबत कोकणातील फार्महाऊसवर आली होती. याअगोदर तिच्या आई-वडिलांनी तिला फार्महाऊसवर येण्यासाठी बऱ्याचदा सुचवले होते. मात्र दहावीची परीक्षा झाल्याशिवाय मी तिकडे जाणार नाही, असं तिने मनातून ठरवलं असावं.

दहावीची परीक्षा संपल्यावर चार दिवसांनी सह्याद्रीच्या कुशीत एका गावाजवळील फार्महाऊसवर ओवी तिच्या आई-वडिलांसोबत आली तेव्हा मात्र ती मनातून हळहळली. उंच डोंगर, लाल पायवाटा, बहरलेला बहावा, फुललेले पळस आणि आटलेल्या नदीतले दिसणारे छोटे-मोठे दगड-गोटे पाहून तिला खूप आनंद झाला. आपण यापूर्वीच इथे यायला हवे होते, असं तिला मनोमन वाटले.

फार्महाऊस मधील बागेची निगराणी करणारे एक कुटुंब जवळच राहत होते. कुडाच्या भिंती आणि गवताचे छप्पर असलेलं घर पाहून ओवीला ते घर आत जाऊन पाहण्याची इच्छा झाली. बागेची निगराणी करणाऱ्या वसंतकाकांनी ओवीला ओंजळभर मोगऱ्याची फुले आणून दिली. त्यांना थँक्यू म्हणताना तिने विचारले, मला तुमचं घर दाखवाल?

खरंतर वसंतकाकांना मनातून खूप आनंद झाला. ते हातातील काम सोडून ओवीला आपल्या घरी घेऊन आले. वसंतकाकांची उर्मिला अंगण सारवत होती. घरी आलेल्या ओवीला पाहून तिला आश्चर्य वाटलं. तिने भरभर आवरलं, हातपाय धुतले नि ओवीला घेऊन घरात आली. वसंतकाका पुन्हा फार्महाऊसमध्ये निघून गेले.

उर्मिलाने आपलं घर, परसबाग, अंगण, घरामागील चिंचेचं झाड, लांबून दिसणारी विहीर असं सारं काही दाखवलं. दोघींच्या गप्पा रंगात आल्या. जणू काही त्या जुन्या मैत्रिणी असल्यागत एकमेकींशी बोलत होत्या.

तू कोणत्या शाळेत जातेस? ओवीने विचारले.

मी गेल्यावर्षी बारावीची परीक्षा पास झाले. उर्मिलाने सांगितले.

मग तुझं कॉलेज कुठे आहे?

इथून जवळपास तीस किलोमीटरवर अंतरावर कॉलेज आहे.

येण्या-जाण्यासाठी बसची सोय नाही, त्यामुळे कॉलेजला डमिशन नाही घेतले, उर्मिला सांगत होती.

मग पूर्ण दिवसभर घरीच राहतेस? ओवीचा प्रश्न.

घरात खूप काम असते. आई रानात जाते. आजी हायवेला जांभळं, आवळं, आंबे विकायला जाते. बापू तुमच्या फार्महाऊसमध्ये जातात. त्यामुळे घरातलं बरंचसं काम मलाच उरकावी लागतात, कामामध्येच दिवस संपतो.

तुझ्या आजीचे फळांचे दुकान आहे काय? ओवीने विचारले.

अगं दुकान वगैरे नाही. ती रानातून जांभळं, करवंद आणते नि हायवेवरून जाणाऱ्या गाडीतल्या प्रवाशांना विकते. उर्मिलाने सांगितले.

मग भरपूर फळे विकली जात असतील ना? ओवीचा प्रश्न.

अगं तिथे फक्त माझी आजी एकटीच नसते. वरच्या गावातली बरेच पुरुष-स्त्रिया रस्त्याच्या कडेला उभे राहून आंबे, जांभळं विकायला जातात.

मग तुझ्या आजीला रोज किती रुपये मिळतात? ओवीने विचारले.

मी कधी विचारले नाही पण ती मिळालेल्या पैशातून काहीबाही सामान आणत असते. उरलेल्या काही नोटा तिच्या कमरेच्या चंचीत असतात. कधी-कधी मला ती पैसे देतेही. पण तिची धावपळ बघून मला खूप वाईट वाटतं.

कसली धावपळ? आणि कशासाठी? ओवी.



अगं आजी आधी रानात जाते. मग मिळतील ती फळं गोळा करते. कधी-कधी फारच कमी फळं मिळतात. काट्याकुट्यातून जावं लागते. गोळा केलेली फळं रस्त्याच्या कडेला उभं राहून विकावी लागतात. धावणाऱ्या गाडीतील प्रवाशांना दिसतील अशा तऱ्हेने टोपलीत फळं दाखवावी लागतात. दूर जाऊन थांबणाऱ्या वाहनाच्या मागं धावपळ करावी लागते. कधी-कधी गिऱ्हाइकाला फळं पसंत पडत नाहीत. मग संध्याकाळ होईपर्यंत फळं विकण्यासाठी थांबावं लागतं.

उद्या जायचं का आपण आजीसोबत? तू म्हणतेस ते मला बघायचंय. चल जाते मी. भेटू उद्या असं म्हणून ओवी फार्महाऊसवर परतली.

उर्मिलाचं कॉलेजला न जाणं आणि तिच्या आजीचं हायवेला उभं राहून फळं विकणं ओवीच्या मनातून जात नव्हतं. उर्मिलाचा बोलका नि भोळा स्वभाव तिला आवडला होता.

दुसऱ्या दिवशी आईबाबांची परवानगी घेऊन ती उर्मिलासोबत हायवेकडे गेली. जातानाही त्यांच्या गप्पा रंगल्या होत्या.

तुझं घड्याळ किती छान आहे ना? उर्मिलाने म्हटलं.

मी आणि माझी वर्गमैत्रीण एका मॉलमध्ये गेलो होतो, तेव्हा घेतलंय हे घड्याळ. ओवी.

मॉल खूप मोठा असतो ना गं? काय गं हे खरंय की तिथे वस्तू द्यायला कोणी नसते. आपणच वस्तू निवडायच्या नि खरेदी करायच्या.

हो, असंच असतं. आपण हव्या त्या वस्तू हाताळू शकतो. प्रत्येक वस्तूवर किंमतही लिहिलेली असते, त्यामुळे आपल्यालावस्तू खरेदीबाबत योग्य निर्णय घेता येतो. ओवी.

दोघी चालत हायवेवर आल्या. उर्मिलाने लांबूनच हात दाखवून म्हटलं, ती बघ माझी आजी.

तेवढ्यात एक पांढऱ्या रंगाची कार रस्त्यावरून जात होती. आजी थोडे पुढे येत हातातील टोपली उंचावत, त्यातले आंबे दाखवत, गाडी थांबवा, असं दुसऱ्या हाताने खुणा विनवत होती, मात्र कार थांबली नाही. आजी परत मागे सरकली नि पुन्हा त्याच जागेवर येऊन उभी राहिली. लगेचच दुसरी कार आली. आजीने पुन्हा टोपलीतले आंबे दाखवत गाडी थांबवण्यासाठी हात दाखवला. गाडीचा वेग कमी झाला. तसे आणखी तीन-चार विक्रेते गाडीजवळ जमा झाले. आजीला वेगाने चालता येत नव्हते. गाडीतील प्रवाशांनी दुसऱ्याच विक्रेत्याकडून आंबे घेतले नि ते निघून गेले.

उर्मिला नि ओवी चालत-चालत आजीजवळ आल्या. आजीला वाटले की नात काहीतरी निरोप घेऊन आली असेल. उर्मिलाने ओवीची ओळख सांगितली. आजीने टोपलीतले निवडून दोन आंबे दोघींच्या हातात दिले.

घ्या खा. मस्त गोड आहेत.

आजी, इथे उन्हात थांबण्यापेक्षा तिथे सावलीत बसून आंबे का नाही विकत? ओवीने विचारले.

लेकी! इथं वळण आहे म्हणून गाड्यांचा वेग कमी होतो. म्हणून आम्ही सगळेजण इथं थांबतो.

पण सगळेजण एकाच जागेवर थांबले तर सगळ्यांचा धंदा कसा होईल?;

तुझं म्हणणं पटतंय मला! पण पोट सगळ्यांनाच आहे. सगळ्यांना थोडं थोडं मिळालं पाहिजे. आजीच्या बोलण्याचा ओवी विचार करू लागली. दुसऱ्या टोपलीतील आंबे दाखवत आजी म्हणाली, हे रसाचे आंबे आहेत. तुम्हाला दिले ते चोखून खायचे आंबे आहेत. हे छोटे-छोटे आंबे आहेत ना त्यांना शेपूआंबा म्हणतात. त्यांना शेपूच्या भाजीसारखा वास येतो.

आजीचे बोलणे ऐकून ओवीला तर नवल वाटले. सूर्य माथ्यावर येईपर्यंत त्या दोघी तिथे थांबल्या नि परत घराकडे निघाल्या. येताना ओवीने आपल्या मनातील एक कल्पना उर्मिलाला सांगितली. उर्मिलालाही तिची कल्पना पटली. त्या दिवशी दोघींनी गावठी आंबे - पन्नास रुपयांना एक डझन, चोखायचे आंबे - चाळीस रुपये डझन, रसाचे आंबे - तीनशे रुपये डझन, शेपूआंबे - दोनशे रुपये किलो. असं पांढऱ्या कागदावर लाल गडद रंगानं लिहिलं. चारी कागद जाड पुठ्ठ्यावर चिकटवले. चार काठ्यांना हे बोर्ड बांधले.

पुढच्या दिवशी सकाळी दहाच्या सुमारास दोघी पुन्हा हायवेकडे आजीला भेटण्यास गेल्या. ओवीने आजीच्या हातातील गावठी आंब्याचे टोपले घेतले. दुसऱ्या हातात त्याच नावाचा बोर्डही घेतला. दुरून येणाऱ्या प्रवाशांना आंब्यांचा दर किती आहे आणि बाजारभावापेक्षा कमी आहे हे दिसताच ते गाडी थांबवायचे. आजीचे आंबे त्या दिवशी लवकरच संपले. ओवीने आजीला नेमका बोर्ड ओळखता यावेत म्हणून उर्मिलाने त्यावर वेगवेगळ्या खुणा केल्या, त्या खुणा आजीला समजावूनही सांगितल्या.

गुणाच्या गं माझ्या पोरी. आजीचे शब्द मनातल्या मनात घोळवत दोघी घरी परतल्या.

# शब्दसाधना : चोवीस वर्षांच्या साहित्ययज्ञाचा सुवर्णक्षण



शब्दांची उपासना... साहित्याची जोपासना... हे केवळ आमचे ब्रीदवाक्य नाही, तर गेली चोवीस वर्षे जगलेले आमचे जीवनमूल्य आहे. दि. जुलै रोजी जे. आर. सिटी हायस्कूल, धुळे येथे 'शब्दसाधना'चा चोवीसावा वर्धापनदिन सोहळा अत्यंत दिमाखदार, उत्साहपूर्ण आणि अविस्मरणीय वातावरणात संपन्न झाला.

चोवीस वर्षांचा हा प्रवास मागे वळून पाहताना मन कृतज्ञतेने भरून येते. हा प्रवास ना सहज होता, ना सोपा. अनेक अडथळे, अनेक संकटे, अनेक परीक्षा आल्या; पण प्रत्येक वेळी आदरणीय प्रा. सुनंदा वैद्य मॅडम यांचे मार्गदर्शन आमच्यासाठी दीपस्तंभ ठरले. त्यांच्या प्रेरणेने आम्ही प्रत्येक संकटावर मात करत आज अभिमानाने पंचविसाव्या वर्षात पदार्पण केले.

'शब्दसाधना' ही संस्था नसून एक संस्कारमय साहित्यपरिवार आहे. येथे पदांची स्पर्धा नाही, सत्तेची लालसा नाही, प्रसिद्धीची अपेक्षा नाही. येथे आहे ती फक्त शब्दांवरील नितांत प्रेमाची आणि साहित्यसेवेची निःस्वार्थ साधना. गेली चोवीस वर्षे प्रा. सुनंदा वैद्य मॅडम, दर्शन नेरकर आणि मी संजय धनगव्हाळ कोणतेही पद न घेता केवळ साहित्यप्रेमातून ही वाट चालत आहोत.

या प्रवासात काव्यस्पर्धा, कविसंमेलने, दिवाळी पहाट, साहित्य मैफिली आणि अनेक आगळे-वेगळे उपक्रम राबवून असंख्य नवोदित कवींना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे भाग्य आम्हाला लाभले. ज्येष्ठ साहित्यिकांचे मोलाचे मार्गदर्शन, त्यांच्या विधायक सूचना आणि रसिकांचे निरपेक्ष प्रेम यामुळे प्रत्येक कार्यक्रम अधिक समृद्ध होत गेला. यंदाचा वर्धापनदिन सोहळा हा शब्दांचा, भावनांचा आणि साहित्यप्रेमाचा उत्सव ठरला. ख्यातनाम गझलकार आदरणीय बाळासाहेब गिरीश, सुप्रसिद्ध कवी संजय आहेर, शिवव्याख्याते प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी, सिद्धेश्वर मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. संजय संघवी तसेच नवजीवन ब्लड बँकेचे प्रमुख डॉ. सुनील चौधरी यांनी आपल्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा अनेकपटींनी वाढवली.

संजय धनगव्हाळ
मो.९४२२८९२६१८

महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या कवी-रसिकांनी काव्यगायन स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रत्येक कवितेतून संवेदना, विचार आणि जीवनदृष्टी उमटत होती. आदरणीय बाळासाहेब गिरीश यांच्या गझलांनी सभागृह मंत्रमुग्ध झाले, तर संजय आहेर यांच्या कवितांनी शब्दांचा मधुर गोडवा अनुभवायला दिला. प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण परीक्षण करून उत्कृष्ट कवितांची निवड केली आणि आपल्या विचारपूर्ण मार्गदर्शनातून कवींच्या लेखणीला नवी ऊर्जा दिली.

भरलेले सभागृह, टाळ्यांचा कडकडाट, कवितांवर दाद देणारे रसिक आणि साहित्याविषयीचा अपार आदरया सर्वांनी वर्धापनदिन सोहळ्याला एका सांस्कृतिक पर्वाचे स्वरूप प्राप्त करून दिले.

या सोहळ्यामागे तीन महिन्यांची अथक मेहनत, नियोजन आणि असंख्य सहकाऱ्यांचे निःस्वार्थ योगदान दडलेले होते. कार्यक्रमाची सांगता होताना मन भरून आले. एकमेकांना मिठी मारताना डोळ्यांत आनंदाश्रू दाटले. तो क्षण शब्दांत मांडणे आजही कठीण आहे.

आज आम्ही जे काही आहोत, ते साहित्यप्रेमी, कवी, मान्यवर, रसिक आणि शुभेच्छुक यांच्या प्रेमामुळेच. हा सन्मान आमचा नसून शब्दांवर श्रद्धा ठेवणाऱ्या प्रत्येक साहित्यप्रेमीचा आहे.

साहित्य ही समाजाला संस्कार देणारी शक्ती आहे. शब्द हे केवळ अक्षरांचे समूह नसतात; ते माणसाच्या मनाला माणुसकीची ओळख करून देतात, विचारांना दिशा देतात आणि पिढ्यान्पिढ्या संस्कृतीचे संवर्धन करतात. यापुढेही शब्दांची उपासना, साहित्याची जोपासना हा ध्यास अधिक जोमाने, अधिक व्यापकतेने आणि अधिक समर्पित भावनेने पुढे नेण्याचा आमचा निर्धार आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवरांचे, कवीबंधू-भगिनींचे, परीक्षकांचे, रसिकांचे आणि आमच्या प्रत्येक सहकाऱ्याचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो. आपले प्रेम, सहकार्य आणि आशीर्वाद असेच सदैव लाभोत, हीच नम्र अपेक्षा.

**धन्यवाद!**

# हरिनाम - आत्म्याला पावन करणारे अमृत

रामचंद्र कबाडी

देहाला स्वच्छ ठेवण्यासाठी रोज पाण्याची आंघोळ आवश्यक असते. शरीरावरील धूळ, मळ आणि थकवा पाण्याने दूर होतो. पण मनावर साचलेला अहंकार, मत्सर, लोभ, क्रोध, मोह आणि चिंता यांचा मळ कोणत्या पाण्याने धुवायचा? त्यासाठी एकच उपाय आहेहरिनामाची आंघोळ.

ज्या क्षणी ओठांवर प्रेमाने रामकृष्ण हरी, विठ्ठल विठ्ठल, श्रीराम जय राम जय जय राम किंवा ईश्वराचे कोणतेही नाम येते, त्या क्षणी मनाला एक विलक्षण शांतता लाभते. हरिनाम हा केवळ उच्चार नाही; तो आत्म्याला परमात्म्याशी जोडणारा दिव्य सेतू आहे. नामस्मरणाने मनातील अस्वस्थता विरघळते, विचार शुद्ध होतात आणि जीवनाला नवी दिशा मिळते.

भक्ती ही केवळ बाह्य आडंबरात नसते. मोठमोठे विधी, दिखाऊ पूजा किंवा लोकांना दाखवण्यासाठी केलेली भक्ती परमेश्वराला प्रिय नसते. देवाला हवे असते ते निर्मळ मन, निष्कपट प्रेम आणि अखंड नामस्मरण. ज्या भक्ताच्या हृदयात प्रेम, दया, क्षमा आणि नम्रता असते, त्याच्याच ओठांवरील हरिनाम परमेश्वरापर्यंत पोहोचते.

संतांनी नेहमी सत्संगाचे महत्त्व सांगितले. कारण सत्संग म्हणजे चांगल्या विचारांचा सहवास, संतवचनांचा सुगंध आणि हरिनामाचा अखंड गजर. सत्संगात राहिल्याने मन अंतर्मुख होते. स्वतःच्या चुका दिसू लागतात, अहंकार विरघळतो आणि आत्मज्ञानाची वाट खुली होते. बाहेर देव शोधण्यापेक्षा, अंतःकरणात त्याची अनुभूती घ्यायला मन तयार होते.

जेव्हा जीव आणि शिव यांची भेट घडते, तेव्हा जीवनातील प्रत्येक क्षण प्रसन्न होतो. हरिनामाची गोडी लागली की संसार सोडावा लागत नाही; उलट संसार अधिक सुंदर, संयमी आणि आनंदी होतो. संकटे येतात, दुःख येते, परीक्षाही येतात; पण हरिनामाचा आधार असला की मन कधीच कोसळत नाही. कारण नाम हेच धैर्य, नाम हाच आधार आणि नाम हाच खरा जीवनसाथी असतो.

लक्षात ठेवा...

देहाची आंघोळ शरीराला स्वच्छ करते; पण हरिनामाची आंघोळ मन, बुद्धी आणि आत्मा पवित्र करते. जिभेवर हरिनाम, हृदयात प्रेम, आचरणात नम्रता आणि जीवनात सत्संग असेल, तर प्रत्येक दिवस हा ईश्वराच्या कृपेचा उत्सव ठरतो.

संत म्हणतात

धन, मान, वैभव आणि कीर्ती क्षणभंगुर आहेत; पण हरिनामाचे धन कधीच कमी होत नाही. ज्याच्या ओठी नाम, त्याच्या हृदयी राम; आणि ज्याच्या हृदयी राम, त्याचे संपूर्ण जीवनच परम आनंदाचे धाम बनते.

**रामकृष्ण हरी । विठ्ठल विठ्ठल । श्रीराम जय राम जय जय राम।**

**जय हिंद...**

# आदर्श बचत धोरण

**(पान ३ वरुन)** दरवर्षी भविष्यकालीन तरतुदीसाठी काही रक्कम बाजुला ठेवली जात असे. सरकारी उद्योगधंदे अथवा आर्थिक व्यवहार यापासुन होणारा फायदा सरकारी खात्यात जमा होत असे. युध्दातील लुट सरकारी जमा होत असे. टांकसाळीचे उत्पन्न सरकारी मलकीचे असे.

**आर्थिक हिताचे धोरण-** छत्रपतींनी आर्थिक हिताचे धोरण राबवून बचतीच्या धोरणाला प्राधान्य दिले. मिऱ्यांच्या व्यापारासाठी प्रसिध्द असलेले बसरूर बंदर ८५ गलबते व तीन मोठी जहाजे यांच्यासह हल्ला करून लुटले. ही संपत्ती स्वराज्यातील रयतेच्या कल्याणासाठी वापरली. स्वराज्यात सुसज्ज अशी व्यापारी जहाजे होती. अरबस्थान, इराण अगदी मस्कत बरोबर व्यापार सुरू केलेला होता. स्वराज्याची सागरी जहाजे संपुर्ण सागरामध्ये संचार करत होती. मिठाच्या व्यापाराचे जाळे तर जगभर विणलेले होते. नारळ, सुपारी या व्यापारात ही स्वत:ची मक्तेदारी निर्माण करून मोठ्या प्रमाणात आर्थिक हित साधले.

**फायनान्स मिनिस्टर-**स्वराज्याच्या केंद्रिय अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली जिल्हयाच्या मुलकी कारभाराची व्यवस्था असे. जिल्हयाचे हिशोब आमात्य व सचिव यांच्याकडे होते. आज आपण त्यांना फडणीस म्हणजेच फायनान्स मिनिस्टर व जनरल अकाऊटंट व ऑडिटर म्हणतो. या दोन अधिकाऱ्याकडे संपूर्ण जिल्हयाचे हिशोब पाठविले जात असत. हे अधिकारी जिल्हयाचे कामकाज पाहण्यासाठी त्यांच्या हाताखाली इतर अधिकारी नोकरही नेमत असत.महाराजांचा बँकिंग व्यवहार श्रेष्ठ दर्जाचा होता.स्वराज्यामध्ये डिमांड ड्राफ्टव्दारे आर्थिक व्यवहार करणे हे काळाच्या पुढचे पाऊल होते.

**दुरदृष्टीचे बचत धोरण-**छत्रपतींचे वाणिज्य विषयक धोरण बचतीच्या बाबतीमध्ये केवढे दूरदृष्टीचे होते ते दिसून येते. महाराजांनी होन हे नाणे प्रचारात आणले व ते चलनपध्दतीचे परिमाण बनले. स्वराज्याची राजधानी रायगडावरती नाणी पाढण्याची टाकसाळ होती.छत्रपतींच्या कालखंडातील नाणे प्रकाराचा आढावा घेता आपणास असे दिसुन येईल की सोन्याचे होन, तांब्याची शिवराई व चांदीची लारी हे नाणे प्रकार दिसुन येतात. स्वराज्याच्या बाहेरून येणाऱ्या मालावर जकात घेतली जात असे. मराठयांनी शत्रूच्या ताब्यातील प्रदेशात पैसा मिळविल्यास तो सरकारात जमा करावा लागत असे.

छत्रपतींचे हे बचतीचे धोरण आज काटेकोरपणे राबविणे आवश्यक आहे. छत्रपतींच्या बचत विषयक धोरणामुळे स्वराज्याची आर्थिक भरभराट होत गेली. त्यांच्या या सक्षम अर्थनितीमुळे स्वराज्यातील रयतेचे जीवन सुखी झाले.त्यांना अनेक शत्रूबरोबर संघर्ष करावा लागला. शत्रूच्या स्वराज्यावर वारंवार स्वाऱ्या व मोहिमा होत असत. तरीही स्वराज्याची अर्थव्यवस्था शिलकी व स्वयंपूर्ण राहिली. छत्रपतींनीयोग्य नियोजनाव्दारे आर्थिक धोरणाची आखणी करून वाणिज्य धोरण सक्षम ठेविले. छत्रपतींचे स्वतंत्र असे बचत व्यवस्थापन आजही आपणास मार्गदर्शक आहे.

# राष्ट्रीय योगदानात खानदेशातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान




(उत्तरार्ध)

राष्ट्रीय आंदोलनाच्या काळात गांधी विचारांनी प्रेरित झालेल्या व्यक्तिमत्त्वांची संख्या खानदेशात फार मोठी होती.त्यातील रामेश्वर पोद्दार हे महत्वाचे नाव.गांधींप्रती आजीवन निष्ठा ठेवून सामान्यांकरिता, राष्ट्राकरीता जीवन समर्पित करणारे रामेश्वर पोद्दार हे आजही नव्या पिढीला प्रेरणा देत आहे. धुळे कारागृहात पूज्य विनोबा भावे, साने गुरुजी, जमनालाल बजाज यांच्याशी आलेला संबंध याच अनुषंगाने खान अब्दुल गफ्फार खान, महात्मा गांधी, गुलजारीलाल नंदा, पंडित नेहरू, कस्तुरबा गांधी, महादेवभाई देसाई यासारख्या महान व्यक्तिंच्या सहवासात राहिले.

### निस्सीम भक्त :-

मनाने रामेश्वरजी निस्सीम भक्त होते. ईश्वरावर त्यांची जेवढी श्रद्धा होती त्यापेक्षा बहुधा कांकणभर अधिक गांधी, विनोबा आणि शिवाजी आबांवर होती. देशभक्तीत आकंठ बुडालेल्या रामेश्वरजींना पत्र लिहिणे हा एक मुख्य छंद होता. आपल्या वेळच्या बहुतेक सर्व श्रेष्ठ राजकीय- सामाजिक कार्यकर्त्यांशी त्यांचा परिचय होता. त्या सर्वांशी त्यांचा नित्य पत्र व्यवहार होत असे. केवळ धुळ्यातच नव्हे तर संपूर्ण खानदेशात इतक्या वेगवेगळ्या नेत्यांशी इतका निरंतर पत्रव्यवहार करणारी दुसरी कुणी व्यक्ती नसावी.

बापूजी, विनोबा, बाळकोबा, शिवाजीराव भावे, जमनादास बजाज, श्री मन्नारायण, मदालसाबेन,राजाजी, मोरारजी भाई, राजेंद्र प्रसाद ऋषभदास राका, श्रेयांस प्रसाद जैन, निर्मला देशपांडे ,दादा धर्माधिकारी, चंद्रशेखर धर्माधिकारी, ठाकूरदास बंग, कमलनयन बजाज इत्यादी राष्ट्रीय आंदोलनातील नेत्यांचा तो धामाधुमीचा काळ होता... राष्ट्रीय आंदोलनातील महापुरुषांची ही पत्रे होती. सर्व माणसे एकिकडे घरादारावर तुळशीपत्र ठेवून देशाचा संसार करण्यात मग्न होती,पण दुसरीकडे एखाद्या साध्या सुद्धा कार्यकर्त्याच्या दैनंदिन जीवनातील अडचणी सोडविण्यासाठी तितक्यात तत्परतेने धावत होती. रामेश्वरजींनी लिहिलेली व त्यांना आलेली बहुतेक पत्रे खुद्द बापू-विनोबांच्या हस्ताक्षरातली आहेत. ही पत्रे म्हणजे खानदेशच्या संस्कृती व सामाजिक संपन्नतेच्या ठेवा आहे. तत्कालीन समाज संस्कृतीच्या आरसा आहे.

### खानदेश गोशाळा व महात्मा गांधी तत्वज्ञान मंदिराची स्थापना-

रामेश्वरजींची गांधी-विनोबांवर अतूट श्रद्धा होती. ती जीवनाच्या शेवटपर्यंत तशीच कायम राहिली. मुंबई आग्रा महामार्ग लगत मालेगाव रोडवरील जागेवर १९३५ मध्ये गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली खान्देश गोसेवा श्रमांतर्गत 'खान्देश गोशाळे'ची स्थापना करण्यात आली, जी आजही पोद्दार कुटुंबातील वारसदार चांगल्या पद्धतीने चालवित आहेत. खानदेश गोशाळेच्या जागेतील काही भागाचा इ.स. १९४६ मध्ये महात्मा गांधी तत्वज्ञान मंदिर (सध्याचे महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र)या नावाने एक ट्रस्ट करण्यात आला. तेथे कस्तुरबा अभ्यास कुटीर आणि महादेवभाई भवन बांधण्यात आले. (१९४९) याच अभ्यास कुटीरात बसून श्री. शिवाजीराव भावे यांनी वि. का. राजवाडे यांच्या ज्ञानेश्वरी कोशाचे कार्य पार पाडले होते. महादेवभाईंचा मृत्यू इ.स. १९४२ ला पुणे येथे झाला. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देशातले पहिले भवन धुळ्याच्या या गांधी तत्त्वज्ञान मंदिरात उभे राहिले. 'कस्तुरबा अभ्यास कुटीर' ही कस्तुरबांची स्मृति आहे. महात्मा गांधी यांच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास, प्रचार- प्रसाराच्या या कार्याला गतिमानता यावी या हेतूने १९९५ मध्ये या केंद्राचे हस्तांतरण विद्यापीठाकडे करण्यात आले. गांधी तत्त्वज्ञान व विचार यावर आधारित विविध उपक्रम या ठिकाणी राबविले जातात. महात्मा गांधी आणि त्यांचे विचार, निष्ठा व प्रेमाचे प्रतीक असलेल्या या केंद्राच्या माध्यमातून महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार समाजातील विविध घटकांमध्ये आजही निरंतरपणे सुरू आहे.




स्वातंत्र्य सैनिक रामेश्वर पोद्दार...

### धुळे कारागृह आणि गीताई

राष्ट्रीय आंदोलन, धुळे कारागृह आणि गीताई यांचा संबंध महत्त्वाचा राहिलेला आहे .गीताप्रवचनांप्रमाणे गीताईचा अवतार सुद्धा धुळे कारागृहातच झालेला आहे. १९३२-३३ सालात गीताईच्या प्रचारासाठी मुख्यतः श्री. शिवाजीराव भावे यांनी सगळा महाराष्ट्र पायाखाली घातला. त्यांचे वास्तव्य धुळ्याला असायचे. धुळेकरांचा व शिवाजीराव आबांचा घनिष्ट संबंध पूर्वीपासूनच होता.

विनोबांचे वडील नरहर भावेंनी आपले सर्व आयुष्य एखाद्या तपस्वी ऋषी-मुनी प्रमाणे नितांत निरपेक्षपणे घालविले.वृद्धावस्थेत खूप आजारी पडल्यामुळे त्यांना शिवाजीरावांनी १९४७ साली बडोद्याहून धुळ्याला आणले. गोशाळेत त्यांनी काही दिवस काढले. वैद्यकीय उपचार सुरू होते. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. २९ ऑक्टोबर १९४७ ला त्यांचा मृत्यु झाला. गांधी तत्वज्ञान मंदिराच्या आवारातच त्यांचा दाह संस्कार होऊन तेथे एक समाधी बांधण्यात आली. पुढे जाऊन शिवाजीराव भावेंचेही निधन धुळ्यात झाले याच परिसरात पिता-पुत्रांची समाधी स्थळे आहेत.

रामेश्वरजींना अनेक शारीरिक व्याधींनी सतत छळले. आयुष्याच्या अखेरीला त्यांना अंधत्व आले होते. त्याही स्थितीत त्यांचा लेखन, वाचनाचा उत्साह अखंडित होता.ते रोजची वर्तमानपत्रे, पुस्तके मासिके कुणा ना कुणाकडून वाचून घेत. 'भारत मंडळा'चे ते ट्रस्टी होते.'स्वतंत्र भारत' साप्ताहिकासाठी त्यांच्या लहान मोठ्या सूचना अगदी न चुकता प्राप्त होत असत. त्यांच्याशी ज्या अनेकदा गप्पागोष्टी होत त्यात त्यांच्या वाचन व चिंतनाबरोबर सरळ ऋजू व्यवहारिकताही झळकत असे. विचारवंतांनाही ते अगदी बारीक- बारीक माहिती विचारीत. त्यांच्यातला जिज्ञासू शेवटपर्यंत जागृत होता. रामेश्वरजींच्या राष्ट्रीय आंदोलनातील या कार्यात खांद्याला खांदा लावून त्यांच्या सौभाग्यवती गंगुताई यांनी शेवटपर्यंत साथ दिली. ७ फेब्रुवारी १९८० ला रामेश्वरजींना वृद्धावस्थेमुळे मृत्यू आला.त्यांची समाधी ही गोशाळाच्या आवरातच आहे.




## साहित्य, कला व संस्कृतीचे प्रतिबिंब... 'माझा खानदेश'

दिवंगत भाई मदाने संस्थापित दैनिक आपला महाराष्ट्र आजही भांडवलशाहीच्या पत्रकारितेच्या प्रवाहात आपली खणखणीत समकालीन पत्रकारिता जपून आहे ! नव्हे , विद्यमान संपादक श्री. हेमंत भाऊ मदाने जी, श्री.रमेश अण्णा दाणे , 'बहर' पुरवणीचे संपादक श्री. विकास कपोले यासारखे अभ्यासू पत्रकार अजूनही पत्रकारितेचा मूलबंध लोकशाही समाजवाद संवर्धनाचा मानदंड जपून आहेत ! आपला महाराष्ट्र च्या 'बहर' पुरवणीत आमचे परममित्र, लेखक, संशोधक, उत्तम अभ्यासक डॉ.संजय ढोडरे 'माझा खानदेश' लेख मालिका सातत्याने लिहीत आले आहेत ! 'माझा खानदेश' ह्या लेख मालिकेतून खानदेशच्या साहित्य, कला व संस्कृतीचे प्रतिबिंब उमटले आहे. लेख मालिकेत लेखकाच्या लेखनात अलंकारिक, जड,खोल,गंभीर भाषा सौष्ठत्व अजिबात जाणवत नाही... प्रकर्षानं जाणवते ती त्यांची सरळ साधी सोपी भाषा !! खानदेशची संस्कृती, सण-उत्सव, ग्रामदेवतेपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीचा समृद्ध आलेख मांडत असताना डॉ. संजय ढोडरे हे डावे की उजवे ? अशी स्पष्ट भूमिका मात्र त्यांच्या लिखाणातून ते कधीच मांडत नाहीत, परंतु वस्तुनिष्ठ लिखाण करून वास्तववादी सांगण्याचा त्यांचा अट्टाहास मात्र असतो, हे लेख मालिकेतून प्रतिबिंबित होते. दैनिक आपला महाराष्ट्रच्या एकंदरीत लिखाणातून त्यांनी आपला लेखन प्रवास जनसामान्यांना समोर ठेवूनच केलेला आहे! त्यातल्या सूक्ष्म, वास्तवाच्या रेषा, अनुभव आणि अस्सल रिपोर्ताज मनाला मोहून टाकतो. डॉ.ढोडरे यांची लिखाण करण्याची वृत्ती- प्रवृत्ती -प्रेरणा, वांङ्मयीन सौंदर्य हे पूर्वाश्रमीच्या अनुभवाच्या पूर्वपीठिकाच्या परिप्रेक्ष्यात घडत आलेली आहे. आपल्या मातीशी कायम इमान राखण्याची त्यांची प्रवृत्ती ही मला मनस्वी भावलेली आहे !! डॉ. संजय ढोडरे यांनी आपल्या लिखाणाचा अखंड प्रवास तहयात सुरू राखावा... साहित्य लेखनाच्या प्रेरणा, प्रवृत्ती, प्रयोजन, अनुभव, अभिव्यक्ती प्रकटीकरण या गोष्टींचा मूल्यभाव आपण सतत प्राणपणानं जपावं एवढं सांगून मी थांबतो.

**- आचार्य डॉ.पंडित घनश्याम थोरात, आजीवन सदस्य**
**विश्व मराठी साहित्य परिषद, पुणे**

## खानदेशचे जिवंत दस्तऐवज.. 'माझा खानदेश'

प्रा.डॉ.संजय ढोडरे यांनी 'आपला महाराष्ट्र' दैनिकाच्या 'बहर' पुरवणीतून सुरू केलेली माझा खानदेश ही लेखमाला खानदेशवासीयांसाठी पर्वणीच ठरली आहे. खानदेश शब्द नेमका कुठून आला, खानदेश नामचर्चा, भौगोलिक रचना, राजकीय-ऐतिहासिक घडामोडी, सामाजिक-सांस्कृतिक ठेवा आणि साहित्य-कलेतील योगदान याचा त्यांनी घेतलेला परामर्श अतिशय अभ्यासपूर्ण आणि रसाळ आहे. विशेषतः सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक आणि समाज प्रबोधनाच्या क्षेत्रातील विस्मृतीत गेलेल्या घटना-स्थळांना त्यांनी नव्याने प्रकाशझोत दिला आहे. ही लेखमाला केवळ माहिती देणारी नसून खानदेशी माणसाच्या अस्मितेला जागवणारी आहे. अशा दर्जेदार लेखनामुळे तरुण पिढीला आपल्या मातीशी जोडण्यास मदत होते. 'बहर' पुरवणी आणि डॉ. संजय ढोडरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन... खानदेशच्या मातीतला सुगंध पुन्हा एकदा 'बहर' मधून दरवळला. लेख मालिकेतून खानदेश शब्द उत्पत्ती पासून आजच्या समाज प्रबोधनापर्यंतचा जो प्रवास मांडला आहे तो वाचनीय, मननीय, संग्राह्य आणि अभिमानास्पद आहे. ऐतिहासिक संदर्भ, भौगोलिक माहिती आणि सांस्कृतिक-शैक्षणिक ठेवा एकत्र येऊन ही लेखमाला खानदेशचा जिवंत दस्तऐवज बनली आहे. मायभूमी खानदेश... शब्द ऐकताच ऊर भरून येतो. डॉ. संजय ढोडरे यांनी 'बहर' मध्ये लिहिलेली लेखमाला वाचून वाटलं की आपण परत आपल्या खानदेशची मांगलिक परिक्रमाच करतोय. खानदेश नावामागचा इतिहास, तापीचा काठ, अहीराणीची गोडी, क्रांतिकारकांचा त्याग, संतांची वाणी, या परिसरातील साहित्य यात्रा आणि साहित्य-कलेचा ठेवा... सगळं एका माळेत ओवलं आहे. ही फक्त लेखमाला नाही, ही आमच्या अस्मितेची गाथा आहे. खूप धन्यवाद सर आणि 'आपला महाराष्ट्र' टीम!.

**प्रोफेसर.डॉ.अजित चव्हाण, शहादा**

## मातृभूमीशी नातं घट्ट करणारी लेख मालिका... 'माझा खानदेश'

दैनिक 'आपला महाराष्ट्र' मधील 'बहर' पुरवणीतील प्रोफेसर डॉ. संजय ढोडरे यांनी सुरू केलेली 'माझा खानदेश' लेख मालिका खानदेशाच्या इतिहास, संस्कृती, परंपरा, सामाजिक आणि भौगोलिक जीवनाचा अभ्यासपूर्ण लेखमालिका आहे. लेख मालिकेतील प्रत्येक लेखातून संशोधनाची खोली, वस्तुनिष्ठ मांडणी आणि मातृभूमीशी नातं घट्ट करणारी व खानदेशबद्दलची आत्मीयता अत्यंत प्रभावीपणे जाणवते. ही लेखमालिका वाचकांना खानदेशाचा समृद्ध वारसा नव्या दृष्टीने समजून घेण्यास प्रेरणा देते. खानदेशातील मुखपत्र असलेल्या 'आपला महाराष्ट्र' सारख्या लोकप्रिय दैनिकात अखंडितपणे वर्षभर एखाद्या विषयावर विविध अंगाने लिहून एखादी लेखमालिका दीर्घकाळ सातत्याने सुरू ठेवून वाचकांच्या पसंतीस उतरणे... त्यासाठी लागणारा अभ्यास, संशोधन, चिंतन- वाचन, विषयांची निवड, लेखनातील सातत्य आणि त्यामागील परिश्रम किती मोठे असतात, याची मला जाणीव आहे. म्हणूनच 'माझा खानदेश' या लेखमालिकेमागील आपल्या परिश्रमांचे आणि खानदेशाविषयीच्या समर्पित योगदानाचे मूल्य अधिक प्रकर्षाने जाणवते. प्रो. डॉ.संजय ढोडरे यांचे अध्ययन, अध्यापन, संशोधन व विद्यापीठीय शिक्षण क्षेत्रातील अनुभव त्यांच्या लिखाणातून प्रकर्षाने जाणवतो. सातपुड्याच्या कुशीतील बोरद (तळोदा) सारख्या छोट्या गावातील आमच्या परिवारातील असलेल्या डॉ.संजय ढोडरे यांनी विद्यापीठ, शिक्षण-संशोधन व लेखन या क्षेत्रात गाठलेली उंची आमच्यासाठी अभिमान वाढविणारी आहे. त्यांच्या या अभिमानास्पद व उल्लेखनीय कार्यासाठी मनःपूर्वक अभिनंदन... शुभेच्छा...ही लेखमालिका भविष्यात ग्रंथरूपाने प्रकाशित होऊन संशोधक, विद्यार्थी आणि खानदेशप्रेमी वाचकांसाठी एक महत्त्वपूर्ण संदर्भ ग्रंथ ठरावी, ही मनःपूर्वक सदिच्छा!

**- 'खानदेशी चिमटा'कार श्री.मिलिंद धोदरे,**
**मुख्याध्यापक, तळोदा**

# वय... हळूहळू संपणारा बहर!



**कळीचं फूल होतं, फूल बहरतं आणि मग एक दिवस फुलाच्या पाकळ्या अलगद गळायला लागतात. ना कसला आवाज होतो, ना कुठली चाहूल लागते. सगळं इतकं शांतपणे घडत असतं, की फुलाला स्वतःलाच आपण कधी कोमेजायला सुरुवात झाली हे कळतही नाही.**

भारती सोनवणे
मो.९३७३०७७८६२

अगदी तसंच माणसाच्या वयाचं असतं. लहानपणी मोठं होण्याची घाई असते, तर तरुणपणी जग जिंकण्याची जिद्द आणि स्वप्नं असतात. आरशात स्वतःकडे पाहताना मन सुखावतं. चेहऱ्यावर तेज असतं, डोळ्यांत चमक असते, मन निरागस असतं आणि शरीरात अखंड वाहणारी सचेतन ऊर्जा असते; पण त्या वयात या बहुमोल देणगीची किंमत नसते; कारण तेव्हा माणूस जगण्यासाठी धावण्यात इतका गुंतलेला असतो, की स्वतःकडे पाहायलाच त्याला वेळ नसतो. घर, संसार, मुलं, नाती, जबाबदाऱ्या... या सगळ्यांसाठी धावताना स्वतःचं वय कधी हातातून निसटतं, हे त्यांचे त्यालाच कळतच नाही.

आणि एके दिवशी जुना अल्बम हातात येतो. पिवळसर झालेल्या फोटोमध्ये एक चेहरा हसत असतो. नितळ त्वचा, डोळ्यांत स्वप्नं, ओठांवर निरागस हसू... आणि आपण बऱ्याच वेळ त्या फोटोला स्पर्श करत राहतो. मनात एक विचित्र हुरहूर दाटून येते. हे आपणच आहोत का?

कारण, त्या फोटोतली व्यक्ती आणि आताचे आपण... यांच्यामध्ये फक्त वर्षांचं अंतर नसतं, तर आयुष्यभराच्या अनुभवांचा प्रवास उभा असतो. पूर्वी सहज हसणारं मन आता हसण्याआधी विचार करतं. पूर्वी छोट्या गोष्टींनी आनंदून जाणारे डोळे आता नकळत ओलावतात. पूर्वी आरशात स्वतःला न्याहाळायला आवडायचं, आता मात्र आरशात दिसणारे बदल टाळावेसे वाटतात.


केसांमध्ये उतरलेली चांदी, चेहऱ्यावर उमटलेल्या प्रौढत्वाच्या आणि अनुभवाच्या रेषा आणि शरीराचा कमी होत जाणारा उत्साह... हे सगळं स्वीकारताना मन तुटत राहतं; कारण दुःख फक्त वय निघून गेल्याचं नसतं, तर त्यासोबत निघून गेलेल्या निरागसतेचं असतं. लहानसहान गोष्टींवरून खुश होणारं, कुणाच्याही शब्दाने लगेच दुखावणारं आणि लगेच पुन्हा फुलून येणारं ते आनंदी मन... आता कुठेतरी हरवलेलं असतं.

वय वाढतं तसा माणूस शहाणा होतो म्हणतात, पण खरं तर तो आता थकलेला असतो. त्याला लोक ओळखायला येतात, स्वार्थ समजायला लागतो, नात्यांमधले बदल जाणवायला लागतात; आणि मग तो स्वतःभोवती एक शांत भिंत उभी करतो.

कधी कधी वाटतं, त्या जुन्या दिवसांत परत जाता आलं तर... पुन्हा एकदा आईच्या मांडीवर निवांतपणे डोकं ठेवून झोपावं, वडिलांचा आवाज ऐकावा, मैत्रिणींसोबत मनमुराद हसावं, पावसात भिजावं आणि आरशात दिसणाऱ्या स्वतःवर पुन्हा प्रेम करावं. पण काळ परत फिरत नाही. तो पुढे जातच राहतो, मागे आठवणींचा सुगंध ठेवून!

म्हणूनच कधी कधी शांत दुपारी जुने फोटो पाहताना मन भरून येतं. कारण त्या फोटोमध्ये फक्त चेहरे नसतात, तर निघून गेलेलं वय असतं, निसटलेलं तारुण्य असतं आणि नकळत जगून घेतलेले सुंदर दिवस असतात. मग मनाला एक गोष्ट खोलवर टोचत राहते त्या वेळी आपल्याकडे खूप काही होतं, पण त्याची जाणीव नव्हती; आता जाणीव आहे, पण ते दिवस नाहीत!

बहुतेक 'वय' म्हणजे हाच प्रवास असावा... जगता जगता स्वतःपासून थोडं थोडं दूर जाण्याचा आणि आठवणींमध्ये स्वतःला पुन्हा शोधत राहण्याचा!




# आजोळच्या मायेतील सुट्ट्या

चैतन्य आणि चिन्मयला उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या आणि घरात आनंदाचं एक वेगळंच वातावरण निर्माण झालं. सकाळपासूनच दोघांच्या चेहऱ्यावर उत्साह दिसत होता. शाळेची घाई नाही, गृहपाठाचं टेन्शन नाही आणि दिवसभर खेळण्याची मोकळीक लहान मुलांसाठी यापेक्षा मोठा आनंद दुसरा कोणता असणार? त्यांच्या आईच्या मनात बरेच दिवसांपासून एक विचार होता यावेळी मुलांना मामाच्या गावाला घेऊन जायचं.

मालपूर साक्रीपासून अवघ्या आठ किलोमीटरवर असलेलं छोटंसं पण मायेने भरलेलं गाव. गावात शिरताच दिसणारी हिरवी झाडं, मोकळे रस्ते, शांत वातावरण आणि आपुलकीने बोलणारी माणसं गावाचं नाव ऐकताच चैतन्य तर आनंदाने उड्याच मारू लागला.

मी गावाला जाणार बाजारात जाणार मित्र बनवणार! असं म्हणत तो आधीपासूनच तयारी करू लागला. पण चिन्मयचं मात्र वेगळंच चाललं होतं. तो शांतपणे आजोबांच्या जवळ बसला होता. जेव्हा त्याला गावाला जायचं सांगितलं, तेव्हा तो हट्टाने म्हणाला, मी नाही जाणार मला आजोबांजवळच राहायचं. त्याच्या त्या निरागस शब्दांत आजोबांबद्दलचा जिव्हाळा दिसत होता. आजोबाही त्याला जवळ घेत म्हणाले,

जा रे दोन दिवस मजा करून ये. घरच्यांनी खूप समजावलं गावाला गेलं की किती मजा येते! नवीन मित्र मिळतात, बाजार पाहायला मिळतो, खूप खेळायला मिळतं. तरीही चिन्मय दोन दिवस आजोबांसोबतच राहिला. त्या दोन दिवसांत त्याने आजोबांसोबत गप्पा मारल्या, अंगणात बसून वेळ घालवला, त्यांच्या जवळ झोपला. त्याला त्या सहवासात एक वेगळीच सुरक्षितता वाटत होती. पण दुसरीकडे चैतन्य रोज फोनवरून गावातील गोष्टी सांगत होता. इथे खूप मजा आहे आम्ही बाहेर खेळतोय बाजारात गेलो होतो. हळूहळू चिन्मयच्या मनातही गावाबद्दल उत्सुकता निर्माण झाली आणि अखेर दोन दिवसांनी त्याने गावाला जाण्याचा निर्णय घेतला. मालपूरला पोहोचताच त्याचा चेहरा खुलून गेला. गावातील मोकळी हवा, गल्लीत धावणारी मुलं, घरासमोर बसलेली माणसं, अंगणातल्या गायी-वासरं आणि प्रेमाने विचारपूस करणारे गावकरीक्षणातच तो त्या वातावरणात मिसळून गेला.

दोघे भाऊ आजोळच्या आजीसोबत कासाऱ्याच्या बाजाराला जात. त्या बाजारात गेल्यावर त्यांच्या आनंदाला पारावर उरत नसे. कुठे खेळणी, कुठे रंगीबेरंगी वस्तू, कुठे खाऊचे स्टॉल, तर कुठे गारगार आईस्क्रीम! आजी हे घेऊ का? आजी मला ते पाहिजे! असं म्हणत दोघेही लहान लहान हट्ट करत. आजीही प्रेमाने त्यांचे हट्ट पूर्ण करत असे. आईस्क्रीम खाताना त्यांच्या चेहऱ्यावर उमटणारा आनंद पाहून आजीच्या चेहऱ्यावरही समाधान दिसत असे. रात्री मोबाईलवर बोलताना दोघे उत्साहाने सांगत, आम्ही आज बाजारात गेलो होतो खूप मजा आली आईस्क्रीम खाल्लं!

गावात राहता राहता दोघांची गल्लीतल्या मुलांशी मैत्री झाली. लहान मुलांची ही एक सुंदर गोष्ट असतेत्यांना मैत्री करायला वेळ लागत नाही. दोनदा एकत्र खेळलं की ते एकमेकांचे होऊन जातात.

कधी क्रिकेट, कधी पळापळ, कधी मातीमध्ये खेळ, तर कधी ट्रॅक्टरच्या मागे धावत फिरण्याची मजा त्यांच्या दिवसांचा वेळ कसा जात होता हे त्यांनाच कळत नव्हतं.

गल्लीतले मोठे लोकही त्यांना प्रेमाने बोलवत. कुणी फळं देत, कुणी गप्पा मारत, तर कुणी त्यांच्या खोड्यांवर हसत असे. मी मालपूरला त्यांना घ्यायला गेलो त्यावेळी दोघेही इतके गावात रमलेले दिसले की त्यांना परत आणावंसंच वाटत नव्हतं.

चैतन्य आणि चिन्मय मला गावातल्या प्रत्येकाची आनंदाने ओळख करून देत होते

हे आमचे ट्रॅक्टरवाले बाबा हे आमचे मित्र आणि या मामाने आम्हाला ज्यूस पाजला होता! त्या निरागस ओळखी ऐकताना मन भरून येत होतं. गावातल्या माणसांशी त्यांनी किती सहज नातं जोडून घेतलं होतं, हे त्यांच्या बोलण्यातून जाणवत होतं. योगायोगाने त्या दिवसांत अधिकमास सुरू असल्यामुळे आजोळच्या आजीने प्रेमाने चैतन्य आणि चिन्मयसाठी जेवणाचे सुंदर ताट, वाट्या, ग्लास आणि डिश घेतल्या होत्या. मी पोहोचताच दोघेही आनंदाने उड्या मारत घरात गेले आणि त्या वस्तू घेऊन धावतच बाहेर आले.

हे बघा आजीने आम्हाला घेतलंय! असं म्हणत ते दोघेही कौतुकाने एकेक वस्तू दाखवत होते. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद इतका निरागस आणि मनमोकळा होता की क्षणभर घरभर आनंदाचं चैतन्य पसरल्यासारखं वाटलं. आता आम्ही रोज याच ताटात जेवणार!

असं सांगताना त्यांच्या डोळ्यांतला उत्साह आणि आजीबद्दलचा जिव्हाळा अगदी स्पष्ट दिसत होता. त्या छोट्याशा भेटीत वस्तूंची किंमत नव्हती; त्यामागे दडलेली आजीची माया, प्रेम आणि आपलेपणाचं ऊबदार नातं अधिक मौल्यवान होतं. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला तो निष्पाप आनंद पाहताना मलाही नकळत हसू आलं आणि मन भरून आलं.

त्या क्षणी मनात एक विचार आलाखरं तर मुलांचं खरं शिक्षण फक्त पुस्तकांत नसतं. अशा छोट्या छोट्या अनुभवांतूनच ते जीवन जगण्याची कला शिकत असतात. गाव त्यांना माणसांशी जोडायला शिकवतं नाती जपायला शिकवतं आपुलकी, प्रेम, मैत्री आणि साधेपणाची ओळख करून देतं.

मोबाईल, टीव्ही आणि बंद घरांच्या जगात वाढणाऱ्या मुलांसाठी अशा सुट्ट्या म्हणजे जणू आयुष्याची एक जिवंत शाळाच असते. उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपतात मुलं पुन्हा शाळेत जातात पण आजोळच्या मायेतील त्या सुट्ट्या, आजीसोबतचा बाजार, नवीन मित्र, गल्लीतले खेळ आणि त्या निरागस आठवणी मात्र त्यांच्या मनात कायमच्या जपल्या जातात.



संदेश : आजोळच्या सुट्ट्या म्हणजे केवळ मौजमजा नसते; त्या मुलांना माणुसकी, आपुलकी, मैत्री आणि नाती जपण्याचे संस्कार देतात. गावातील साधेपणा आणि आजी-आजोबांच्या मायेच्या सहवासात बालपण समृद्ध होते. अशा आठवणीच पुढे आयुष्याची शिदोरी बनतात. म्हणूनच मुलांना निसर्ग, गाव आणि नात्यांच्या उबेशी जोडून ठेवणे ही काळाची गरज आहे. कारण आजोळच्या मायेतील सुट्ट्या मुलांना केवळ आनंदच देत नाहीत, तर जीवन जगण्याची सुंदर कलाही शिकवतात.

# शब्दझुला

## पानी उना.. पानी उना..

पानी उना पानी उना
झिमझिमझिम
भिंजाईगऊ बहिन मी
वल्लीवल्लीचिंब.
हाड्याचिड्या दपीग्यात
फडफडफड
देवबाप्पा गरजस दडदडदड..
आभायबी बोलसते कडकडकड
जीव मना करसवो धडधडधड
ईजबाई लपकनी दडाडाडधाड
कापी उठनात दखानाहो
दगडेपहाड..
झाडे करतस थरथर
पाने सामसुम
शेपुटघालीन पयतस
वांदरे धामधूम..
वल्लाचिंब हुईग्यात छपरेनिघरे
पंढायबी वसांडना नही धिरधरे
पंढायम्हा पानी पडे धपधपधप
पानी उडायेत पोरे थपथपथप
रस्ता व्हायनात जसा
नदीनातो पूर
नावा सोड्यात
आम्ही ग्यात दूरदूरदूर..
पानी उना पानी उना
झिमझिमझिम
भिंजाई गऊ बहिनमी
वल्लीवल्लीचिंब..

– प्रा.सौ.सुमती पवार,
नाशिक, मो.९७६३६०५६४२

## मेघा का रुसलास ?

काळया आईवरी मेघा
का रे रुसला रसला ?
रुसवा तुझा ती काढीन
ये रे तिला तू भेटाया
तहानलेली ही धरणी
वाट तुझी रोज पाही
तृषा तिची शमवण्याला
पाण्याचा रे थेंब नाही!!
कुशीत घेतल्या अंकुरा
नाही भेटला ओलावा
जलावाचून जीव त्याचा
पहा कासावीस झाला
गाई गुरांनाही पडला
तुटवडा हिरव्यातृणाचा
दाही दिशांना पाणी नाही
झाला दुष्काळ पाण्याचा
दुष्काळ दूर हा सारण्या
ये रे ये रे मेघराजा
सुखी समाधानी कर
धरित्रीची सारी प्रजा !!
तुझ्या जीवावरी आहे
वसुंधरेचं रे जीनं
तुझ्याविना या सृष्टीला
कसं मिळेल जीवन
तुझ्या रुसण्यानं झाली
सारी सृष्टी ही निर्जल
पाणी पाणी करीत पहा
चहुकडे फिरती रे जन
सृष्टी सजल करण्या
मेघा बरस बरस
रुसवा तुझा तू सोडून
ये रे हासत नाचत !!
मृगनक्षत्रिही लावली
नाही पर्जन्य चाहूल
आता का रे तू पाडशी
उन्हाळ्याचं रे ऊन
रुक्ष वेली अन पिकं
पहा गेली कोमेजून
वर्षा ऋतू जणू काय
वाटे गेला हा सरून
धोंडी बनून अवनी
ही मागते पाण्याचं मागणं
करुणा तिची तू ऐकून
मेघा ये रे ओथंबून !!

– विमल पाटकरी, धुळे
मो.नं. ९०२८०५५९११

## दखनी कविता
## गांवके मेनू

खेडे पाडेकी  जिंदगी
जिये क्या जी
गावरान मेवे का मजा
लिये क्या जी ?
वो  खट्टे  मीट्टे
आमके कैऱ्या
काले मोटे जामून
कभी खाये क्या जी ?
हारे पके ज्याम्बा,
रामफल, सीताफल
पपई के शाकां कभी
खाये क्या जी ?
काली मैना, बेरां
हौर  धामोडे
भुने हुये चिचू कभी
खाये क्या जी ?
बाजारके भज्ने हौर
शेव चिवडा
रेवडया बत्तासे कभी
खाये क्या जी ?

– डी के शेख,
मो. ९५५२८४३३६५

## रिटायरमेंट नंतरच जगणं


रिटायर झालो त्या दिवशी
हातात फुलांचा गुच्छ होता
मनाच्या एका कोपऱ्यात
अंधारात दाटला होता
पहिली पायरी चढताना
खूपच अवघड वाटत होतं
माझी वाट बघायला
दारावर कोणीच उभं नव्हतं
जेव्हा पदावर होतो तेव्हा
सारेच कसे अवतीभवती
गोळा व्हायचे
लागलीच एक ग्लास
पाणी घेऊन
सारेच कसे धांवत यायचे
माझ्या येण्याची वाट पहात
कितीदा फोन करायचे
एवढा का उशीरा झाला म्हणत
अनेक प्रश्न विचारायचे
जेवणाची ताटं माझ्याशिवाय
कधीच वाढली जात नव्हती
जेवता जेवता नातवंडं सरे
अंगाखांद्यावर खेळत होती
दिवसभरातून कितीदा
बाबा म्हणून होकार द्यायचे
सुटीच्या दिवशी कुठेतरी
सहलीला घेऊन जायचे
आता रिटायर झालो आणि
सगळंच हळूहळू बदत गेल
जिवाभावाचे आपलेपण
कोणत्या तरी वळणावर हरवलं
दिवसभर घरात असतो
पण घराला मी दिसत नाही
कालपर्यंत माझी वाट
बघणाऱ्यांना
माझी गरज भासत नाही.
माझ्या सोबत जेवणारे
आता एकटेच जेवण
करून घेतात
सर्व सोबत एकत्र गप्पा
करणारे आता मोबाईलमधे
हरवून जातात
कधी बोलायला गेलो तर
फारचं बोलत कोणी नाही
कुठे बाहेर जरी गेलो तरी
फोन कुणाचा येत नाही
फोनची घंटी शांत झाली
चौकशी करणं थांबवलं आहे
माझं असण्याच मोल जणू
काळाच्या ओघात विरल आहे
कधी कधी मन हळवं होतं
डोळ्यात पाणी दाटून येतं
आपुलकीचा हात सुटणं
मानाला फार टोचून जातं
रिटायर झालो म्हणून
काय झालं
सगळ्यांनी कायम जवळ यावं
दोन शब्द प्रेमाचे बोलून
गुण्यागोविंदाने रहावं
पण..खरचं....
रिटायरमेंट नंतरच जगणं
फारच अवघड होऊन बसत
घरात सर्वजण असताना
सोबत कोणी नसतं
नोकरीत असताना
घरी येण्याचा उत्साह वेगळाच
असायचा
बाबा आले बाबा
आले् होकाराने
घरात आनंदाचा सडा
पडायचा
आता समजलंय
माणूस जसा नोकरीतून
रिटायर होतो
तसा माणसांच्या
मानातून होतो
ज्यांच्यासाठी आयुष्य
झिजवल
त्यांच्यापासून हळूहळू
दुर जातो
मग जाणवतं
माणसाच दुःख पद
गेल्याचं नसतं
आपल्याच माणसांच्या
बदललेल्या नजरेच
असतं कारण....
रिटायरमेंट नंतरच जगणं
एक अवघड प्रवास असतो
वाटत तेव्हढा तो रस्ता
सहज आणि सोपा नसतो
तेव्हा काही जरी झाल तरी
माणसाच्या नोकरीची
निवृत्ती असावी
पण आपल्याच माणसाला
विसरण्याची सुरवात नसावी

– संजय धनगव्हाळ
मो.९४२२८९२६१८




डॉ.रोहन कुलकर्णी
MBBS, MD Medicine, IDCCM
कन्सल्टिंग फिजिशियन, इंटेंसिविस्ट
धुळे मो.९५०३४२०५१२

# पावसाळ्यात वाढणारा लेप्टोस्पायरोसिस :
## उंदराच्या लघवीमुळे पसरणारा धोकादायक आजार ओळखा!




**प्रस्तावना :-** पावसाळा सुरू झाला की ताप, सर्दी, डेंग्यू, मलेरिया यांच्यासोबतच लेप्टोस्पायरोसिस हा आजारही वाढू लागतो. पूरस्थिती, साचलेले पाणी आणि अस्वच्छ परिसर यामुळे हा संसर्ग जलद पसरू शकतो. योग्य वेळी उपचार न मिळाल्यास हा आजार यकृत, मूत्रपिंड आणि फुफ्फुसांवर गंभीर परिणाम करू शकतो.

**हा विषय सध्या महत्त्वाचा का?:-**

पावसाळ्यात अनेक ठिकाणी पाणी साचते. या पाण्यात उंदरांच्या लघवीद्वारे जीवाणू मिसळू शकतात. अशा पाण्यातून चालणे, शेतीची कामे करणे किंवा पूरग्रस्त भागात राहणे यामुळे संसर्गाचा धोका वाढतो. त्यामुळे या आजाराबाबत जनजागृती करणे अत्यंत गरजेचे आहे.

**कारणे:-**

लेप्टोस्पायरोसिस हा नावाच्या जीवाणूमुळे होतो.

**मुख्य कारणे:**

उंदरांच्या लघवीने दूषित पाण्याचा संपर्क, पूराचे किंवा साचलेल्या पाण्यातून चालणे, शेती किंवा गटार साफ करण्याचे काम, पायावरील जखमेतून जीवाणू शरीरात प्रवेश करणे, दूषित पाणी किंवा मातीचा संपर्क

**लक्षणे:-**

संसर्गानंतर साधारण २ ते १४ दिवसांत लक्षणे दिसू शकतात., अचानक ताप, डोकेदुखी, अंगदुखी, विशेषतः पोटरीच्या स्नायूंमध्ये वेदना, डोळे लाल होणे, मळमळ, उलट्या, थकवा, काही रुग्णांमध्ये कावीळ किंवा लघवी कमी होणे

**कोणाला जास्त धोका?:-**

शेतकरी, सफाई कर्मचारी, पूरग्रस्त भागातील नागरिक, गटार किंवा ड्रेनेजमध्ये काम करणारे, पशुपालक, मधुमेह, मूत्रपिंड किंवा यकृताचे आजार असलेले रुग्ण, वृद्ध आणि कमी प्रतिकारशक्ती असलेले व्यक्ती, परिणाम व गुंतागुंत

**उपचार उशिरा झाल्यास:-**

मूत्रपिंड निकामी होणे, कावीळ, फुफ्फुसातून रक्तस्राव, मेंदूच्या आवरणाचा संसर्ग, रक्तदाब कमी होणे, अतिदक्षता विभागात उपचारांची गरज, क्वचित प्रसंगी मृत्यू

**धोक्याची चिन्हे खालील लक्षणे दिसल्यास त्वरित रुग्णालयात जा:-**

श्वास घेण्यास त्रास, लघवी कमी होणे, तीव्र कावीळ, रक्तस्राव, सतत उलट्या, गोंधळ, झोप येणे किंवा शुद्ध कमी होणे

**आवश्यक तपासण्या:-**

रक्त तपासणी, मूत्रपिंड आणि यकृत कार्य तपासणी, आवश्यकतेनुसार लेप्टोस्पायरोसिससाठी विशेष रक्त चाचण्या, छातीचा एक्स-रे किंवा इतर तपासण्या, गरजेनुसार

**उपचार:-**

डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार प्रतिजैविक (अँटिबायोटिक) औषधे, तापासाठी योग्य औषधे, पुरेसे द्रवपान, गंभीर रुग्णांना रुग्णालयात दाखल करून सलाईन, ऑक्सिजन किंवा इतर आवश्यक उपचार दिले जातात., स्वतःहून औषधे सुरू करू नयेत.

**घरच्या घरी काळजी:-**

भरपूर पाणी प्या., विश्रांती घ्या., तापावर डॉक्टरांनी सांगितलेली औषधेच घ्या., लक्षणे वाढल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या., घरगुती उपायांवर अवलंबून राहू नका.

**प्रतिबंधात्मक उपाय:-**

साचलेल्या पाण्यात अनवाणी चालू नका., गमबूट आणि हातमोजे वापरा., घर व परिसर स्वच्छ ठेवा., उंदरांवर नियंत्रण ठेवा., पायावर जखम असल्यास ती झाकून ठेवा., पूरग्रस्त भागातून आल्यानंतर स्वच्छ पाण्याने अंघोळ करा.

**गैरसमज विरुद्ध सत्य:-**

गैरसमजः हा आजार फक्त शेतकऱ्यांनाच होतो., सत्यः दूषित पाण्याच्या संपर्कात आलेल्या कोणालाही होऊ शकतो., गैरसमजः ताप कमी झाला म्हणजे आजार संपला., सत्यः काही रुग्णांमध्ये गंभीर गुंतागुंत नंतरही होऊ शकते., गैरसमजः प्रत्येक ताप म्हणजे डेंग्यू किंवा मलेरिया., सत्यः पावसाळ्यात लेप्टोस्पायरोसिसचाही विचार करणे आवश्यक आहे.

**डॉक्टरांचा सल्ला:-**

पावसाळ्यात ताप आल्यास तो साधा व्हायरल ताप आहे असे गृहीत धरू नका. विशेषतः पूराचे पाणी किंवा साचलेल्या पाण्याचा संपर्क झाला असल्यास डॉक्टरांना ही माहिती नक्की द्या. लवकर निदान आणि योग्य उपचारामुळे गंभीर गुंतागुंत टाळता येते.

**भारत व जगातील परिस्थिती:-**

भारतामध्ये, विशेषतः मुसळधार पाऊस आणि पूर येणाऱ्या राज्यांमध्ये, दरवर्षी लेप्टोस्पायरोसिसची प्रकरणे आढळतात. उष्ण आणि दमट हवामान असलेल्या अनेक देशांमध्येही हा आजार सार्वजनिक आरोग्याचा महत्त्वाचा विषय आहे. हवामानातील बदल आणि वाढती पूरस्थिती यामुळे भविष्यात या आजाराचे प्रमाण वाढण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करतात.

**५ झटपट आरोग्य टिप्स:-**

पावसाच्या पाण्यात अनवाणी चालू नका.

ताप तीन दिवसांपेक्षा जास्त राहिल्यास डॉक्टरांकडे जा., घराभोवती उंदरांचे प्रमाण कमी ठेवा., शेती किंवा पूरग्रस्त भागात काम करताना संरक्षणात्मक साधने वापरा., स्वतः औषधे घेण्याऐवजी वैद्यकीय सल्ला घ्या.

**निष्कर्ष:-** लेप्टोस्पायरोसिस हा पावसाळ्यात दुर्लक्षित राहणारा पण गंभीर ठरू शकणारा आजार आहे. योग्य स्वच्छता, प्रतिबंधात्मक उपाय, लक्षणांची वेळेवर ओळख आणि तातडीने उपचार यामुळे या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. पावसाळ्यात प्रत्येक तापाकडे सजगतेने पाहा आणि गरज वाटल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# ए-आयच्या पलीकडे

दिलीप कजगांवकर
पुणे, मो.७७७००२५५९६

राज, पुढच्या महिन्यात तुझा वाढदिवस आहे. बाबा तुला वाढदिवसाची भेट म्हणून नवी कोरी मर्सिडीज देणार आहेत. ती गाडी आणि तिचा ड्रायव्हर फक्त तुझ्यासाठी असेल.

आई, खरंच? राजने आश्चर्याने विचारले. हो राज. काल रात्री बाबांनी सांगितलं. नवीन तंत्रज्ञान आणि विशेषतः एआयचा वापर करून कंपनीचा खर्च खूप कमी होणार आहे. त्यामुळे कंपनीला भरघोस नफा होईल, असं बाबा म्हणत होते. राज आनंदाने अक्षरशः हवेत तरंगत होता. मित्रांना काहीच न सांगता वाढदिवसाच्या दिवशी मर्सिडीज घेऊन शाळेत जायचं आणि सगळ्यांना आश्चर्याचा धक्का द्यायचा, असा त्याने बेत केला. वाढदिवसाला अजून आठ दिवस बाकी होते. शाळेतून परतला, तेव्हा त्याचा चेहरा पूर्णपणे उतरलेला होता.

राज, काय झालं? आईने काळजीने विचारलं. आई माझे दोन जिवलग मित्र आणि माझ्या आवडत्या मॅम पुढच्या महिन्यात शाळा सोडून दुसऱ्या गावी जाणार आहेत. अरे, तुझ्या मित्रांच्या बाबांना आणि मॅमच्या हसबंडना दुसरी चांगली नोकरी मिळाली असेल. राजने




नकारार्थी मान हलवली.

नाही आई. माझ्या मित्रांच्या बाबांना आणि मॅमच्या हसबंडना त्यांच्या कंपनीने कामावरून काढलं आहे. मग आपण तुझ्या बाबांना विचारू या. आपल्या कंपनीत त्यांना काम देता येईल का? राजचा आवाज भरून आला. आई ते तिघेही बाबांच्या कंपनीतच आहेत आणि खर्च कमी करण्यासाठी बाबांनीच त्यांना कामावरून काढलं आहे.

आई निःशब्द झाली. तिच्यासमोर पहिल्यांदाच एआय, नफा आणि माणुसकी यांचा संघर्ष उभा राहिला होता. रात्री जेवताना राज फारसा बोलत नव्हता. काय रे? इतका शांत का? बाबांनी विचारलं. बाबा, एआयमुळे कंपनीचा नफा वाढतो, हे खरं आहे ना? हो बेटा. पण त्या नफ्यामुळे जर आपले प्रिय आणि जवळचे आपल्यापासून दूर जाणार असतील तर तो नफा कोणासाठी? बाबा शांत होते.

राज पुढे म्हणाला, बाबा एआयच्या पलीकडे काय असतं? बाबांनी प्रश्नार्थक नजरेने त्याच्याकडे पाहिलं. बाबा, माणसं त्यांची स्वप्नं त्यांची घरं त्यांचं आयुष्य हे सगळं एआयच्या पलीकडे नाही का? बाबांच्या हातातील घास तसाच राहिला. त्या रात्री ते बराच वेळ जागे होते. लॅपटॉपवर नफ्याची आकडेवारी होती कर्मचाऱ्यांची यादी होती आणि मनात घुमत होता मुलाचा तो प्रश्न एआयच्या पलीकडे काय असतं? खूप विचाराअंती त्यांनी मनोमन एक निर्णय घेतला.

दुसऱ्या दिवशी सकाळी ते नेहमीपेक्षा लवकर कंपनीत पोहोचले. एचआर प्रमुख आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांनी बोलावून घेतलं. आजपासून कोणत्याही कर्मचाऱ्याला केवळ एआयमुळे कामावरून कमी केलं जाणार नाही.

सर मग ज्यांना कामावरून कमी करण्याचा निर्णय घेतला होता, त्यांचं काय? त्यांना नव्या कौशल्यांचं प्रशिक्षण द्या. नव्या जबाबदाऱ्या द्या.

एआयसोबत काम करण्यासाठी त्यांना सक्षम करा. क्षणभर थांबून ते पुढे म्हणाले, एआय माणसांसाठी आहे माणसं एआयसाठी नाहीत. सभागृहात शांतता पसरली. त्या शांततेत प्रत्येकाला जाणवलंआज कंपनीचा निर्णय बदलला नव्हता; कर्मचाऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला होता. राजच्या वाढदिवसाचा दिवस उजाडला. बंगल्याच्या पोर्चमध्ये काळीभोर मर्सिडीज दिमाखात उभी होती. गाडीची पूजा झाल्यावर बाबा म्हणाले, राज, आधी हे बघ. त्यांनी खिशातून एक दुमडलेला कागद बाहेर काढला. हा कागद ओळखतोस?

राजने तो उघडला. अरे! हे तर माझं पत्र! त्यात लिहिलं होतं प्रिय बाबा, मला मर्सिडीज नको. तिच्या बदल्यात माझ्या मित्रांच्या बाबांची आणि माझ्या आवडत्या मॅमच्या हसबंडची नोकरी परत द्या. माझ्यासाठी तीच सर्वात मोठी वाढदिवसाची भेट असेल. द्याल ना, बाबा? तुमचा राज बाबा, हे तुमच्याकडे कसं आलं? तू झोपल्यानंतर आईने मला दिलं. मग? बाबा हसले.

मग मला तुझ्या प्रश्नाचं उत्तर सापडलं. काय? एआयच्या पलीकडे माणुसकी असते. क्षणभर शांतता पसरली. राज, मी फक्त निर्णय बदलला नाही राज आश्चर्याने बाबांकडे पाहू लागला. मी माझा दृष्टिकोन बदलला. म्हणजे? आता तुझे मित्र शाळा सोडणार नाहीत. तुझ्या आवडत्या मॅमही जाणार नाहीत. एआय आपल्या कंपनीत असेल पण माणसांच्या जागी नाही; त्यांच्या सोबत असेल. राजच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले. त्याने बाबांना घट्ट मिठी मारली.

राज आणि त्याच्या बाबांच्या प्रसन्न चेहऱ्याकडे पाहत आई हसून म्हणाली, एआय हे तंत्रज्ञान म्हणून स्वीकारा. त्याचा वापर करून नवी क्षितिजं गाठा. पण एआयच्या पलीकडे एक गोष्ट कायम लक्षात ठेवा माणसाने माणसाशी माणसासम वागणे हीच खरी बुद्धिमत्ता, आणि हीच खरी नीतिमत्ता.




**मेष :** हा सप्ताह तुमच्यासाठी भौतिक आणि आर्थिक जडणघडणीचा असणार आहे. इतरांच्या मदतीने निश्चितच एक टप्पा गाठला जाईल. प्रयत्नांना यश येईल. तुम्ही केलेल्या कामाला ओळख मिळेल. घर, जमीन, गाडी, नोकरी, व्यवसाय किंवा इतर व्यावहारिक गोष्टींमध्ये चांगली प्रगती होईल. या आठवड्यात तुम्ही कामामध्ये परिपूर्णता आणायचा प्रयत्न करा. इतरांच्या मदतीने, सोबतीने पुढे चाला. दिलेल्या सूचना अंमलात आणा. इतरांना तुम्ही देखील मदत करा. एकट्या पेक्षा मिळून मिसळून काम करा. एकीचे बळ लक्षात ठेवा!

**वृषभ :** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचा असणार आहे. आत्तापर्यंत सुरू असलेल्या समस्यांमध्ये काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो. तुम्ही आतुरतेने वाट बघत असलेले उत्तर किंवा प्रतिसाद मिळेल. एका अर्थी तुम्ही सुटकेचा निःश्वास टाकाल. तुम्ही करत असलेली प्रार्थना किंवा उपासना यांना बळ मिळेल. या आठवड्यात तुम्ही परिस्थितीला तोंड देताना मनामध्ये श्रद्धा आणि विश्वास ठेवण्याची गरज आहे. तुमची साधना फलित होईल असा विश्वास ठेवा. सुरवंटाचेच फुलपाखरु होते हे लक्षात ठेवा!

**मिथुन :** हा सप्ताह तुमच्यासाठी देवाण घेवाण करणारा असणार आहे. भौतिक किंवा आर्थिक पातळीवर लाभ होऊ शकतात. अडकलेल्या कामात काही प्रमाणत पुढे जाऊ शकता. आहे ती परिस्थिती सुधारेल, एक प्रकारची स्थिरता वाटेल. अडकलेले पैसे सुटू शकतात. एखादे बक्षीस मिळू शकते. या आठवड्यात तुम्ही इतरांना मदत करून आणि इतरांच्या मदतीने चालण्याची गरज आहे. अडलेल्या व्यक्तीला केलेली मदत तुम्हाला उपयोगी पडेल. इतरांशी वागताना बोलताना पक्षपातीपणा न करता काम करा.

**कर्क :** हा सप्ताह तुमच्यासाठी एक पाऊल पुढे टाकण्याचा आहे. तुम्ही एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोचणार आहात. मागे केलेल्या नियोजनाला आणि कष्टाला चांगले यश मिळेल. पण मार्गावर पुढे जाण्यासाठी कुठल्यातरी गोष्टीची वाट बघावी लागेल. लोकांचं सहकार्य मिळेल. यात्रा किंवा प्रवास संभवतात. नोकरी व्यवसायात अपेक्षित घटना घडायला वेळ लागेल. या आठवड्यात तुम्हाला धैर्य आणि संयम ठेवण्याची गरज आहे. आहात त्या मार्गावर पुढे जाताना, विचारमंथन करा, इतरांचे मत जाणून घ्या. कामाचा विस्तार कसा करता येईल हा विचार करा.

**सिंह :** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचं चिंतन आणि मनन करण्याचा आहे. हव्या तशा गतीने गोष्टी पुढे सरकणार नाहीत. एखाद्या गूढ आणि संभ्रम निर्माण करण्याऱ्या प्रसंगाला सामोरे जाऊ शकता. पण हे तुमच्या चांगल्यासाठीच असणार आहे. नेहमी वेग हाच पुढे वाढण्याचा प्रमाण नसतो, हे लक्षात ठेवा! या आठवड्यात तुम्हाला आत्मचिंतन करण्याची गरज आहे. कोणत्याही प्रसंगी इतरांकडे धाव घेण्यापेक्षा स्वतः अंतर्मुख होऊन उत्तर शोधण्याचा प्रयत्न करा. संथपणे आणि शांतपणे काम करा. विवेक आणि संयम ठेवा.

**कन्या :** हा सप्ताह तुमच्यासाठी काही प्रमाणात मागे येण्याचा असणार आहे. एक प्रकारे माघार घ्यावी लागेल. तुम्हाला हवे तसे घडणार नाही. अपेक्षित यश मिळण्यात काहीतरी कमतरता राहील. तडजोड करावी लागेल. पण हे करत असताना कोणाची तरी चांगली साथ मिळू शकते. प्रयत्न करुन प्रगती होईल. प्रवास घडू शकतो. स्थलांतर होऊ शकते. या आठवड्यात तुम्हाला शांतपणे काम करण्याची गरज आहे. तुम्हाला तुमच्या शब्दांवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. मध्यम मार्ग निवडा. थोडा वेळ शांत बसून आत्मचिंतन करा!

**तूळ :** हा सप्ताह तुमच्यासाठी काहीतरी नवीन करून दाखवण्याचा आहे. नवीन काम मिळू शकतं. कामात बदल घेऊ शकतात. आत्तापर्यंत ज्याची वाट पाहत होता, ती घटना घडू शकते, किंवा त्या घटनेसंदर्भात चांगली बातमी मिळू शकते. केलेली मेहनत फलित होईल. तुम्हाला आतून ऊर्जा मिळेल, जिद्द राहील, उत्साही वाटेल. सकारात्मक वाटचाल होईल. या आठवड्यात तुम्ही एखादा प्रयोग, एखादं नवखं काम हाती घेऊ शकता. तुमची कला, क्रीडा, छंद लोकांसमोर सादर करा. विनम्रपणे, पाय जमिनीवर ठेवून इतरांसमोर व्यक्त व्हा.




**वृश्चिक :** हा सप्ताह तुमच्यासाठी एक पर्याय निवडीचा आणि त्यावर ठाम राहण्याचा असणार आहे. तुम्हाला दिलेलं काम पार पाडण्यात तुमचा कस लागेल. केलेल्या कष्टांना काही प्रमाणात यश मिळेल. इतरांकडून मदतीचा हात मिळेल. कोणत्याही नात्यात दुरावा आला असेल तर त्यात चांगली सुधारणा होऊ शकते. या आठवड्यात तुम्ही एका व्यक्तीला, किंवा एका कामाला, किंवा एकाच गोष्टीला तुमचा पूर्ण वेळ देण्याची गरज आहे. एकाच वेळी अनेक कामे हाताळू नका. दिलेला शब्द पूर्ण करा, त्यासाठी शंभर टक्के प्रयत्न करा. एकोप्याने आणि चांगल्या भावनेने वागा.

**धनू :** हा सप्ताह तुमच्यासाठी पूर्णत्वाचा असणार आहे. कुठलेतरी काम एका टप्प्यापर्यंत पूर्ण होईल. काहीतरी मिळवल्याचे समाधान वाटेल. घडून गेलेले बदल आता चांगल्या प्रकारे फळास येतील. एखाद्या त्रासातून, किंवा बंधनातून मुक्त व्हाल. प्रवासयोग संभवतात. या आठवड्यात तुम्हाला जे मिळेल ते मोठ्या मनाने स्वीकारण्याची गरज आहे. संकुचित वृत्ती सोडून व्यापक विचार ठेवा. सगळ्यांना सामावून घ्या. आनंदी मनाने एखाद्या गरजवंताला दान करा. सामाजिक कार्य करा. जीना इसी का नाम है! या गाण्याचे बोल आठवा आणि त्याप्रमाणे वागा!

**मकर :** हा सप्ताह तुमच्यासाठी धड इकडे नाही आणि तिकडे ही नाही अशी परिस्थिती निर्माण करणारा आहे. कुठल्यातरी दोन किंवा अधिक गोष्टींमुळे तुम्ही तारेवरची कसरत करणार आहात. लक्ष एकाग्र न राहता विचलित जास्त होण्याची शक्यता आहे. हवे तसे ध्येय साध्य करायला अवघड आहे पण तरीही तुम्ही सांभाळत असलेल्या सर्व गोष्टीत तुम्ही पुढे वाढणार आहात आणि हेच महत्त्वाचे आहे! या आठवड्यात तुम्ही आर्थिक निर्णय पुढे ढकला. सगळीकडे उत्तुंग यशाची अपेक्षा ठेवू नका. दडपण न घेता यालाच जीवन ऐसे नाव समजून हा सप्ताह हलकेपणाने घालवा.

**कुंभ :** हा सप्ताह तुमच्यासाठी नवीन संकल्पना, नवीन विचार आणि नवीन संवाद घेऊन येत आहे. वाटेत आलेला अडथळा दूर करण्याचा मार्ग सापडेल. अनुत्तरित प्रश्न सुटतील. स्पष्ट संवादातून काहीतरी मार्ग निघेल. एकूण परिस्थिती सुधारेल. या आठवड्यात तुम्ही बुद्धिमत्ता आणि वैचारिक कौशल्य वापरण्याची गरज आहे. भावनेपेक्षा तुम्हाला सारासार विचार करून कुठल्यातरी निर्णयापर्यंत पोचण्याची गरज आहे. एखादी नवीन सुरुवात करू शकता. तुमचं संभाषण अत्यंत स्पष्ट आणि खरं ठेवा. तुमचं मत परखडपणे मांडा, पण त्यात अरेरावी नको.

**मीन :** हा सप्ताह तुमच्यासाठी इच्छापूर्तीचा असणार आहे! एखाद्या कामाचा मोबदला चांगला मिळेल. एखादी अपेक्षित घटना घडेल. एखादा लाभ नक्की होईल. मागच्या दुःखावर सुखाची फुंकर घालणारा हा काळ आहे. नातेसंबंधांमध्ये सुधारणा होईल. कलेला प्रोत्साहन मिळेल. या आठवड्यात तुमच्याकडून कळत नकळत स्वार्थी वागणूक होऊ शकते त्यामुळे ते लक्षपूर्वक टाळा. कुटुंबामध्ये एकोप्याने वागा. तुम्हाला आवडत असणाऱ्या गोष्टीसाठी वेळ काढा. कुठल्या नात्यात वितुष्ट आलं असेल तर ते दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करा!

**आपला महाराष्ट्र**
**वाचकांना विनम्र सुचना**

आपला महाराष्ट्र वृत्त पत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहीरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबधी आर्थिक व्यवहार करावा जाहीरातीतील आपल्या उत्पन्नाच्या संदर्भात अथवा सेवेच्या संदर्भात जाहीरातदार जे दावे करतात त्याची आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नाहीत जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहीरातदारांकडून न झाल्यास होणाऱ्या परिणामास आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुहाचे मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक जबाबदार रहाणार नाहीत कृपया वाचकांनी यांची नोंद घ्यावी.

## NAME CHANGE

MY OLD NAME WAS
**TARANNUM BANO MOHD SALEEM**
MY NEW NAME IS
**TARANNUM BANO ABDUL MUJEEB ANSARI**
AS PER MY DOCUMENTS
**ADD- 2256, LINE NO.7, QASAB BADA MASJID, FISH MARKET, DHULE. MAHARASHTRA-424001**

## NAME CHANGE

MY OLD NAME WAS
**HABIBA HASHMI MAHOMMAD IMRAN ANSARI**
MY NEW NAME IS
**HABIBA HASHMI MOHAMMAD IMRAN**
**ADD- TASHA GALII, 2006 NEAR MOMIN MASJID GALLI NO.7 DHULE-424001**

# आ.चंद्रकांत रघुवंशींच्या हस्ते विठ्ठल पूजनाचा कार्यक्रम

नंदुरबार, दि.२५ (प्रतिनिधी)- आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त शहर विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमून गेले.आ.चंद्रकांत रघुवंशी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्री विठ्ठल माऊली पूजन सोहळ्यास भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विठ्ठल नामाचा अखंड गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

नंदुरबार नगरपरिषदेच्या वतीने लोकनेते स्व.बटेसिंगभैय्या रघुवंशी उद्यानाच्या बाजूला उभारण्यात आलेल्या श्री पांडुरंगाच्या मूर्तीचे पूजन शिवसेना नेते तथा आ.चंद्रकांत रघुवंशी, नगराध्यक्ष सौ. रत्ना रघुवंशी यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ॲड. राम रघुवंशी, नगरसेवक यशवर्धन रघुवंशी, थिया राम रघुवंशी, शेतकी संघाचे अध्यक्ष बी.के पाटील, पाणीपुरवठा सभापती कैलास पाटील, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक कुणाल वसावे,सोनिया राजपूत,प्रेम सोनार,भरत चौधरी,कीर्तनकार विधी पाटील,रोटरी क्लब देवेंद्र उपासनी,उपाध्यक्ष करणसिंग गिरासे,सुनील सोनार,चावरा स्कूलचे प्राचार्य फादर टेनी,सुशील गवळी,योगेश थोरात,मनोज गायकवाड,निलेश शाह यांच्यासह भाविक उपस्थित होते.

विठ्ठल नामाचा अखंड गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या सोहळ्यास मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून आषाढी एकादशीचा उत्सव उत्साहात साजरा केला.

# जन शिक्षण संस्थानच्या सदस्यांकडून वृक्षारोपण

धुळे, दि.२५ - कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार पुरस्कृत जन शिक्षण संस्थान, धुळे येथे संचालक मंडळ सदस्यांच्या उपस्थितीत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमाला संस्थेच्या संचालिका तय्यबा शेख, अध्यक्ष समीर मन्सुरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी पर्यावरणाचे संवर्धन ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असून, अधिकाधिक वृक्ष लागवड करून पर्यावरण संतुलित राखण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमास संचालक मंडळातील सर्व सदस्य, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमातून पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा संकल्प करण्यात आला.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** जिल्हा धुळे तालुका धुळे मौजे धुळे येथील धुळे म. न. पा. हद्दीतील स. नं. ४३३/२+४३४ पैकी प्लॉट नं. ४४ सि. स. नं १७०१३ चे एकूण क्षेत्र १५० चौ. मी. यापैकी अविभाज्य उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ७५ चौ. मी. बखळ प्लॉट यांसी मापे व चतु:सिमा नकाशा प्रमाणे ही मिळकत कायमस्वरुपी खयरेदीचा सौदा आमचे अशिल शाह जुनैद शाह अय्युब रा. धुळे यांशी आबिद बशीर अन्सारी यांचेशी केला आहे. बयाणा रक्कम दिली गेली आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लिज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, आरक्षण, हितसंबंध, देणे घेणे वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीव पूर्वक सोडून दिलेले आहेत. असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे. असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकारांनी दिलेल्या माहिती अधिकार व दाखविलेल्या कागदपत्रांच्या आधारे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. २५/०७/२०२६

**ॲड.जमील खान एस.पठाण**
पत्ता : चेंबर नंबर १०७, जिल्हा न्यायालय आवार, स्टेशनरोड, धुळे
मो. ९८२३०६८५०७/८६६९११७६५८

## NAME CHANGE

My Old Name was
**SAJEDA BI ABDUL MAJID**
My correct & New Name is
**SAJEDA BI ABDUL MAJID ANSARI**
**ADD- PLOT NO.51, MILLAT NAGAR, NEAR ABU BAKAR MASJID, DHULE-424001 (M.S.)**
for all purpose.

## NAME CHANGE

My Old Name was
**RAZIYA BANO BINTE MAKBOOL AHMAD**
My correct & New Name is
**RAZIYA BANO ABDUL GHANI ANSARI**
**ADD- H.NO.126, 100 FEET ROAD, BEHIND MARIYA SCHOOL, DHULE-424001 (M.S.)**
for all purpose.

## NAME CHANGE

MY PREVIOUS NAME WAS
**SHAIKH NISAR SK YUSUF**
AND MY NEW NAME IS
**MANIYAR NISAR SHAIKH YUSUF**
**ADD- ABU BAKAR MASJID JAVAL KHETIYA ROAD TAL.SHAHDA, DIST. NANDURBAR, 425409**

## NAME CHANGE

MY PREVIOUS NAME WAS
**KHAN QAMARUNNISA HAMID KHA**
AND MY NEW NAME IS
**MANIYAR QAMRUNNISA SHAIKH NISAR**
**ADD- KHETIYA ROAD ISLAMPURA NRAT ABU BAKAR MASJID,TAL.SHAHDA, DIST.NANDURBAR, 425409**

## जाहीर नोटीस

याद्वारे तमाम जनतेस, सर्व बँका, सर्व वित्तीय पतसंस्था व इतर सावकार यांना कळविण्यात येते की, धुळे येथील सर्व्हे नं. ४८३/३अ पैकी प्लॉट नं. १ चे क्षेत्र १५९.०० चौ. मी. यास विस्तारीत सि. स. नं. ८२४८ चे क्षेत्र १५२.०० चौ. मी. मिळकत चतु:सिमा मंजूर ले आउट प्रमाणे वर्णनांचे आतील या वरील मालकी हक्काची ताबे उपभोगातील मिळकतीचे मालक आमचे अशिल **श्री. संजय हरी शिंपी (गवांदे)** रा. मोगलाई कृष्णानगर, ग. नं. १ धुळे ता. जि. धुळे यांनी उपरोक्त मिळकत प्रभाकर राजाराम वाघ रांचे कडून रजि. **अदलाबदल दस्त क्रमांक १०१३/१९९७ दि. १७/०४/१९९७** रोजी अदलाबदल दस्त केलेला आहे. परंतु सदर मिळकतीचे ओरीजनल अदलाबदल दस्त व सदर मिळकतीबाबतचे इतर ओरिजनल कागदपत्रे गाडीवर मालेगांव रोडने जातांना दिनांक १८/०७/२०२६ रोजी गहाळ झालेला आहे. तसेच दि. १८/०७/२०२६ रोजी धुळे येथील चाळीसगांव रोड, पोलीस स्टेशन मध्ये गहाळ झालेची तक्रार दिलेली आहे. सदर मिळकतीवर आमचे अशिल हे **स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा पुष्पांजली मार्केट धुळे** यांचेकडून कर्ज घेत आहेत. तत्पूर्वी कोणाचा काही एक हितसंबंध असल्यास तसेच सदर मिळकतीवर इतर कोणत्याही वित्तीय संस्था अगर इतर सावकार यांचा हक्क, बोजा असल्यास ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष हरकतीसोबत योग्य तो कागदोपत्री पुरावा सादर करुन शहानिशा करुन द्यावी. टपाल व फोनवर परस्पर हरकत मान्य होणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास मिळकत निर्बोज आहे असे समजले जाईल. कळावे. प्रस्तुतची जाहीर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

दि. २४/०७/२०२६

**ॲड. ललित चांगदेव गायकवाड** मो. नं. ९७६४२८०४३४
प्लॉट नं. ५ भावसार कॉलनी, जमनागिरी रोड, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन : मौजे धुळे म. न. पा.हद्दीतील सि. स. नं. २९२० चे क्षेत्र ५८.५ चौ. मी. यातील रस्त्या लागत दुकाना पैकी पुर्वकडील तळमजल्यावरील दुकान नं. ४ चे एकूण क्षेत्र ६.९७ चौ. मी. अशी दुकान तुम्हास कायम खरेदी देण्याचा सौदा केला तो माझ्या मालकीची दुकान नं. ४ त्याची चतु:सिमा मंजूर नकाशा प्रमाणे.**

वर नमूद वर्णन केलेला दुकान/मिळकत ही **श्री. गोविंद भाईशंकर पंड्या** रा. धुळे यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कबजे ताबे उपभोगातील आहे. आमचे अशिल यांनी सदर दुकान खरेदी करण्याचा सौदा केलेला आहे. सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद दुकान/मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांतरण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३ दिवसाचे आंत आमचे खालील पत्त्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील दुकान /मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत दिली असे. धुळे दि. २५/०७/२०२६

**ॲड. लखमीचंद अ. गुजर**
ॲडव्होकेट व नोटरी
ग. नं. २, घर नं.३३२६, मुल्लावाडा, धुळे मो. ९४२३४९३०८९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :** १) मौजे देऊर बु. ता. जि. धुळे येथील गट क्र. व उपविभाग ३२४/२/ब चे क्षेत्र ला. ला. ० हे. ८६ आर व पो. ख. ० हे. ०० आर असे एकूण क्षेत्र ० हे. ८६ आर आकार ०४ रु. ०५ पैसे अश्या वर्णनाची जिरायत असलेली शेतजमीन मिळकत येणे जाणे करीता जुन्या वहिवाटे प्रमाणे वापर रस्ता आहे व राहील.

यासी चतु:सिमा गाव नकाशाप्रमाणे.

२) मौजे देऊर बु. ता. जि. धुळे येथील गट क्र. व उपविभाग २९०/२ चे क्षेत्र ला. ला. ० हे. ४८ आर व पो. ख. ० हे. ०० आर असे एकूण क्षेत्र ० हे. ४८ आर आकार ०१ रु. ६५ पैसे अश्या वर्णनाची जिरायत शेतजमीन मिळकत येणे जाणे करीता जुन्या वहिवाटे प्रमाणे वापर रस्ता आहे व राहील.

यासी चतु:सिमा गाव नकाशाप्रमाणे.

येणे प्रमाणे वरील वर्णनाच्या आतील दोन्ही मिळकती या १) **श्री. प्रकाश भाऊसाहेब गांगुर्डे, २) पुजा भाऊसाहेब गांगुर्डे, ३) कल्पना भाऊसाहेब गांगुर्डे सर्व** रा. देऊर बु.ता. जि. धुळे यांच्या संयुक्त मालकीची व ताबे उपभोगातील असून यांच्याकडून सदर मिळकत ही आमचे अशिल यांनी कायम स्वरुपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदा पोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणाचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण, टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत तक्रार न आल्यास सदरची मिळकत निर्बोज, निर्वेध व वरील नमूद मालकांच्या संयुक्त मालकीची असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींचा अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. २५/०७/२०२६

**ॲड. ललित पांडुरंग देठे** मो. ९४२२७७१२७४
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाला बिल्डींग जवळ, मिल परिसर, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व हितसंबंधीतांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानीक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, सटवाबाई गंगाराम गवळी रा.–गवळी समाज मंदीराजवळ, गवळी वाडा, नंदुरबार याच्यांशी आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकत विकसीत करण्याचा करण्याकामी विकसनशील करारनामा केलेला असून, लवकरच खालील नमुद जागेवर विकसनाचे काम सुरू होणार आहे, सदर सदर करारनाम्यास कोणाची काही हरकत आहे का या हेतू सदर जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.

सदर मिळकतीवर कोणाचेही कोणतेही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, कोणाचेही गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा वा लिज हक्क, ताबा हक्क वा सौदेकरार हक्क अगर खरेदी हक्क वैगेरे काहीही असल्यास किंवा संकल्पीत व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत वा विरोध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ५ दिवसांचे आंत त्याबददल स्वताच्या हक्काच्या प्रमाणीत झेरॉक्स प्रतिसह आम्हास खालील नमूद पत्त्यावर लेखी कळवावे, परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा, फोनवर घेतलेल्या हरकतींचा तसेच दस्तऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

नियोजीत मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज असून तथाकथीत हक्क व अधीकार संबंधीतांनी सोडून दिलेले आहे असे समजून सदर व्यवहार, कार्य पूर्ण करण्यात येईल. या नंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास ते आमचे आशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी, कळावे.

**परिशिष्ट**

अ. मौजे लळींग ता.जि.धुळे येथील लळींग ग्रामपंचायत हद्दतील गट नं.१२४/१ चे ला.ला. क्षेत्र १ हे २२ आर, पो.खं. क्षेत्र ०० हे ०२ आर असे एकूण क्षेत्र क्षेत्र १ हे २४ आर यासी आकार रू.२.०० ची मिळकत, यासी चर्तु:सिमा येणेप्रमाणे असे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | :- | गट नं.१२३ पैकी, |
| पश्चिमेस | :- | गट क्रं.१२५/३, |
| दक्षिणेस | :- | गट नं.१२४/२, |
| उत्तरेस | :- | गट नं.१२३. |

**आणि**

ब. मौजे लळींग ता.जि.धुळे येथील लळींग ग्रामपंचायत हद्दतील गट नं.१२५/ब/१/अ चे ला ला. क्षेत्र ० हे ४९.२५ आर, पो.खं. क्षेत्र ०० हे ०० आर असे एकूण क्षेत्र क्षेत्र ० हे ४९.२५ आर यासी आकार रू.१.०० ची मिळकत, यासी चर्तु:सिमा येणेप्रमाणे असे.

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | :- | गट नं.१२४/१, |
| पश्चिमेस | :- | गट क्रं.१२६/२, |
| दक्षिणेस | :- | गट नं.१२५/४, |
| उत्तरेस | :- | गट नं.१२५/२. |

सदर जाहीर नोटीस अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. दिनांक– २४/०७/२०२६.

**ॲड.निखिल रविंद्र भावसार**
ऑफिस– सैलानी कॉलनी, वाडीभोकर रोड, धुळे.
**मो.नं.७२७६७०११८७**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी जि. प. धुळे व ता. पं. स. धुळे पैकी धुळे मनपा बाहेरील मौजे खेडे शिवार येथील गट क्र. १९५/१/१ चे क्षेत्र १ हे. ०७ आर पैकी पश्चिमेकडील क्षेत्र ० हे. ४० आर. जिरायत शेत जमीन या वर्णनाची मिळकत त्यासी चतु:सिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : गट क्र. १९५/१/१ चा उर्वरित भाग, पश्चिमेस : गट नं. १९४/२, दक्षिणेस : धुळे –साक्री रस्ता, उत्तरेस : गट नं. १९६.

ही मिळकत **श्री. प्रकाश महादु पवार** रा. साक्री रोड, धुळे ता. जि. धुळे यांच्या मालकीची असून कब्जे उपभोगातील आहे. सदर वर वर्णनाची मिळकत ही आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक यांचेशी कायम खरेदीने घेण्याचे ठरले असून, तसा सौदापावतीचा व्यवहार केलेला असून बयाणा रक्कम देखील मालकांना अदा केलेली आहे. आमचे अशिल लवकरच वरील मिळकतीचा कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी वर नमूद वर्णनाची मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारची मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टांच, जप्ती, भाडेपट्टा हक्क अथवा वित्त संस्था, बँका, पतसंस्था यांचा सदर मिळकतीवर बोजा असल्यास मुळ कागदपत्रासह खालील पत्त्यावर ८ दिवसांच्या आत संपर्क साधावा व आपली लेखी हरकत नोंदवावी. परस्पर जाहीर हरकत घेवू नये अन्यथा आमचे अशिलावर नमूद मिळकत ही निर्बोज व निर्वेध आहे असे समजून येत्या दिवसांत व्यवहार पूर्ण करतील. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. त्यामुळे होणाऱ्या खर्चास व परिणामास आमचे अशिल जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

सदर जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या कागदपत्रे व माहितीच्या आधारे आमचे मार्फत दिले असे.

धुळे दि. २५/०७/२०२६

**ॲड.महेश अरुण चव्हाण**
जिल्हा न्यायालय, स्टेशनरोड, धुळे
मो. ९३७०३२५१०५/८२७५००७२१८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नगांव बु. ता. जि. धुळे येथील गट नं. २९०/४/५/६ पैकी प्लॉट नं. ४३ ब चे क्षेत्र १०५ चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : गट नं. २९०/१+२+३ पैकी प्लॉट नं. ३३अ, ३४ ब, दक्षिणेस : प्लॉट नं. ४४अ, उत्तरेस : प्लॉट नं. ४३/अ. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत ही **श्री. राजेंद्र मखमल पाटील** रा. ६८, वृंदावन कॉलनी,गोंदूर रोड, देवपूर धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकती कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिल **श्री. हेंमत नितीन पाटील,** रा. प्रियदर्शनी नगर, नगावबारी देवपूर धुळे यांच्याशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लिज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, आरक्षण, हितसंबंध, देणे घेणे वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीव पूर्वक सोडून दिलेले आहेत. असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे. असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. २५/०७/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**
नोटरी भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे मो. ९८२२८५२६५०

## धुळे जिल्हा अहिर सुवर्णकार समाज, धुळे

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

धुळे जिल्हा अहिर सुवर्णकार समाज या संस्थेची सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०९/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता संस्थेचे कार्यालय अहिर सुवर्णकार भुवन ग.नं.५, धुळे येथे खालील विषय पत्रीकेवरील विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी बोलविण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी महत्वपूर्ण सर्वसाधारण सभेला उपस्थित रहावे अशी विनंती समाज अध्यक्ष चंद्रकांत मधुकर सोनार व सचिव जीवन रामराव सोनवणे यांनी केली आहे.

१) सभेचे ठिकाण :- अहिर सुवर्णकार भुवन ग.नं.५, धुळे
२) सभेची दिनांक :- रविवार ०९/०८/२०२६
३) सभेची वेळ :- सकाळी ११.०० वाजता

**✻ सभेचे विषय ✻**

१) मागील सभेचे प्रोसिडींग वाचुन कायम करणे.
२) २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक कालावधीसाठी नुतन कार्यकारणीची निवड करणे.
३) समाजासाठी प्रशस्त भुवन बांधणेकामी शहरालगत जागा घेणे त्या बाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
४) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

**टिप :** कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी आर्ध्या तासाने सभा घेण्यात येईल व त्यास कोरमची आवश्यता राहणार नाही.

| अध्यक्ष | सचिव |
|---|---|
| चंद्रकांत मधुकर सोनार | जीवन रामराव सोनवणे |

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, शासकीय, निम–शासकीय, बँका, पतसंस्था व इतर कार्यालये तसेच भाऊबंदकी, आप्तेष्टांना व हितचिंतकांना आमचे अशिल नामे गोविंद सिताराम अग्रवाल, रा.बोहरा गल्ली, ता.शिरपूर, जि.धुळे सदर नोटीसीद्वारे जाहीर रित्या कळवितो की,

आमचे अशिलांनी श्री.सुरेशचंद्र घनशाम अग्रवाल, रा.लालबाग, शिरपूर यांचेशी मौजे– खर्दे बु.ता.शिरपूर, जि.धुळे येथील गट नंबर २१/१, क्षेत्र २ हे. १ आर, पो.ख.० हे. ८८ आर, एकूण क्षेत्र २ हे. ८९ आर, आकार रू.९.२५ पैसे येणेप्रमाणे वर्णनाच्या मिळकतीचे श्री.सुरेशचंद्र घनशाम अग्रवाल, रा.लालबाग, शिरपूर, जि.धुळे यांचे मालकी व कब्जे उपभोगातील शेत मिळकत असून सदरील शेत मिळकतीचे आमचे अशिल हे सुरेशचंद्र घनशाम अग्रवाल यांचेशी खरेदीखत करणार असून सदर खरेदीखताच्या व्यवहारास कोणाची काहीएक म्हणणे किंवा हरकत असल्यास त्यांनी आमचे अशिलांशी प्रत्यक्ष कागदोपत्री पुराव्यांसह संपर्क साधावा व आपले लेखी म्हणणे आमच्या अशिलांना ७ दिवसांच्या आत लेखी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून नोटीसीने सुचवावे.

तसे न केल्यास कोणाचेही काहीएक हरकत नाही, असे गृहीत धरून आमचे अशिल हे वर नमूद सुरेशचंद्र घनशाम अग्रवाल यांचेशी सदर शेत मिळकीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, कळावे.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस असे.

शिरपूर, दिनांक–२४/०७/२०२६.

**ॲड.मनोहर व्ही.गवळे**
**मो.नं.७२१८६२१५६२**

## जाहीर नोटीस

### शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनि.डिव्ही. यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं.२२९/२०२६, नि.६,

१) कलाबाई भाईदास माळी, २) अशोक भाईदास माळी,
३) विजय भाईदास माळी,
सर्व रा.माळीवाडा बेटावद ता.शिंदखेडा, जि.धुळे. ....अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही. ....**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार कलाबाई भाईदास माळी वगैरे यांनी मे.न्यायालयात नामे भाईदास संपत माळी हे दि.०३/०७/२०२५ रोजी मौजे बेटावद ता.शिंदखेडा जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे भाईदास संपत माळी यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.२७/०८/२०२६ रोजी ठिक १०:३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजुर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरून

| कनिष्ठ लिपीक | | सहाय्यक अधिक्षक |
|---|---|---|
| दिवाणी न्यायालय, शिंदखेडा | (शिक्का) | दिवाणी न्यायालय, शिंदखेडा |

## जाहीर नोटीस

### मे.दिवाणी न्यायाधीश सो., शिरपूर यांचे न्यायालयात

दिवाणी कि.अर्ज नं.५६९/२०२६, नि.६,

रंभाबाई लालचंद भिल ....अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही. ....**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार न.१ चे पती व अर्जदार न.२ यांचे वडील नामे– लालचंद भावडू भिल हे दि.२३/१२/२०२५ रोजी मौजे– आढे ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झाल्याने, अर्जदार न.१ व २ यांनी बॉम्बे रेगुलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे.न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदाराचा व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.३/८/२०२६ रोजी ठीक सकाळी १०:०० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेऊन त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही असे गृहीत धरण्यात येऊन, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरून प्रसिद्धीस दिली असे.

आदेशावरून

| सही/- | | सही/- |
|---|---|---|
| कनिष्ठ लिपीक | (शिक्का) | सहा. अधिक्षक |

## जाहीर नोटीस

### मे.दिवाणी न्यायाधीश सो., शिरपूर यांचे न्यायालयात

दिवाणी कि.अर्ज नं. /२०२६, नि.६,

शांताबाई दयाराम पाटील व.५ ....अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही. ....**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार न.१ चा मुलगा व अर्जदार न.२ ते ५ यांचे वडील नामे– लोटन दयाराम पाटील हे दि.०७/०३/२०२६ रोजी मौजे हिरे मेडिकल कॉलेज धुळे, ता.जि.धुळे येथे मयत झाल्याले अर्जदार न.१ ते ५ यांनी बॉम्बे रेगुलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे.न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदाराचा व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.३/८/२०२६ रोजी ठीक सकाळी १०:०० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेऊन त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही असे गृहीत धरण्यात येऊन, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरून प्रसिद्धीस दिली असे.

आदेशावरून

| सही/- | | सही/- |
|---|---|---|
| कनिष्ठ लिपीक | (शिक्का) | सहा. अधिक्षक |

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील म.तहसिलदार सो., तथा कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात

जन्म नोंद अर्ज नं. /२०२६

पूजा लालसिंग पावरा
रा.खामखेडा प्र.आंबे, ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार
**विरूध्द**
म.ग्रामपंचायत अधिकारी सो.,
ग्रामपंचायत, खामखेडा प्र.आंबे, ता.शिरपूर, जि.धुळे. . . . .
**जाबदेणार**

अर्जदार नामे– पूजा लालसिंग पावरा यांचा स्वतःचा जन्म दि.०८/०५/२००७ रोजी मौजे खामखेडा प्र.आंबे., ता.शिरपूर, जि.धुळे येथे झाला असून, अर्जदारास सदरचा जन्म दाखला मिळावा म्हणून त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम ६ उपकलम (२) (३) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. अर्जदारास सदरचा जन्म दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

तरी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार वा त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाचे आत आपण स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनीधी वा वकीलांमार्फत म.तहसिलदार सो. शिरपूर, जि.धुळे यांचे कोर्टात हजर राहुन आपली हरकत/आक्षेप नोंदवावी, अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येईल.

दि.२४/०७/२०२६

**ॲड.ज्योत्स्ना एन. गिरासे**

## जाहीर नोटीस

### मे.दिवाणी न्यायाधीश सो., शिरपूर यांचे न्यायालयात

दि.कि.अर्ज नं.५६३/२०२६, नि.६,

अनुसयाबाई बाबुराव मराठे व.६ ....अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही ....**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचा मुलगा व अर्जदार न.२ ते ६ यांचा भाऊ नामे– रविंद्र बाबुराव मराठे हे दि.२२/०८/२०२२ रोजी मौजे– डॉ.वसंतराव पवार मेडिकल कोलेज, आडगाव ता.जि.नाशिक येथे मयत झालेले आहेत. अर्जदार न.१ ते ६ हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदार न.१ ते ६ यांनी बॉम्बे रेगुलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे.न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदाराचा व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.३/८/२०२६ रोजी ठीक सकाळी १०:०० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेऊन त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही असे गृहीत धरण्यात येऊन, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरून प्रसिद्धीस दिली असे.

आदेशावरून

| सही/- | | सही/- |
|---|---|---|
| कनिष्ठ लिपीक | (शिक्का) | सहा. अधिक्षक |

## जाहीर नोटीस

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो., ज्युनी.डिव्ही. यांचे कोर्टात

दिवाणी कि.अर्ज नं.५६१/२०२६, नि.६,

१) प्रेमीलाबेन शालीग्राम पाटील, २) विनोद शालीग्राम पाटील,
नं.१ व २ रा.गिधाडे ता.शिरपूर जि.धुळे
ह.मु.रा. नं.१ व २ रा.१३४ अमृत नगर, अलवा नाका
जी.आय.डी.सी मांजलपुर वडोदरा जि. वडोदरा
३) जयश्री प्रवीन भदाने,
रा. भदाने गल्ली, हनुमान मंदिर परिसर वालखेडा ता.शिंदखेडा जि.धुळे
४) छाया राकेश पाटील, रा. सी/१२० हरिओम नगर गुजरात हाऊसींग बोर्ड, पांडेसरा सुरत सिटी ता.जि.सुरत
५) माया किशोर पाटील, रा. सी/१२० हरिओम नगर गुजरात हाऊसींग बोर्ड, पांडेसरा सुरत सिटी ता.जि.सुरत. ....अर्जदार
**विरूध्द**
कोणीही नाही ....**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार प्रेमीलाबेन शालीग्राम पाटील वगैरे यांनी मे.न्यायालयात नामे शालीग्राम रतन पाटील हे दि.१०/०२/२०२६ रोजी मौजे वडोदरा ता.जि.वडोदरा (गुजरात) येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे करीता. अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे शालीग्राम रतन पाटील यांचे वारसांबाबत वर नमुद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि.३/८/२०२६ रोजी ठिक १०:३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजुर करून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरून

| कनिष्ठ लिपीक | | सहाय्यक अधिक्षक |
|---|---|---|
| दिवाणी न्यायालय, शिरपूर | (शिक्का) | दिवाणी न्यायालय, शिरपूर |

## जाहीर नोटीस

### मे.दिवाणी न्यायाधीश ओ कनिष्ठ स्तर शिरपूर यांचे न्यायालयात

दि.कि.अर्ज नं.५९६/२०२६

१) गुंताबाई गुलाब थोरात, २) मंगलाबाई किशोर थोरात,
३) प्रज्ञा किशोर थोरात, ४) सिद्धार्थ किशोर थोरात,
सर्व रा.आंबेडकर चौक, मु/पो–बोराडी, ता.शिरपूर, जि.धुळे ....अर्जदार
**विरूध्द**
कुणीही नाही ....**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचा मुलगा, तसेच अर्जदार क्र.२ यांचा पती व अर्जदार क्र.३ व ४ यांचे वडील नामे– किशोर गुलाबराव थोरात हे दि.११/०६/२०२६ रोजी मौजे– मु/ पो–बोराडी, ता.शिरपूर जि.धुळे येथे मयत झालेले आहेत. मयत किशोर गुलाबराव थोरात यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत या व्यतिरिक्त कोणीही वारस नाहीत. म्हणून अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन अधिनियमाच्या कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे.न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदाराचा व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे.न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर दि.१/८/२६. रोजी ठीक सकाळी १०:०० वाजता स्वतःअगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी, लेखी पुरावा घेऊन त्या आधारे अर्जदारा व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही असे गृहीत धरण्यात येऊन, मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणीप्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर शिरपूर, जि.धुळे यांचे आदेशावरून प्रसिद्धीस दिली असे.

आदेशावरून

| सही/- | | सही/- |
|---|---|---|
| कनिष्ठ लिपीक | (शिक्का) | सहा. अधिक्षक |

## पान १ वरुन

### विद्यार्थ्यांपुढे सरकार झुकले; शिक्षण मंत्री धर्मेंद्र

घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी २५ जुलै २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आपला राजीनामा सोपवला.

धर्मेंद्र प्रधान यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रात नमूद केले की, देशातील तरुणांच्या भावनांचा मी आदर करतो. जंतर मंतर आणि देशात निर्माण झालेल्या परिस्थितीचा फायदा देशविरोधी शक्तींनी घेऊ नये आणि विद्यार्थ्यांचे भविष्य कायदेशीर कचाट्यात अडकू नये, म्हणून मी राजीनामा देत आहे.

विशेष म्हणजे, धर्मेंद्र प्रधान यांनी स्वतः १९९७ मध्ये विद्यार्थी दशेत असताना ओडिशात झालेल्या एका पेपर लीकविरोधात आंदोलन केले होते आणि त्यावेळी त्यांच्यावर लाठीचार्ज झाला होता. आज त्यांच्याच कार्यकाळात झालेल्या पेपरफुटीमुळे व विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे त्यांना मंत्रिपद गमवावे लागले आहे.

राजीनामा पत्रात त्यांनी नमूद केले की, सरकारने या प्रकरणाची सीबीआय चौकशी सुरू केली असून, पारदर्शकतेसाठी भविष्यात परीक्षा संगणकाधारित पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे.

### जेन झीने सरकारचा झिंज्या उपटल्या

घुसवण्यात आले होते. आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलीस गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आता स्पष्ट खुलासा करावा की, या निष्पाप विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेतले जाणार आहेत का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

सरकारची मस्ती जिरवली : राज ठाकरे

झेन झीने सरकारची मस्ती जिरवली आहे आणि त्यांच्या झिंज्या उपटल्या आहेत, असे म्हणत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आंदोलक तरुणांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.दरम्यान, राज्यातील राजकीय घडामोडींवर बोलताना त्यांनी मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधला. मुख्यमंत्री फडणवीस अचानक दिल्लीला का गेले, हे मला माहित नाही. त्याबाबतचा खुलासा त्यांनी स्वत:च करायला हवा, असा टोला राज ठाकरे यांनी लगावला.

उद्याचा मोर्चा निश्चित!

केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात आणि विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी उद्याचा नियोजित मोर्चा वेळेवरच निघणार असल्याचे स्पष्ट करत दादर येथील ऐतिहासिक शिवाजी पार्कपासून ते सिद्धिविनायक मंदिरापर्यंत हा भव्य मोर्चा काढला जाणार असून, त्यात नागरिकांनी आणि तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही उद्धव ठाकरे यांनी केले.

### राहुल गांधींच्या वक्तव्याच्या निषेधार्थ

अजित राजपूत, नागेश कोळी, दीपक भोई, उत्तम चौधरी, नितीन शैवाल, यतिश सोनवणे, चंद्रकांत पाटील, जयेश साळुंखे, लाला भाऊ, राजेश शिवदे यांच्यासह मोठ्या संख्येने भाजयुमोचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी भारतीय जनता युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, भारतीय सैन्याचा गौरव आणि देशाची अस्मिता यांचा अपमान करणाऱ्या कोणत्याही वक्तव्याचा भारतीय जनता युवा मोर्चा लोकशाही मार्गाने तीव्र निषेध करत राहील. आंदोलनाची सांगता भारत माता की जय आणि वंदे मातरम् च्या घोषणांनी करण्यात आली.

### नाशिक, पालघरला भूकंपाचे धक्के

नागरिकांनी अजिबात न घाबरता सतर्क राहावे आणि कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

धुंदलवाडीत ३.१ तीव्रतेचा धक्का

दुसरीकडे, पालघर मध्ये आज सकाळी दहा वाजून सत्तावन मिनिटांच्या सुमारास पुन्हा एकदा भूकंपाचा हादरा जाणवला. या हादऱ्याची तीव्रता तीन पूर्णांक एक रिश्टर स्केल इतकी नोंदविण्यात आली आहे. पालघरच्या डहाणू तालुक्यातील धुंदलवाडी कासा या परिसरात हा भूकंपाचा हादरा जाणवला. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पालघर जिल्ह्यात २०१८ पासून भूकंपाच्या धक्क्यांचे सत्र सुरूच असून आतापर्यंत तब्बल अडीच हजारांहून अधिक कमी-जास्त तीव्रतेचे भूकंपाचे हादरे या परिसरात बसले आहेत. सतत सुरू असलेल्या या भूकंपाच्या धक्क्यांमध्ये कोणतीही मोठी जीवितहानी झाली नसली तरी सुद्धा ग्रामीण भागातील घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे समोर आले आहे.

पालघर जिल्ह्याच्या डहाणू, तलासरी या भागात आदिवासी पाड्यांवर कच्च्या बांधकामाची घरे असून या घरांच्या भिंतींना सतत बसणाऱ्या हादऱ्यांमुळे तडे जात आहेत. येथील हजारो घरे धोकादायक स्थितीत पोहचली आहेत. मागील तीन वर्षांपूर्वी या भागात देण्यात येणारी घरकुल देखील भूकंपरोधक दिली जातील, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सरकारकडून देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात त्याची कोणतीही अंमलबजावणी झाली नसून आता वारंवार बसणाऱ्या या धक्क्यांमुळे पुन्हा एकदा येथील नागरिक भीतीच्या छायेखाली आहेत.

### कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनामुळे

मंत्रालयाकडून देण्यात आली आहे. पेपर लीकच्या घटना आणि त्यामुळे रद्द झालेल्या परीक्षा यामुळे सातत्याने वादात राहिली आहे. शिक्षण मंत्रालयच अडचणीत आले आहे. पण, सरकार शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्याच्या मनस्थितीत नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांची गच्छंती होत असताना प्रधान यांना अभय देण्यात आल्याची चर्चा आहे.

एनटीए मध्ये रचनात्मक बदल होण्याची दाट शक्यता आहे. यंत्रणेच्या कार्यप्रणालीत व्यापक बदल केले जाणार आहेत. शिक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई संस्थेच्या पुनर्रचनेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, विश्वासार्ह करण्याच्या हेतूने ही कारवाई करण्यात आली आहे.

### नीटच्या नैराश्यातून आत्महत्या केलेल्या

सुधिर जाधव, संजय वराडे, चिंतामण ताकटे, किशोर वाळके, अमीन पटेल, आसीफ अन्सारी, हाशीम अन्सारी, प्रमोद सिसोदे, बानु शिरसाठ, कृष्णा ठाकूर, हरीचंद्र लोंढे, भिवसन अहिरे, मधुकर मरसाळे, मजहर खान, अरबाज शेख, सलमान मिर्झा, हेमंत देवरे, स्वप्निल पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले.

### कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात जोरदार पाऊस

अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला. मुंबई, रत्नागिरी, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, कोल्हापूर घाटमाथ्यावर येलो अलर्ट जारी करण्यात आला. राज्यात पुढील काही दिवसात पावसाचा प्रचंड जोर वाढणार आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, उत्तर कोकणात काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस आणि काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची दाट शक्यता आहे. दक्षिण कोकण व गोवा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील घाट क्षेत्रांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची दाट शक्यता आहे.

**अतिवृष्टीची नोंद का होतेय?**

दरम्यान, अल्प कालावधीत अनेक ठिकाणी अतिवृष्टीची नोंद होत आहे. यामागे अनेक कारणे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. त्यात वातावरणातील बदल, मान्सूनच्या प्रणालींमधील बदल, एल-नीनो, ला-नीना यांसारख्या हवामान घटकांचा प्रभाव तसेच वाढते प्रदूषण यांचा समावेश असल्याचे भारतीय हवामान विभागाचे अधिकारी एस.डी. सानप यांनी सांगितले.

### पावसामुळे खान्देश एक्सप्रेस आज रद्द

सध्या सुरळीत सुरू असून, प्रवाशांनी प्रवासापूर्वी आपल्या गाडीची अद्ययावत माहिती तपासूनच रेल्वे स्थानकावर यावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.



## बीएलओ घरभेटी देत नसल्याने मतदारांची नावे वगळली जातील- लोंढे

**धुळे, दि.२५- विशेष मतदार पुनर्निरीक्षण मोहिमेत नियुक्त करण्यात आलेले बीएलओ (बूथ लेव्हल अधिकारी) प्रत्यक्ष घरभेटी न देता काही ठिकाणी बसूनच मतदार नोंदणी व पडताळणीचे अर्ज भरून घेत असल्याचा आरोप करत, त्यामुळे हजारो पात्र मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली जाण्याची भीती व्यक्त करत संविधान संरक्षण समिती, जिल्हा धुळे यांच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष हरिश्चंद्र लोंढे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.**

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बीएलओंनी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन पडताळणी करणे आवश्यक आहे. मात्र अनेक ठिकाणी प्रत्यक्ष घरभेटी न देता राजकीय पक्षांच्या कार्यालयांमध्ये किंवा इतर ठिकाणी बसूनच अर्ज भरून घेतले जात असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे अनेक पात्र मतदारांची नावे वगळली जाण्याची शक्यता निर्माण झाली असून, याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच स्थलांतरित मतदारांची नावे योग्य पत्त्यावर समाविष्ट करण्याची प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यात यावी, अन्यथा शेकडो मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहतील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यापूर्वीही १० मार्च २०२६ व २९ मे २०२६ रोजी याच विषयावर प्रशासनाला निवेदने देण्यात आली होती; मात्र अद्याप अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याचे समितीने म्हटले आहे. संविधान संरक्षण समितीने बीएलओंना नियमानुसार प्रत्यक्ष घरभेटी करूनच मतदार पडताळणी करण्याचे स्पष्ट निर्देश देण्याची तसेच संपूर्ण मतदार पुनर्निरीक्षण प्रक्रिया पारदर्शक व विश्वासार्ह पद्धतीने राबविण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

निवेदन देतांना संविधान संरक्षण समितीचे अध्यक्ष हरिश्चंद्र लोंढे, प्रा. बाबा हातेकर, डॉ. दरबारसिंग गिरासे, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, मुंबईचे उपाध्यक्ष गो.पी. लांडगे, बी.ए. पाटील, जी.डी. जाधव, पंडित गोसावी, पी.टी. बेडसे, मनोहर मोहीते, कॉ. एल.आर. राव, राजेंद्र अहिरे, पोपटराव चौधरी, वसंतराव पाटील, श्रीकृष्ण बेडसे, हेमंत मदाने, मोहम्मद जैद, विश्वास पगार, डॉ. पापालाल पवार, किशोर शेजवळ, एम. एच. मोहीते, गुलाब मोरे, रामकृष्ण शिंदे, बबनराव वानखेडे, दिपक सोनवणे, दिनेश निमोणकर, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष हेमंत भडक, तालुका सचिव कैलास देसले, तालुकाध्यक्ष नितीन जाधव आदी उपस्थित होते. तसेच मुक्त पत्रकार धनंजय गाळणकर, नवल ठाकरे, मोहंमद जैद, आसिफ शेख, सादिक शेख यांच्यासह संविधान संरक्षण समितीचे पदाधिकारी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हस्ती ग्रुप स्कूल येथे आषाढी एकादशी निमित्त वारकरी पालखी सोहळा संपन्न

दोंडाईचा, दि.२५- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल व ज्यू. कॉलेज, हस्ती वर्ल्ड स्कूल व हस्ती गुरुकुल दाऊळ शिवार दोंडाईचा येथे आषाढी एकादशी निमित्त हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी आयोजन करण्यात आले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की हस्ती पब्लिक स्कूल चा २५ वर्षाच्या यशस्वी परंपरेनिमित्त वारकरी संत पालखी सोहळा साकारला. हस्ती वर्ल्ड स्कूलने इंटर हाऊस पालखी उत्सव स्पर्धा घेतली तर हस्ती गुरुकुल ने हॅप्पी इन्स्पायर पालखी सोहळाचे आयोजन केले. हस्ती स्कूलच्या मुख्य प्रवेशद्वारापाशी हस्ती पब्लिक स्कूलच्या प्राचार्या रजिया दाऊदी ,हस्ती वर्ल्ड स्कूलचे प्राचार्य जीवन सपकाळे हस्ती गुरुकुल चे मुख्याध्यापक सदाशिव महाजन व प्रशासकीय अधिकारी रेखा गाडेकर यांनी रुक्मिणीच्या प्रतिकृतीचे विठ्ठल रुक्मिणीच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांचे पूजन करून पालखी उत्सवास सुरुवात केली. यावेळी समन्वयक मनोज ठाकूर,महेश डिगराळे, समन्वयिका समीना बोहरी, स्वाती देवरे, ज्योती बोरसे आदी उपस्थित होते.

हस्ती पब्लिक स्कूल ने वारकरी संतांची माहिती देणारी पालखी सजवली. यांत संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत चोखामेळा, संत गोरोबा कुंभार, संत सावता माळी, संत मीराबाई, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा यांची भूमिका विद्यार्थ्यांनी हुबेहूब साकारल्या. मध्यवर्ती मैदानावर वारकरी संत जीवना आधारित नाटिका सादर करण्यात आली. दरम्यान राजा पंढरीचा व रखुमाई रखुमाई गीतांवर सामूहिक नृत्य सादर करण्यात आले. रखुमाई रखुमाई, कानडा राजा पंढरीचा, पांडुरंगा तुला माझी आण अशी सामूहिक गीते सादर करण्यात आली. यावेळी हस्ती स्कूलच्या २५ व्या रौप्य महोत्सव निमित्त विद्यार्थ्यांच्या मानवी साखळीने विठ्ठल विठ्ठल टिळा प्रतिकृती साकारली. याकरिता कलाशिक्षक राहुल भामरे व क्रीडा शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

## पान १ वरुन

### नंदुरबारला पाण्याच्या मोटारी चोरणारे

ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक अमोल देशमुख, भुणेश मराठे, पोहेकॉ जगदीश पाटील तसेच पोलीस कॉन्स्टेबल ललित गवळी, अमित भरवाड, राहुल राठोड, राजेंद्र कटके, रुपेश पगारे, विवेक ठाकरे, अनिल बसावे, नरेंद्र पाडवी आणि मपोकॉ निंबा वाघमोडे यांच्या पथकाने केली.

### भाजप तर्फे महिलांना किचन गार्डन

गृह-कृषीची नवी चळवळ निर्माण करेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

या कार्यक्रमास परिसरातील महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश महामंत्री जयश्री अहिरराव तसेच धुळे महानगर महिला मोर्चाच्या अध्यक्षा सुवर्णा पाटील यांनी केले आहे.

### विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज करणाऱ्यांवर

करण्यात यावी. अशी मागणी दिलीप मोहिते, संजय चव्हाण, दादा सोनवणे, दिलीप अहिरे, दावल वाघ, आनंद गांगुर्डे, प्रकाश वाघ, सुमित साबळे, विशाल मोरे, अभय जाधव, रोहित माळी, निखिल सावळे, सिध्दार्थ ढिवरे, विराज अमृतसागर, तुषार खरे, धनंजय पाटील, राज पाटील, मयुर तपासे, अशोक निकम, आनंद लोंढे, रवी पवार, भैय्या वाघ यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी केली.

### आर.सी. पटेल कला व वाणिज्य कॉलेजच्या

समर कॅम्पचा उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा होता. या शिबिरामध्ये व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव, संघभावना आणि राष्ट्रीय एकात्मता यांचा विकास होण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. सदर कुलगुरू समर कॅम्पमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेतील प्रणाली राजपूत, चेतन सूर्यवंशी, वैष्णवी जाधव, मनीष फुलपगारे, प्राची पातुरकर आणि अमोल पाटील या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. या विद्यार्थ्यांनी शिबिरातील विविध शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आपली छाप पाडली.

शिबिरात सकाळी व्यायाम, योग व प्रार्थना सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. व्यक्तिमत्त्व विकास, संवाद कौशल्य, नेतृत्व प्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता अभियान आणि सामाजिक जनजागृती या विषयांवर कार्यशाळा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी गटचर्चा, पोस्टर सादरीकरण, सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्ती जनजागृती यांसारख्या उपक्रमांतून समाजाप्रती आपली बांधिलकी अधोरेखित केली. या अनुभवातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ झाली.

प्राचार्य डॉ. हितेंद्र महाजन, उपप्राचार्य डॉ. ए.एम. पाटील, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. कमलाकर पाटील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. रमाकांत चौधरी, महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. अनीता जाधव, प्रा. अल्केश भावसार, तालुका समन्वयक डॉ. गोपाळ बिडे, प्रा. रामकुमार सूर्यवंशी आदींनी सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### आर.पी.आय. आठवले गटाची आज बैठक

रमेश मकासरे, महेंद्र निळे, शशिकांत वाघ, एस.आर.बागुल, लक्ष्मण जाधव उपस्थित राहणार आहेत. बैठकीला उपस्थितीचे आवाहन राजु शिरसाठ यांनी केले आहे.

## निधन वार्ता

### घन:श्याम भानगावकर



धुळे, दि.२५- शहरातील नाट्य आणि संगीत क्षेत्राशी निगडित असलेले ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे शाखाधिकारी घन:श्याम पांडुरंग भानगावकर यांचे मुंबई येथे हिंदुजा हॉस्पिटलमध्ये निधन झाले. मृत्यू समयी ते ७० वर्षांचे होते. त्यांना चाळीसगाव रोड अभय कॉलनी येथे आणून त्यांची अंत्ययात्रा दि.२६ जुलै रोजी सकाळी दहा वाजता राहत्या घरापासून देवपूर एकविरा माता अमरधाम येथे काढण्यात येणार आहे. ते विजय भानगावकर यांचे लहान बंधू होत.

### आषाढी एकादशीनिमित्त श्रीरामरक्षा स्तोत्र पठण

धुळे, दि.२४- आग्रा रोडवरील श्रीराम मंदिर व योगविद्यावर्धिनी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशी निमित्त दि.२६ जुलै रोजी सायंकाळी पाच वाजता श्रीराम रक्षा स्तोत्र पाठ होणार आहेत.

श्रीरामरक्षा स्तोत्र पठणाचा जास्तीत जास्त भाविकांनी या संधीचा लाभ घ्यावा व आपली सेवा श्रीरामाच्या चरणी रूजु करावी. उपस्थितीचे आवाहन अभय नाशिककर, प्रतिभा नेवे, रंजना नेवे यांनी केले आहे.



## मुक्तांगण शैक्ष.संकुलतर्फे भव्य दिंडी भदाणे दाम्पत्याने नोंदवला सहभाग

**धुळे, दि.२५- धुळे तालुक्यातील बोरकुंड येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान संचलित मुक्तांगण शैक्षणिक संकुलात भव्य दिंडी काढण्यात आली. आषाढी एकादशीनिमित्त आयोजीत ही दिंडी टाळ- मृदुंगाच्या गजरात फिरविण्यात आली. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते.**

विद्यार्थ्यामधील विविध कलागुणांना वाव मिळावा, त्यांना सण-उत्सवाचे महत्व कळावे तसेच विद्यार्थ्यांतील धार्मिक भावना वृध्दींगत व्हाव्यात या उदात्त हेतूने मुक्तांगण शैक्षणिक संकुलातर्फे विविध उपक्रम राबविले जातात. यातच आषाढी एकादशी निमित्ताने बोरकुंड गावात दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीत विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे दर्शन घडवले. विद्यार्थ्यांनी लेझीम च्या साहाय्याने नृत्य केले तर काहींनी ध्वजनृत्य केले केले. काहींनी टाळच्या गजरात ठेका धरला. यावेळी वेगवेगळे मानवी मनोरेही बनवले. टाळ, मृदंगाच्या गजरात अवघा बोरकुंड परिसर दुमदुमून निघाला. काही विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी तसेच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ अशा वेगवेगळ्या संतांच्या वेशभूषा परिधान करून आपले कलागुण सादर केले.

या दिंडीत संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे व संस्थेच्या सचिव शालिनी भदाणे यांनी देखील सहभाग घेतला. तसेच कलागुण सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सर्व विद्यार्थ्यांना केळी व चिक्की प्रसादाचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली. दरम्यान इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे, सचिव तथा माजी जि.प.सदस्या शालिनी बाळासाहेब भदाणे यांनी परिसरातील श्री.विठ्ठल रुखमाई मंदिरात महापूजा व महाआरती करुन देवाकडे, शेतकरी बांधवांना सुख समृध्दी लाभू दे असे साकडे घातले.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

**पाहिजेत**
कापड दुकानासाठी खालील जागा भरणे आहे.
सेल्समन -३
हेल्पर - २
समक्ष येऊन भेटा
बेबीज वर्ल्ड
ग.नं.२, नानक हार्डवेअर, धुळे
9850835999

**त्वरीत पाहिजे**
Cosmetic, Gift, Decoratian व लेडीज पार्लरसाठी अनुभवी लेडीज पाहिजे.
9423191694



डी. पी. इंजिनिअर्स
BOSCH Invented for life
सुप्रसिद्ध बॉश कंपनीचे
वायपर ब्लेड्स
58 वर्षांची विश्वसनीय सेवा...
डी. पी. इंजिनिअर्स
अधिकृत बॉश डिझेल सर्व्हीस - A.7 उद्योग नगर, मुंबई आग्रा रोड, धुव होंडा शोरूमच्या बाजुला, धुळे
Cell: 94030 88893 / 94222 89693

**भाड्याने देणे आहे**
जयहिंद सिनियर कॉलेज जवळील पेन्ट हाऊस देणे आहे. 3 BHK शासकीय, निमशासकीय अधिकारी वर्गासाठी
भुपेंद्र रनमळे
8149310000

**पाहिजेत**
होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर
२) सेल्समन
३) दुकान काम हेल्पर
अनुभव असल्यास प्राधान्य.
-: संपर्क :-
8888096777

**पाहिजेत**
टायपिस्ट म्हणून मुलगा/ मुलगी पाहिजेत. इच्छुकांनी सायंकाळी ६ वाजता समक्ष भेटावे.
अनुभवी व्यक्तीस प्राधान्य
श्रीविनायक डायग्नोस्टीक सेंटर
हॉटेल गणपती पॅलेस समोर, मालेगाव रोड, धुळे

**डिटीपी ऑपरेटर पाहिजेत**
इनडिझाईनमधे काम करु शकणारा डिटीपी ऑपरेटर चांगल्या पगारावर नेमणे आहे.
-: संपर्क :-
दै.आपला महाराष्ट्र
9422286496

**पाहिजेत**
स्कूल युनिफॉर्मच्या शोरूम करिता
मुले/मुली पाहिजेत
शिक्षण : १०वी/१२वी/पदवीधर
(कॉम्प्युटर नॉलेज आवश्यक)
CLEVER KEN FACTORY OUTLET
दु.नं. १९,एस.ए. मिशन कॉम्प्लेक्स,जयहिंद सिनिअर कॉलेजच्या बाजूला, देवपूर, धुळे
मो. 9987706455,9923597722

**पाहिजेत**
- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्टोमेट्रीस्ट

संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**दुकान विकणे आहे**
शॉप नं. ११
फॉरचुन प्लाझा
संतोषी माता चौक
ओस्वाल बोर्डींग शेजारी, अप्पर ग्राउंड फ्लोअर
-: संपर्क :-
8806950799

आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...
atomberg "Why not?"





क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है!
SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०